रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९। अंक ३०८ । पृष्ठे १० ▌ RGD/016/2026-28

www.krushival.in

## ‘खासदार, आमदारांची पेन्शन बंद करा’

मुंबई : देशभरात नव्याने होणारी जनगणना व त्या अनुषंगाने वाढणारे लोकसभा व विधानसभा क्षेत्र यांची संख्या, म्हणजेच मोठ्या प्रमाणात खासदार व आमदारांची संख्या वाढणार आहे. याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे माजी आमदार राजू पाटील यांनी मोठी मागणी केली आहे. पेंशन योजना कायमची बंद करायला हवी, अशी मागणी राजू पाटील यांनी केली आहे. माजी खासदार व माजी आमदार यांना पेंशन देण्याचं काहीच कारण नसल्याचे राजू पाटील म्हणाले. तसेच प्रामाणिक करदात्या नागरिकांच्या पैशांची ही नासाडी थांबवावी, असेही पाटील म्हणाले.


# कृषीवल

रायगड, शुक्रवार, दि. १७ एप्रिल २०२६

किंमत ४ ₹



**HIRING ALERT**

Looking For 2 waiters, 2 house boy
(Preffered Male Candidate)
Hotel : Outpost
Job Location : Alibaug
Salary As Per Industry Standards,
Age :- Below 40,
Relevant Experience : 4 to 6 years.

Interested candidates may connect immediately on 8010169688 / 7798467555 & email your latest resume on Sujit.patil@outpostalibaug.com and Pradeep.bhardwaj@Outpostalibaug.com and update your expected salary.






उत्सवी आनंद
उत्सवी ऑफर

०% घट*
जुन्या सोन्याच्या एक्सचेंजवर

५०% पर्यंत सूट*
सोन्याच्या दागिन्यांच्या घडणावळीवर

१००% पर्यंत सूट*
हिऱ्याच्या दागिन्यांच्या घडणावळीवर



PNG JEWELLERS

*अटी लागू. ऑफर १० ते २० एप्रिल २०२६ पर्यंत उपलब्ध.

UP TO ₹6,000 CASHBACK# SBI card

#Min. Trxn.: ₹45,000; Max. Cashback: ₹6,000 per card account; Validity: 17 Apr - 23 Apr 2026. T&C Apply.

हिरो शोरूमच्या शेजारी, बायपास रोड, चेंधरे, अलिबाग | फोन नं.: ८००७१२३१७४/८००७१२३१७६

विले पार्ले (पू) । ठाणे (प) । कल्याण (प) । बोरिवली (प) । पनवेल (प) । डोंबिवली (पू) । वाशी । घोडबंदर रोड (ठाणे) । भांडुप (प) । गोरेगाव (प) । विरार (प) । दादर (प) । उरण

टोल फ्री नं: १८०० २३३ ५००५ (सकाळी ११ – संध्याकाळी ७) www.pngjewellers.com I info@pngadgil.com

INDIA I USA

# विमानतळ सुरक्षेला धोका?

## बंदी असूनही विठ्ठलवाडीत उघड्यावर चिकन विक्री सुरू

| पनवेल | विशेष प्रतिनिधी |

विमानतळ परिसरात मांस विक्रीवर स्पष्ट बंदी असतानाही नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लागूनच असलेल्या जुन्या पनवेल-उरण मार्गावरील विठ्ठलवाडी येथे उघड्यावर चिकन विक्री सुरू असल्याचे धक्कादायक वास्तव पाहायला मिळत आहे. रस्त्याच्या कडेला झाडाखाली पिंजऱ्यात कोंबड्या ठेवून सर्रास विक्री होत असल्याचे दिसत आहे.

या ठिकाणी स्वच्छतेचे कोणतेही नियम पाळले जात नसून, उघड्यावरच कोंबड्यांची विक्री केली जात आहे. अशा प्रकारच्या मांस विक्रीमुळे पक्षी आकर्षित होण्याचा धोका निर्माण होतो. त्यामुळे विमान सुरक्षेच्या दृष्टीने हा प्रकार अत्यंत गंभीर मानला जात आहे.विमानतळापासून तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या उलवे येथील चिकन-मटण विक्री करणाऱ्या दुकानांविरोधात नॅट कनेक्ट फाऊंडेशनतर्फे नागरी विमान वाहतूक महासंचालकांकडे तक्रार दाखल करण्यात आली होती. संस्थेचे संचालक बी.एन. कुमार यांनी केलेल्या तक्रारीनुसार संबंधितांना कारवाईच्या सूचना त्यावेळी देण्यात आल्या होत्या. मात्र, त्यानंतरदेखील विठ्ठल वाडी परिसरात सुरु असलेल्या चिकन विक्रीमुळे विमानतळ परिसरात चिकन, मटण विक्रीसाठी असलेली बंदी केवळ कागदावरच आहे का, असा सवाल उपस्थित होत असून, प्रशासनाकडून कारवाई का होत नाही, असा थेट प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. कच्च्या मांसाचा कचरा जो योग्यरित्या विल्हेवाट लावला जात नाही, तो अनेक पक्ष्यांना उड्डाण क्षेत्राजवळ खाण्यासाठी आकर्षित करतो आणि नवी मुंबई विमानतळावरील विमानांना गंभीर धोका निर्माण करू शकतो.



### काय आहेत नियम?

नागरी उड्डाण मंत्रालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, विमानतळाच्या दहा किलोमीटर परिसरात पक्ष्यांना आकर्षित करणाऱ्या कोणत्याही गोष्टींना परवानगी नाही. उघड्यावर मांस विक्री, कत्तलखाने किंवा कचरा टाकणे यावर बंदी आहे. मात्र, विमानतळाच्या अवघ्या काही मीटर परिसरातच विठ्ठलवाडी येथे उघड्यावर चिकन विक्री सुरू असल्याने नियमांचा सर्रास भंग होत आहे.

# श्रीवर्धनमध्ये ‘तिसरी आंख’ मिटली

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

## ९३ पैकी ५२ सीसीटीव्ही बंद असल्याचे उघड

## अप्पर पोलीस अधीक्षकांच्या बैठकीत फुटला संतापाचा बांध

ऐतिहासिक आणि पर्यटनदृष्ट्या महत्त्वाचे असलेल्या श्रीवर्धन शहरात सध्या चोरांनी धुमाकूळ घातला असून, सामान्य जनता दहशतीखाली वावरत आहे. शहराच्या सुरक्षिततेसाठी बसवण्यात आलेली तीसरी आंख म्हणजेच सीसीटीव्ही यंत्रणाच व्हेंटिलेटरवर असल्याचे समोर आले आहे. शहरातील एकूण ९३ कॅमेऱ्यांपैकी तब्बल ५२ कॅमेरे धूळखात पडून असल्याने गुन्हेगारांचे धाडस वाढले आहे. या गंभीर परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी अप्पर पोलीस अधीक्षक अभिजित शिवतारे यांनी श्रीवर्धनमध्ये धाव घेत आक्रमक पावले उचलण्याचे संकेत दिले आहेत.

गेल्या काही दिवसांपासून शहरात घरफोडीच्या तीन मोठ्या घटना घडल्या आहेत. मात्र, जेव्हा पोलीस तपास करण्यासाठी सीसीटीव्ही फुटेज पाहायला गेले, तेव्हा बहुतांश ठिकाणचे कॅमेरे बंद असल्याचे आढळले. विशेष म्हणजे, ज्या भागात चोऱ्या झाल्या, त्याच भागातील कॅमेरे तांत्रिक बिघाडामुळे बंद होते. यामुळे पोलिसांना तपासात मोठे अडथळे येत आहेत.

केवळ चोऱ्याच नव्हे, तर रात्रीच्या वेळी अज्ञातांकडून घरांच्या दरवाजावर टकटक करणे, छतावर दगडफेक करणे आणि डोंगरदऱ्यांच्या दिशेने पळून जाणे असे संशयास्पद प्रकार वाढले आहेत. यामुळे रात्रीच्या वेळी घराबाहेर पडणेही कठीण झाले असून, महिला आणि मुलांमध्ये भीतीचे वातावरण आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी सविता गर्जे यांनी बैठकीत स्पष्टपणे सांगितले की, सीसीटीव्हीची देखभाल ही नगरपरिषदेची जबाबदारी आहे. यंत्रणा असूनही ती कार्यान्वित का नाही? असा सवाल आता विचारला जात आहे. यावेळी नगरसेवकांनी लेखी निवेदन देऊन तपासाची मागणी केली असून, नगराध्यक्षांनी कॅमेरे तातडीने दुरुस्त करण्याचे आदेश प्रशासनाला दिले आहेत.

> “शहरातील सुरक्षिततेशी कोणतीही तडजोड केली जाणार नाही. सीसीटीव्ही तातडीने कार्यान्वित करण्याच्या सूचना दिल्या आहेत. पोलिसांची गस्त वाढवण्यात आली असून, गुन्हेगारांना लवकरच बेड्या ठोकल्या जातील. नागरिकांनी घाबरून न जाता सतर्क राहावे.”
>
> – अभिजित शिवतारे, अप्पर पोलीस अधीक्षक

# तळोजा परिसरात सांडपाण्याची समस्या गंभीर

## राष्ट्रवादी युवक काँग्रेसची तातडीच्या कारवाईची मागणी



| पनवेल | विशेष प्रतिनिधी |

### सांडपाणी रस्त्यावर आल्याने आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर

### तात्काळ उपाययोजना करण्यासाठी लेखी निवेदन सादर

तळोजा गावातील नॅशनल उर्दू शाळा परिसरात सांडपाण्याची गंभीर समस्या निर्माण झाली असून, याबाबत राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्यावतीने पनवेल महानगरपालिकेकडे तक्रार करण्यात आली आहे. पनवेल शहर जिल्हा राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष शहाबाज फारूक पटेल यांनी शहर अभियंता यांना लेखी निवेदन सादर करून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, शाळा परिसरात गटाराचे सांडपाणी रस्त्यावर व परिसरात साचत असून त्यामुळे तीव्र दुर्गंधी पसरली आहे. या समस्येमुळे स्थानिक नागरिक, विद्यार्थी तसेच शाळेत येणाऱ्या लहान मुलांच्या आरोग्यास गंभीर धोका निर्माण झाला आहे. संसर्गजन्य आजार पसरू शकण्याची भीतीही व्यक्त करण्यात आली आहे.

याशिवाय, सांडपाण्यामुळे रस्ता घसरडा झाला असून अपघात होण्याची शक्यता वाढली आहे. त्यामुळे नागरिकांच्या दैनंदिन जीवनावरही परिणाम होत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित अधिकाऱ्यांनी तात्काळ पाहणी करून सांडपाण्याचा योग्य निचरा करावा, गटार दुरुस्ती व स्वच्छता कामे हाती घ्यावीत तसेच कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी जिल्हाध्यक्ष शहाबाज फारूक पटेल यांनी केली आहे.

# तिसरी धावपट्टी की तिसरा घाव?

## विमानतळ विस्ताराच्या घोषणेत गावकऱ्यांचा आवाज दाबला जातोय!

| उरण | प्रतिनिधी |

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या विस्तारासाठी सिडकोकडून तिसऱ्या धावपट्टीची मोठी घोषणा करण्यात आली असली, तरी या निर्णयामागील वास्तवामुळे स्थानिक गावकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. वाढत्या हवाई वाहतुकीचा दाखला देत सिडकोने तांत्रिक व्यावसायिक व्यवहार्यता अभ्यासासाठी राईट्स लिमिटेड आणि क्रिएटिव्ह ग्रुप एलएलपी या संयुक्त संस्थेची नियुक्ती केली आहे. मात्र, हा अभ्यास विकासाचा आराखडा ठरणार की पुन्हा एकदा जमिनी हिसकावण्याची प्रक्रिया सुरू होणार, असा सवाल उपस्थित केला आहे.



या अभ्यासासाठी सुमारे ९७ लाख रुपये खर्च होणार असून पुढील सहा महिन्यांत अहवाल सादर होणार आहे. तिसऱ्या धावपट्टीसाठी तब्बल ९०० हेक्टर अतिरिक्त जमिनीची गरज भासणार असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. सध्याच्या ११६० हेक्टर क्षेत्रासह विमानतळाचा विस्तार २ हजार हेक्टरपर्यंत जाण्याची शक्यता असून, हा प्रकल्प देशातील सर्वात मोठ्या विमानतळांपैकी एक ठरेल, असा दावा सिडकोकडून केला जात आहे. मात्र, या भव्यतेच्या दाव्यांमागे स्थानिकांच्या मूलभूत समस्या अद्यापही कायम आहेत. पारगाव, दापोली, डुंगी, वरचे ओवळे आणि कुंडेवहाळ या गावांमध्ये विमानतळ प्रकल्पामुळे वारंवार पूरस्थिती निर्माण होत असल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली आहे. “आमच्या जमिनी प्रकल्पात समाविष्ट करा आणि योग्य पुनर्वसन द्या,” अशी मागणी अनेकदा करूनही त्याकडे दुर्लक्षच होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. दरम्यान, आमदार महेश बालदी यांनी हा मुद्दा मुख्यमंत्र्यांकडे मांडल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी पाहणीदरम्यान तिसऱ्या धावपट्टीची घोषणा केली होती. त्यानंतर सिडकोला व्यवहार्यता अहवाल तयार करण्याचे निर्देश देण्यात आले. मात्र, घोषणा आणि बैठकींपलीकडे स्थानिकांच्या प्रश्नांवर ठोस कारवाई अद्याप दिसून आलेली नाही.

बेलापूर येथील सिडको भवनात उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत भविष्यात ९० दशलक्ष प्रवासी आणि ३.२ दशलक्ष टन मालवाहतूक हाताळण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले. मात्र, “प्रवासी वाढतील, विमानं उडतील; पण आमचं काय?” हा प्रश्न स्थानिकांच्या मनात कायम आहे. राईट्स लिमिटेडसारख्या ‘नवरत्न’ कंपनीकडून सर्वंकष अभ्यास केला जाणार असला, तरी या अहवालातून स्थानिकांचे पुनर्वसन, पर्यावरणीय परिणाम आणि पूरस्थितीवर ठोस उपाययोजना मांडल्या जातील का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. “विकासाच्या नावाखाली गावं उद्ध्वस्त करण्याचा जुना खेळ आता चालणार नाही,” असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. सिडकोने जर खरोखरच विकास साधायचा असेल, तर प्रकल्पग्रस्तांचा विश्वास जिंकणे गरजेचे आहे. अन्यथा, तिसऱ्या धावपट्टीसोबत संघर्षाची नवी धावपट्टीही तयार होईल, हे निश्चित.

# विद्यानंद ओव्हाळ, अजय कदम यांचा सन्मान

| वेनगाव | प्रतिनिधी |

रायगड प्रेस क्लबच्या २१ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित विशेष समारंभात कर्जत प्रेस क्लबचे पत्रकार विद्यानंद ओव्हाळ आणि माथेरान प्रेस क्लबचे पत्रकार अजय कदम यांचा मानाचा सन्मान करण्यात आला. पत्रकारितेतील योगदानाबरोबरच सामाजिक प्रश्नांवर सातत्याने आवाज उठविणाऱ्या या दोन्ही पत्रकारांच्या कार्याची दखल घेत हा गौरव प्रदान करण्यात आला.



या कार्यक्रमात कर्जत प्रेस क्लबचे पत्रकार विद्यानंद ओव्हाळ यांना ‘ॲड. जनार्दन पाटील स्मृती शोध पत्रकारिता पुरस्कार’ देऊन गौरविण्यात आले. तर माथेरान प्रेस क्लबचे पत्रकार अजय कदम यांना ‘रायगड प्रेस क्लब विशेष सन्मान’ प्रदान करण्यात आला.

हा सन्मान राज्याचे मंत्री नितेश राणे, विधान परिषदेचे गटनेते प्रवीण दरेकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. पनवेल येथे पार पडलेल्या या सोहळ्याला पत्रकार, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर आणि विविध राजकीय क्षेत्रातील प्रतिनिधींची मोठी उपस्थिती होती.

विद्यानंद ओव्हाळ यांनी कर्जत परिसरातील विविध स्थानिक प्रश्न, नागरिकांच्या अडचणी, प्रशासनातील त्रुटी आणि सर्वसामान्यांच्या समस्यांवर सातत्याने शोध पत्रकारितेद्वारे प्रकाश टाकला आहे. त्यांच्या बातम्यांमुळे अनेक प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी चालना मिळाल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. त्याचप्रमाणे अजय कदम यांनी माथेरान परिसरातील पर्यटन, पर्यावरण, स्थानिक नागरिकांचे प्रश्न, सामाजिक उपक्रम आणि सार्वजनिक हिताच्या विषयांवर सातत्याने प्रभावी पत्रकारिता केली आहे. त्यामुळे त्यांच्या कार्याचा विशेष सन्मान करण्यात आल्याने पत्रकारितेच्या क्षेत्रात समाधान व्यक्त होत आहे.

# आज पोलादपुरात सकल हिंदू संमेलन

| पोलादपूर | प्रतिनिधी |

“हिंदू सारा एक मंत्र हा दाही दिशांना घुमवू या, धरती-नभ-पाताळ ही भारू, प्राण पणाला लावू या” या घोषवाक्याने एकात्मतेचा संदेश देत पोलादपूर विभागात सकल हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार, दि. १७ एप्रिल रोजी सायंकाळी ५ ते ८ या वेळेत प्रभात नगर येथील मंगलमूर्ती पार्क येथे हे संमेलन रंगणार असून, यामध्ये समाजातील मतभेद व मनभेद दूर करून एकजूट मजबूत करण्याचा निर्धार व्यक्त केला जाणार आहे.

संमेलनात आकर्षक सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल राहणार असून, मान्यवर वक्ते समाजजागृती, एकात्मता आणि संघटन या महत्त्वपूर्ण विषयांवर मार्गदर्शन करणार आहेत. समाजातील विविध घटकांना एकत्र आणून सामाजिक प्रश्नांवर सामूहिक तोडगा काढण्याचा संदेश या माध्यमातून दिला जाणार आहे.

या संमेलनास सर्व नागरिकांनी सहकुटुंब, सहपरिवार पारंपारिक वेशात मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक सकल हिंदू समाज, पोलादपूरतर्फे करण्यात आले आहे. सोशल मीडियावरून व्हायरल झालेल्या या कार्यक्रमाच्या निमंत्रण पत्रिकेत प्रभू श्रीराम, छत्रपती शिवाजी महाराज, भगवान गौतम बुद्ध आणि भारतमातेच्या प्रतिमांचा संदर्भ हिंदू एकात्मतेच्या संमेलनासाठी करण्यात आला आहे.

# कळंबोलीतील ‘रॉयल स्टॅग बूम’ कॉन्सर्टवर वादळ

## समाजसेवक प्रशांत रणवरे यांचा तीव्र विरोध

| पनवेल | विशेष प्रतिनिधी |

कळंबोलीरोडपालीपरिसरातील मैदानावर येथील २५ एप्रिल रोजी ‘रॉयल स्टॅग बूम’ या नावाने लाईव्ह कॉन्सर्ट आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमावरून वाद निर्माण होण्याची शक्यता असून, समाजसेवक प्रशांत रणवरे यांनी या कार्यक्रमाला तीव्र विरोध दर्शविला आहे.

मद्य प्रायोजित या कार्यक्रमामुळे शहरातील तरुणांवर नकारात्मक परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करत त्यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांच्याकडे या कार्यक्रमाला परवानगी नाकारण्याची मागणी केली आहे. प्रशांत रणवरे यांनी दिलेल्या निवेदनानुसार, अशा प्रकारच्या मोठ्या कॉन्सर्टमधून नशेला अप्रत्यक्ष प्रोत्साहन मिळते आणि त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. अलीकडेच मुंबईतील नेस्को सेंटर येथे झालेल्या एका कार्यक्रमात अमली पदार्थांच्या सेवनामुळे दोन तरुणांचा मृत्यू झाल्याची घटना घडल्याचे त्यांनी नमूद केले. या घटनेनंतर अशा कार्यक्रमांच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. तसेच, खारघर येथे पार पडलेल्या एका आंतरराष्ट्रीय कॉन्सर्टमध्ये कलाकारांकडून नशेला प्रोत्साहन देणारी विधाने करण्यात आल्याचा आरोपही रणवरे यांनी केला. या पार्श्वभूमीवर कळंबोलीतील प्रस्तावित कार्यक्रमाबाबत प्रशासनाने अधिक सतर्कता बाळगणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, राज्यात ‘नशामुक्त महाराष्ट्र’ मोहिम राबविण्यात येत असताना अशा मद्य प्रायोजित कार्यक्रमांमुळे या मोहिमेला धक्का बसण्याची भीती त्यांनी व्यक्त केली. तरुण पिढीमध्ये चुकीचे संदेश जाऊ नयेत, यासाठी प्रशासनाने जबाबदारीने निर्णय घ्यावा, असेही त्यांनी स्पष्ट केले.

या कार्यक्रमामुळे तरुणांमध्ये नशेचे आकर्षण वाढण्याची, अमली पदार्थांच्या वापरास चालना मिळण्याची तसेच शहराच्या सामाजिक आणि सांस्कृतिक वातावरणावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असल्याचे रणवरे यांनी नमूद केले. त्यामुळे नवी मुंबईची सुरक्षित आणि सुसंस्कृत शहर म्हणून असलेली ओळख कायम राखण्यासाठी अशा कार्यक्रमांवर नियंत्रण ठेवणे आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. सध्या याप्रकरणी पोलीस प्रशासनाकडून अधिकृत भूमिका जाहीर होण्याची प्रतीक्षा असून, नागरिकांचे लक्ष याकडे लागले आहे.

### खासदार बारणे यांचं आश्वासन

याप्रकरणी मावळचे खासदार श्रीरंग अप्पा बारणे यांनी लक्ष घालावे याकरिता समाजसेवक रणवरे यांनी खासदार बारणे यांच्याशी भ्रमणध्वनीवर संपर्क साधला असता, या प्रकारावर लक्ष घालणार असल्याचे आश्वासन खा. बारणे यांनी दिल्याची माहिती रणवरे यांनी दिली आहे.

# महापुरुषांचा अवमान करणाऱ्यांवर गुन्हा दाखल करा

## रघुजीराजे आंग्रे, ॲड. मानसी म्हात्रे यांची मागणी

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

पुणे येथील रमेश भिडे या व्यक्तीने सोशल मीडियावर महापुरुषांचा अवमान केला. याविरोधात रघुजीराजे आंग्रे आणि अलिबागच्या उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे यांनी पोलीस निरीक्षक किशोर साळे यांची भेट घेऊन संबंधिताविरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. याबाबत त्यांच्याकडे तक्रार अर्ज देण्यात आला आहे.

रमेश भिडे नामक व्यक्तीने फ`सबुक अकाऊंटच्या माध्यमातून स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल अर्वाच्य भाषेत नुकतीच एक पोस्ट केली होती. या पोस्टमध्ये हिंदवी स्वराज्याच्या आरमाराची धुरा सांभाळणारे सरखेल कान्होजी राजे आंग्रे व आंग्रे घराण्याबद्दलदेखील बदनामी केली आहे. विश्वरत्न भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दलदेखील अतिशय खालच्या पातळीवर व अर्वाच्य भाषेत या भिडेने पोस्ट केली. याबाबत रघुजीराजे आंग्रे यांनी तातडीने सर्व माहिती गोळा करून या भिडेविरुद्ध तक्रार दाखल करण्याचे ठरविले. अलिबाग नगरपालिकेच्या उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे आणि रघुजीराजे आंग्रे यांनी गुरुवारी (दि.१६) अलिबाग पोलीस ठाणे गाठले. महापुरुषांचा अपमान करून सामाजिक सलोखा बिघडवणाऱ्या रमेश भिडेविरुद्ध गुन्हा दाखल करण्याबाबत तक्रार अर्ज देण्यात आला. अलिबाग पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक किशोर साळे यांनी तात्काळ याबाबत कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे.




## सिडकोच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह | बेकायदेशीर साम्राज्यांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष?

# उरण-पनवेलमधील अतिक्रमणांना अभय?

| उरण | प्रतिनिधी |

जांभूळपाडा व बेलोंडा खार परिसरात सिडकोच्या लॉजिस्टिक पार्कसाठी आरक्षित जमिनीवर उभारलेल्या बेकायदेशीर कंटेनर यार्डवर मोठी कारवाई करत बुलडोझर चालवण्यात आला. तब्बल १,२०,४३७ चौ. मीटर क्षेत्रावरील अतिक्रमण जमीनदोस्त करण्यात आले. परंतु, या कारवाईनंतर आता सिडकोच्या भूमिकेवरच गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत. उरण-पनवेल तालुक्यातील अनेक वर्षांपासून फोफावलेल्या बेकायदेशीर साम्राज्यांकडे अद्यापही जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचा संतापजनक आरोप जनतेतून होत आहे.

सिडकोच्या अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाने जांभूळपाडा (सर्वे क्रमांक ५०,५१,५२) आणि बेलोंडा खार (सर्वे क्रमांक ४६ ते ६०) येथील कंटेनर यार्डवर पोकलेनच्या सहाय्याने कारवाई केली. त्यामध्ये यार्ड कार्यालये, पत्र्याची कुंपणे आणि इतर बांधकामे जमीनदोस्त करण्यात आली. ही कारवाई मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांच्या निर्देशानुसार आणि मुख्य नियंत्रक विशाल ढगे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या मोहिमेत पोलीस, महावितरण, सिडको सुरक्षा पथक इत्यादी यंत्रणांचा मोठा फौजफाटा सहभागी होता. परंतु, या कारवाईनंतर ‘हीच कडक भूमिका सर्वत्र का दिसत नाही?’ असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे. कारण उरण-पनवेल परिसरात सिडकोच्या जागांवर वर्षानुवर्षे बेकायदेशीर कंटेनर यार्ड, ढाबे, पार्किंग आणि इतर बांधकामे अक्षरशः बोकाळली आहेत. काही ठिकाणी तर सरकारी जमिनीवर खुलेआम व्यवसाय सुरू असूनही प्रशासन मात्र शांत बसल्याचे दिसते. ‘छोट्यांवर बुलडोझर आणि मोठ्यांना मोकळीक’ हीच कार्यपद्धती सुरू आहे, अशी टीका जोर धरू लागली आहे.



याहून गंभीर म्हणजे, या सर्व प्रकारामागे आर्थिक लागेबांधे असल्याचा आरोपही पुढे येत आहे. ‘मलिदा’ मिळणाऱ्यांना अभय आणि इतरांवर कारवाई, अशीच परिस्थिती असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. अनेक वर्षे उभे असलेले बेकायदेशीर यार्ड, ढाबे आणि पार्किंग व्यवसाय कोणाच्या आशीर्वादाने सुरू आहेत? असा जळजळीत सवाल आता उघडपणे विचारला जात आहे.

दरम्यान, जांभूळपाड्यावर कारवाई करून सिडकोने कडक भूमिका घेतल्याचा दावा केला असला, तरी उरण-पनवेलमधील सर्व अतिक्रमणांवरही तातडीने एकसमान कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे. अन्यथा ही कारवाई केवळ दाखवण्यासाठी असून, पडद्यामागे आर्थिक व्यवहारांचा खेळ सुरू असल्याचा आरोप अधिकच बळावणार आहे. त्यामुळे आता सिडको खरोखरच निष्पक्षपणे सर्व बेकायदेशीर बांधकामांवर कारवाई करते की पुन्हा एकदा बड्या अतिक्रमणधारकांना पाठीशी घालते, याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९। अंक ३०८ । पृष्ठे १० ▌ RGD/016/2026-28 www.krushival.in

## काँग्रेसमध्ये अंतर्गत संघर्ष उफाळला

नागपूर : महापालिकेतील स्वीकृत सदस्यांच्या निवडीवरून माजी मंत्री डॉ. नितीन राऊत यांनी शहर अध्यक्ष विकास ठाकरे यांच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत. प्रदेशाध्यक्षांनी दोन्ही नेत्यांचा एकेक स्वीकृत सदस्य घ्यायच्या सूचना दिल्या असताना आ. विकास ठाकरे यांनी दोन्ही स्वीकृत सदस्य स्वतःच्या मनाप्रमाणे केले. पक्षात एवढा अपमान होत असेल तर मला व माझ्या नगरसेवकांना भूमिका घ्यावी लागेल. मी पक्षदेखील सोडेल, असा इशारा राऊत यांनी दिला आहे. त्यांनी प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्याकडे या प्रकरणाची तक्रार केली आहे.

रायगड, शुक्रवार, दि. १७ एप्रिल २०२६

# कृषीवल

किंमत ४ ₹

## जळगावातही भोंदूकडून फसवणूक

**जळगाव :** नाशिकच्या अशोक खरातनंतर आता जळगाव शहरात अघोरी विद्या करणे, घरातील बाधा दूर करणे आणि गुप्तधन देण्याच्या नावाखाली एका महिला ग्राफिक्स डिझायनरची तब्बल ११ ते १२ लाख रुपयांची फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी भोंदूबाबा ललित पाटील आणि त्याची महिला पोलीस कर्मचारी पत्नी महिमा उर्फ मनोरमा पाटील यांच्याविरुद्ध २०२२ मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र, साडेतीन ते चार वर्षांचा कालावधी उलटूनही दोन्ही आरोपी अद्याप फरारच आहेत. पीडित फिर्यादी महिलेनं नुकतीच जळगाव पोलीस अधीक्षकांची भेट घेत आरोपींना शोधून तिचे पैसे परत मिळवून देण्याची विनंती केली आहे.

# उष्णतेचा यलो अलर्ट

## ■ रायगडात पुढील चार दिवस सूर्य कोपणार ■ हवामान विभागाचा इशारा

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यात उष्णतेचा पारा दिवसेंदिवस चढत असून, गुरुवारी तापमान ४० अंश सेल्सिअसपर्यंत नोंदवले गेले आहे. वाढत्या उष्णतेमुळे नागरिक हैराण झाले असून, दुपारच्या वेळेत घराबाहेर पडणे टाळत आहेत. हवामान विभागाने पुढील काही दिवस जिल्ह्यात उष्णतेची लाट येण्याचा इशारा दिला असून, हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे.

जिल्ह्यात सकाळपासूनच कडक उन्हाची तीव्रता जाणवत असून, दुपारी तापमानाचा पारा उच्चांक गाठत आहे. विशेषतः सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत उघड्या उन्हात बाहेर पडणे धोकादायक ठरू शकते, असा इशारा प्रशासनाने दिला आहे. उष्माघाताचा धोका लक्षात घेता नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

पान ५ वर



### लिंबाचे भाव वाढले

उन्हाळ्याच्या तीव्रतेमुळे बाजारात लिंबाची मागणी वाढली असून, त्याचे दरही मोठ्या प्रमाणावर वाढले आहेत. सध्या बाजारात २०० ते ३०० रुपये किलो दराने लिंबाची विक्री करण्यात येत असून, किरकोळ विक्री प्रतवारीनुसार २० रुपयांना दोन-तीन अशा प्रकारे विक्री करण्यात येत आहे. नागरिक लिंबूपाण्याचा अधिक वापर करत असल्याने विक्रेत्यांकडूनही दर वाढवण्यात आले आहेत.

### काय काळजी घ्यावी

- भरपूर पाणी आणि द्रवपदार्थ (ताक, कोकम सरबत, लिंबूपाणी, नारळपाणी) प्या
- हलके, सैल आणि फिकट रंगाचे कपडे परिधान करा
- डोक्यावर टोपी, रुमाल किंवा छत्रीचा वापर करा
- शक्यतो घरातच राहा आणि थेट सूर्यप्रकाश टाळा
- बाहेर पडताना पाण्याची बाटली सोबत ठेवा
- दही, ताक, फळांचे रस यांसारखे थंड पदार्थ आहारात घ्या
- उष्माघाताची लक्षणे (चक्कर, मळमळ, डोकेदुखी) दिसल्यास त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्या

### काय टाळावे

- सकाळी १० ते दुपारी ३ दरम्यान उन्हात जाणे टाळा
- जास्त वेळ थेट उन्हात काम करणे टाळा
- गरम, तळलेले आणि मसालेदार पदार्थ खाणे टाळा
- गॅस सिलिंडर किंवा ज्वलनशील वस्तू उन्हात ठेवू नका
- शरीरातील पाण्याची कमतरता होईल असे पेय (अति चहा, कॉफी) टाळा
- एसीचे तापमान खूप कमी ठेवणे टाळा (अचानक तापमान बदल टाळा)
- रिकाम्या पोटी उन्हात बाहेर पडणे टाळा

> “नागरिकांनी दुपारी १२ ते ३ दरम्यान थेट सूर्यप्रकाशात बाहेरील कामे टाळावीत आणि शरीरात पाण्याची कमतरता होऊ नये यासाठी भरपूर पाणी पिणे आवश्यक आहे. जिल्हा आरोग्य प्रशासनाकडून जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय तसेच ग्रामीण रुग्णालयांमध्ये उष्माघात कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. त्याठिकाणी गरजेनुसार पाच ते दहा बेड राखीव ठेवण्यात आले असून, रुग्णांना तात्काळ एसीची सुविधा आणि ओआरएसची व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच परिस्थितीनुसार आवश्यक उपचार करण्याची पूर्ण तयारी ठेवण्यात आली आहे.
> – डॉ. निशिकांत पाटील, जिल्हा शल्यचिकित्सक, रायगड”

## वेधक

### मोठा विमान अपघात टळला

**नवी दिल्ली :** दिल्ली विमानतळावर एक मोठा विमान अपघात होता-होता टळला आहे. दोन विमानांच्या पंखांची टक्कर झाली आहे. या धडकेनंतर सर्व प्रवाशांना विमानातून बाहेर काढण्यात आले आणि विमानांची उड्डाणे थांबवण्यात आली. स्पाईसजेट आणि अकासा एअरच्या विमानांच्या पंखांची ही टक्कर झाल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. अकासा एअरचे विमान दिल्लीहून हैदराबादला जात होते. ही घटना टर्मिनल १ जवळ घडली. आकासा एअरचे विमान (क्यूपी १४०६) दिल्लीहून हैदराबादकडे जाण्यासाठी पुशबॅकनंतर तयार उभे होते. त्याच वेळी लेहहून आलेले स्पाइसजेटचे बोईंग ७३७-७०० विमान टॅक्सी करत होते. टॅक्सींगच्या दरम्यान स्पाइसजेटच्या विमानाने आकासा एअरच्या विमानाला धक्का दिला.

### विजेच्या धक्क्याने शेतकऱ्यांचा मृत्यू

**नाशिक :** जिल्ह्यात धक्कादायक घटना घडली आहे. विजेचा धक्का लागून दोन शेतकऱ्यांचा जागीच मृत्यू झाला आहे. साकोरा इथं ही दुर्दैवी घटना घडली आहे. पांझण नदीवरील वीजपंप दुरुस्ती करतेवेळी ही घटना घडली आहे. शिरीष भगवान पठाडे (४२) व जगदीश तुकाराम खैरनार अशी मृत शेतकऱ्यांची नावे आहेत. हे दोघे तरुण शेतकरी पांझण नदीवर वीज पंप सुरु करण्यासाठी गेले. मात्र, विजपंप पाण्याबाहेर असल्याने तो पाण्यात खेचण्याच्या प्रयत्नात पाण्यात अचानक वीजपुरवठा सुरू झाल्याने दोघा शेतकऱ्यांना विजेचा तीव्र झटका बसल्याने दोघांचा जागीच मृत्यू झाला आहे.

### अन्यथा कारवाई करण्याचा इशारा

**पुणे :** राज्यातील सर्व माध्यमांच्या आणि सर्व व्यवस्थापनांच्या शाळांनी विद्यार्थ्यांना गणवेश, पुस्तके आणि इतर शैक्षणिक साहित्य विशिष्ट दुकानातून किंवा शाळेतूनच खरेदी करण्याची सक्ती करू नये, असे कडक निर्देश शिक्षण संचालनालयाने दिले आहेत. शासनाच्या ११ जून २००४ च्या निर्णयाची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे आदेश प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी आणि माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी दिले आहे. ज्या शाळांकडून घालण्यात आलेल्या नियमांचे उल्लंघन करण्यात येईल, त्या शाळांवर कडक कारवाई करण्याचा इशारा शिक्षण विभागाने दिला आहे.

### सरकारी कर्मचाऱ्यांना शानदार घरे

**मुंबई :** राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांसाठी आनंदाची बातमी असून, आता शासकीय निवासस्थानी राहणाऱ्या कर्मचारी व अधिकाऱ्यांना शानदार घरात राहायला मिळणार आहे. कारण, शासकीय कर्मचाऱ्यांच्या घराच्या चटई क्षेत्रफळात वाढ करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी घेतला. त्यामुळे, शासकीय कर्मचारी व अधिकाऱ्यांची घरे अधिक आधुनिक, सुसज्ज आणि प्रशस्त होणार असून, सातव्या वेतन आयोग व वेतनगटांनुसार निवासस्थानांचे चटई क्षेत्रफळांची निश्चिती करण्यात आली आहे. नव्या बांधकाम प्रकल्पांसाठी हा निर्णय लागू होणार आहे.

# आज विकासकामांचा भूमीपूजन सोहळा

## चित्रलेखा पाटील यांची प्रमुख उपस्थिती

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील विविध विकास कामांना चालना देण्यासाठी तीन ग्रामपंचायतींच्या नवीन इमारतींचा भूमीपूजन सोहळा शुक्रवारी (दि. १७) सायंकाळी आयोजित करण्यात आला आहे. शेतकरी कामगार पक्षाच्या प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा उत्साहात पार पडणार आहे.

अलिबाग तालुक्यातील आक्षी, बेलकडे आणि बामणगाव या ग्रामपंचायतींच्या नवीन इमारतींच्या कामांचा शुभारंभ यानिमित्ताने करण्यात येणार आहे. आक्षी ग्रामपंचायत इमारतीचे भूमीपूजन सायंकाळी ४ वाजता, बेलकडे ग्रामपंचायत इमारतीचे भूमीपूजन सायंकाळी ५ वाजता, तर बामणगाव ग्रामपंचायत इमारतीचे भूमीपूजन सायंकाळी ६ वाजता होणार आहे. प्रत्येक ठिकाणी स्थानिक नागरिकांच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पडणार असून, विकासाच्या दृष्टीने हा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

या नव्या इमारतींमुळे ग्रामपंचायतींच्या प्रशासकीय कामकाजाला अधिक गती मिळणार असून, नागरिकांना विविध सेवा अधिक सुलभतेने उपलब्ध होणार आहेत. तसेच स्थानिक पातळीवर पायाभूत सुविधा मजबूत करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

या कार्यक्रमास विभागातील सरपंच, सदस्य, पदाधिकारी तसेच कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन तालुका चिटणीस सुरेश घरत यांनी केले आहे.

# नवगाव ग्रामपंचायतीवर लाल बावटा

## सरपंचपदी अंकिता जैतू बिनविरोध

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील नवेदर नवगाव ग्रामपंचायतीच्या सरपंचपदासाठी घेण्यात आलेल्या पोटनिवडणुकीत अंकिता प्रणय जैतू यांची बिनविरोध निवड झाली आहे. या पदासाठी त्यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने त्यांची निवड निश्चित झाली असून, ग्रामपंचायतीवर शेतकरी कामगार पक्षाचा लाल बावटा फडकला आहे.

अलिबाग तालुक्यात नवेदर नवगाव, कोप्रोली, रेवदंडा, वैजाली, खंडाळे आणि नागाव या सहा ग्रामपंचायतींमध्ये एका सरपंच पदासह दहा सदस्य पदांसाठी पोटनिवडणुका घेण्यात आल्या आहेत. यामध्ये नवेदर नवगाव ग्रामपंचायतीच्या थेट सरपंच पदासाठी शेतकरी कामगार पक्षाच्या अंकिता प्रणय जैतू यांचा एकमेव अर्ज दाखल झाला होता.



अर्ज दाखल करण्याच्या प्रक्रियेनंतर अन्य कोणताही उमेदवार पुढे न आल्याने अंकिता जैतू यांची सरपंचपदी बिनविरोध निवड झाल्याचे अधिकृतरीत्या जाहीर करण्यात आले. त्यांच्या निवडीमुळे स्थानिक पातळीवर आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, कार्यकर्त्यांमध्ये उत्साह पाहायला मिळत आहे.

अंकिता जैतू यांच्या बिनविरोध निवडीबद्दल सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील, पक्षाच्या प्रवक्त्या चित्रलेखा पाटील तसेच तालुका चिटणीस सुरेश घरत यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला आहे. दरम्यान, यावेळी नवनिर्वाचित सरपंच अंकिता जैतू यांनी पक्षश्रेष्ठींनी दाखवलेला विश्वास कामातून दाखवून देईन, तसेच नवगावचा विकास करेन, असा विश्वासही व्यक्त केला.

# अवैध उमेदवाराला वाचवण्याचा प्रयत्न?

## ।। निवडणूक विभागावर प्रश्नचिन्ह ।। मंगेश राणे यांच्या तक्रार अर्जावर तहसीलदारांचे मौन

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यात ग्रामपंचायत पोटनिवडणुका जाहीर झाल्या असून, या स्थानिक निवडणूक प्रक्रियेत अनेक गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. नागाव ग्रामपंचायत पोटनिवडणूक प्रक्रियेत शेकापचे मंगेश राणे व मंजूषा राणे यांनी अर्ज दाखल केले होते. तर, विरोधात मंगेश आठवले व शिल्पा आठवले यांनी अर्ज दाखल केले होते. बुधवारी (दि.१५) अर्ज छाननी प्रक्रियेदरम्यान मंगेश आठवले व शिल्पा आठवले यांच्या अर्जात त्रुटी असल्याचे समोर आले. याबाबत मंगेश राणे यांनी आक्षेप घेतला असून, ती बाब निवडणूक अधिकारी विक्रम पाटील यांच्या निदर्शनासही

पान ५ वर

### ■ तहसीलदार दबावाखाली?

> “नागाव पोटनिवडणुकीसाठी मंगेश आठवले व शिल्पा आठवले यांनी नामनिर्देशन अर्ज दाखल केले आहेत. मात्र, त्यांनी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात अभिसाक्षी म्हणून उमेदवाराची लागणारी सही नाही. तसेच उमेदवाराची सही नसताना नोटरी केली आहे. त्यांच्या अर्जात त्रुटी असून, या दोघांचे अर्ज अवैध ठरवावे.
> – मंगेश राणे, उमेदवार, नागाव”

### अन्याय सहन करणार नाही- चित्रलेखा पाटील



नागाव ग्रामपंचायत पोटनिवडणुकीत मंगेश आठवले यांच्या अर्जात गंभीर त्रुटी स्पष्टपणे समोर आल्या असतानाही निवडणूक यंत्रणा कारवाई करण्यास टाळाटाळ करत आहे. छाननी प्रक्रियेदरम्यान उपस्थितांनी स्वतः या त्रुटी पाहिल्याचे सांगितले असूनही अधिकाऱ्यांची भूमिका संशयास्पद ठरत आहे. नियम स्पष्ट असताना त्यांना बगल देत, कागदोपत्री खेळ करून अवैध अर्जाला वैध करण्याचा अट्टाहास सुरू आहे. विशेष म्हणजे, या प्रकरणात तक्रारी करूनही कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने निवडणूक विभागाच्या निष्पक्षतेवरच शंका निर्माण होत आहे. दरम्यान, संबंधित अर्जाची तात्काळ सखोल चौकशी करून नियमांनुसार तो अवैध ठरवावा. अन्यथा न्यायालयाचे दाद मागण्यात येईल. नियम धाब्यावर बसवून अन्याय चालणार नाही. नियम पायदळी तुडवले जात असतील, तर आम्ही गप्प बसणार नाही. शेवटपर्यंत लढू, असा कडक इशारा शेकापच्या प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी दिला आहे.

# भीषण अपघातात दोघे जखमी

## पिकअप टेम्पो चालकाविरुद्ध गुन्हा दाखल

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

अलिबाग-रेवदंडा मार्गावर पालव फाट्याजवळ वळणावर भरधाव पिकअप टेम्पोने मोटारसायकलला धडक दिल्याने झालेल्या अपघातात दोघे जखमी झाले आहेत. हा अपघात दि. १४ एप्रिल रोजी रात्री सुमारे ९.३० वाजण्याच्या सुमारास घडला.

मिळालेल्या माहितीनुसार, स्वप्नील जयवंत कवळे (३४, रा. नागाव) व सर्वेश सुभाष पाटील (२७, रा. वरंडे) हे दोघे स्प्लेंडर मोटारसायकल (क्र. एमएच-०६ सीबी-५५८०) वरून नागावकडून रेवदंडा दिशेने जात होते. बागमळा परिसरात पेट्रोल भरण्यासाठी जात असताना पालव फाट्याच्या पुढील वळणावर समोरून येणाऱ्या पिकअप टेम्पो (क्र. एमएच-०६-जेयू-५६६४) ने भरधाव वेगात व निष्काळजीपणे विरुद्ध बाजूला येत मोटारसायकलला जोरदार धडक दिली.

या धडकेत मोटारसायकलवरील दोघे खाली पडले. स्वप्नील कवळे यांना उजव्या पायाला दुखापत झाली असून, सर्वेश पाटील यांना उजव्या हात व मांडीला दुखापत झाली आहे. अपघातात पिकअप टेम्पो चालक किशोर काशिनाथ पाटील (४५, रा. सातपूर, नाशिक) यालाही किरकोळ दुखापत झाली आहे. याप्रकरणी रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा तपास पोलीस अधिकारी आर.के. थळे करीत आहेत.

# रेवंदडा ग्रामपंचायतीचा निष्क्रिय कारभार

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील रेवदंडा ग्रामपंचायतीच्या कारभाराचा बोजवारा उडाल्याचे चित्र हरेश्वर सार्वजनिक मैदानाच्या विदारक अवस्थेमुळे समोर आले आहे. ‘शिंदे गटाची’ सत्ता असलेल्या ग्रामपंचायतीलाच त्याच गटाचे ॲड. रोहित भोईर यांनी घरचा आहेर देत प्रशासनाच्या मनमानी कारभारावर जोरदार बोट ठेवले आहे.

मारुती आळीलगत असलेल्या हरेश्वर मैदानावर साईराज अपार्टमेंट या अनधिकृत इमारतीतून थेट सांडपाणी सोडले जात असल्याने मैदान अक्षरशः घाणीच्या विळख्यात सापडले आहे. एकेकाळी खेळाडू आणि मुलांनी गजबजलेले हे मैदान आज दुर्गंधी, कचरा आणि अतिक्रमणामुळे ओस पडण्याच्या मार्गावर आहे.



### ■ ॲड. रोहित भोईरांकडून घरचा आहेर

### ■ हरेश्वर मैदानावर सांडपाणी, अतिक्रमणाचा विळखा

> “हे मैदान वाचवण्यासाठी प्रशासनाने तातडीने कारवाई करावी. अन्यथा सात दिवसांत तीव्र आंदोलन छेडले जाईल. विकासाच्या नावाखाली घाण आणि अतिक्रमण चालू देणार नाही.– ॲड. रोहित भोईर, तक्रारदार”

ॲड. भोईर यांनी पान ५वर

# विधानपरिषद निवुडणुकीचा बिगुल वाजला

## नऊ जागांसाठी १२ मे रोजी मतदान

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या रिक्त होणाऱ्या नऊ जागांसाठी केंद्रीय निवडणूक आयोगाने निवडणूक कार्यक्रमाची घोषणा केली आहे. विधानपरिषदेच्या नऊ जागांसाठी २३ एप्रिलपासून अर्ज दाखल करता येणार असून, १२ मे रोजी मतदान होणार आहे. मतदानाच्या दिवशीच सायंकाळी ५ वाजता मतमोजणी होणार आहे. उद्धव ठाकरे, शशिकांत शिंदे यांच्यासह नऊ आमदारांचा कार्यकाळ १३ मे रोजी संपुष्टात येणार असल्याने रिक्त होणाऱ्या जागांसाठी ही निवडणूक होत आहे.

या निवडणुकीत निवृत्त होणाऱ्या सदस्यांमध्ये संजय किशनराव केनेकर (भाजप), नीलम दिवाकर गोऱ्हे (शिंदे गट), उद्धव बाळासाहेब ठाकरे (शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), संदीप दिवाकर जोशी, दादाराव यादवराव केचे (भाजप), अमोल रामकृष्ण मिटकरी (अजित पवार गट), रणजितसिंह विजयसिंह मोहिते-पाटील (भाजप), राजेश धोंडीराम राठोड (काँग्रेस) आणि शशिकांत जयवंतराव शिंदे (शरद पवार गट) यांचा समावेश आहे.

केंद्रीय निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या पान ५ वर

## आंबेगाव धरणाचे आरक्षित पाणी वापराविना पडून | पेणचा पाणीप्रश्न गंभीर

# धरण उशाला, कोरड घशाला!

**। पेण । प्रतिनिधी ।**

पेण शहराला अपुऱ्या दाबाने पाणीपुरवठा होत असताना आंबेगाव धरणातील १०० टक्के आरक्षित पाणी वापराविना पडून आहे. जलसंपत्ती असूनही नियोजनाअभावी ‘पाणी असूनही तहान’ अशी पेणकरांची अवस्था झाली आहे.



जलसंपदा विभागाच्या लघु पाटबंधारे योजनेत समाविष्ट असलेल्या आंबेगाव धरणातील पाणी पूर्णपणे पेण नगरपालिकेसाठी आरक्षित करण्यात आले असले, तरी प्रत्यक्षात त्याचा वापर होत नसल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. परिणामी, एकीकडे धरण पाण्याने भरलेले असताना दुसरीकडे पेणकरांना अपुऱ्या आणि कमी दाबाच्या पाणीपुरवठ्याचा सामना करावा लागत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, २०१३ पूर्वी आंबेगाव धरणातील पाणी परिसरातील शेतीसाठी मोठ्या प्रमाणात वापरले जात होते. विशेषतः दुबार पिकांसाठी हे पाणी उपयुक्त ठरत होते. मात्र, कालांतराने शेतीचे क्षेत्र कमी होऊन त्या ठिकाणी नागरीकरण वाढले. त्यामुळे शेतीसाठीचा पाण्याचा वापर घटला आणि पुढे हे पाणी पूर्णतः पेण नगरपालिकेसाठी राखीव ठेवण्यात आले. तथापि, आरक्षणानंतरही या पाण्याचा शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी प्रभावी वापर झालेला नाही. शहरातील अनेक भागांत नागरिकांना कमी दाबाने पाणी मिळते, तर काही ठिकाणी पाण्याचा पुरवठा अत्यल्प वेळेसाठीच होतो. त्यामुळे नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे.

स्थानिकांच्या मते, या समस्येचे मूळ कारण म्हणजे अपुरी वितरण व्यवस्था. आवश्यक पाइपलाईन, पंपिंग यंत्रणा आणि सुसंगत नियोजनाचा अभाव असल्याने धरणातील पाणी शहरापर्यंत पोहोचत नाही. परिणामी, उपलब्ध पान ५ वर

# ‘स्पा’च्या नावाखाली देहव्यापार




### ■ सीबीडी बेलापूरमध्ये पोलिसांची कारवाई

### ■ सात महिलांची सुटका

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

नवी मुंबईतील सीबीडी बेलापूर परिसरातील ‘स्पा पॅलेस’ या मसाज सेंटरमध्ये सुरू असलेल्या अनैतिक देहव्यापाराचा गुन्हे शाखेच्या पथकाने पर्दाफाश केला. या कारवाईत सात महिलांची सुटका करण्यात आली असून, स्पाच्या व्यवस्थापिकेला अटक करण्यात आली आहे.

गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाला मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, संबंधित स्पा सेंटरमध्ये पान ५ वर

# थेरोंडा येथे मटका जुगारावर छापा

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

रेवदंडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या थेरोंडा खंडेरावपाडा, पो. चौल, ता. अलिबाग येथे मटका जुगार चालवणाऱ्या एका व्यक्तीवर पोलिसांनी कारवाई करून गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई ८ एप्रिल रोजी रात्री सुमारे ७.४० वाजण्याच्या सुमारास करण्यात आली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी महेंद्र एकनाथ माहीमकर (६२, रा. थेरोंडा खंडेरावपाडा, पो. चौल, ता. अलिबाग, जि. रायगड) हा आपल्या घराच्या मागील नारळ-सुपारीच्या वाडीत मोकळ्या जागेत लोकांकडून पैसे स्वीकारून चिठ्ठ्यांवर आकडे लिहून ‘कल्याण मेन’ नावाचा मटका जुगाराचा पान ५ वर

## महालबाडी नंबर दोन

निव्वळ सत्ता मिळवण्यासाठी नरेंद्र मोदी आणि त्यांचे साथीदार कोणत्याही थराला जाऊ शकतात हे वेळोवेळी दिसले आहे. अलिकडे, महिलांच्या नावाने गळे काढले की मते मिळतात ही युक्ती यांना सापडली आहे. विविध राज्यांमधील लाडकी बहीण योजना ही तिचेच उदाहरण आहे. या योजनेतून लाखो महिलांना महिन्याला ठराविक पैसे मिळतात, याला कोणाचा विरोध असण्याचे कारण नाही. पण हे सगळे निवडणुकीत मते मिळवण्यासाठी केले गेले. महाराष्ट्रात लाखो अपात्र महिलांना शेकडो कोटी रुपये वाटले गेले. शिवाय यामुळे राज्याची तिजोरी रिकामी झाली असून अर्थव्यवस्थेचे कंबरडे मोडले आहे. पण मोदी वा भाजपला त्याची पर्वा नाही. याच धर्तीची महालबाडी नंबर दोन आता होऊ घातली आहे. नारी शक्ती वंदना दुरुस्ती विधेयक हे तिचे नाव आहे. यासाठी गुरुवारपासून तीन दिवसांचे अधिवेशन सुरू झाले. लोकसभेच्या जागा वाढवायच्या आणि त्यातल्या बहुतांश म्हणजे २४३ जागा महिलांसाठी राखीव ठेवायच्या असा मोदी सरकारचा प्रस्ताव आहे. ग्रामपंचायत ते लोकसभा सर्वत्र महिलांसाठी ५० टक्के नाही तरी, किमान ३३ टक्के आरक्षण असावे यासाठी गेल्या कित्येक वर्षांपासून महिला संघटना व सर्व पुरोगामी पक्ष आंदोलने करीत आहेत. म्हणजे म्हटले तरी मोदी सरकार त्यांचीच ही मागणी मान्य करीत आहे. पण ही गोष्ट वरवर दिसते आहे तितकी सरळ नाही. त्यात अनेक कुटील कारस्थाने दडलेली आहेत. भाजपच्या पाताळयंत्री राजकारणाला हे साजेसेच आहे. नारी शक्ती वंदन विधेयक २०२३ मध्ये संमत झाले होते. सर्व राज्यांच्या विधानसभा व लोकसभांमध्ये महिलांसाठी ३३ टक्के जागा राखीव ठेवण्याची तरतूद त्यामध्ये होती. साहजिकच त्याला त्यावेळी सर्व विरोधी पक्षांनीही पाठिंबा दिला होता. मात्र हे आरक्षण लगेच लागू होणारे नव्हते. २०२४ च्या लोकसभा निवडणुकांवर डोळा ठेवून मोदी सरकारने केवळ हे विधेयक कागदावर पास करून घेतले होते. प्रत्यक्षात ते २०२९ किंवा त्याही नंतर लागू होईल अशीच त्याची रचना करण्यात आली होती.

### जनगणना न करण्याचे कारस्थान

मोदी सरकारची नियत साफ असती तर त्याला या राखीव जागा विद्यमान लोकसभेमध्येही लागू करता आल्या असत्या. लोकसभेच्या सध्याच्या जागा ५४३ आहेत. त्यात एकतृतियांश जागा महिलांसाठी देण्याची तरतूद करता आली असती. किंवा समजा लोकसभेत ते मंजूर झाले नसते तर भाजपला एकतृतियांश महिलांना उमेदवारी देऊन इतर पक्षांसाठी धडा घालून देता आला असता. आपले हेतू खरोखरच उदात्त आहेत हे दाखवता आले असते. पण भाजपला कुटीलपणा करून मते मिळवायची आहे आणि विरोधकांना कोंडीत पकडायचे होते. त्यासाठी त्यांनी या राखीव जागांचा मुद्दा लोकसभेच्या मतदारसंघाच्या फेररचनेशी म्हणजेच डिलिमिटेशनशी जोडला. राज्यघटनेतील तरतुदीनुसार दर दहा वर्षांनी जनगणना झाली की लोकसभेच्या मतदारसंघांची फेररचना करणे गरजेचे आहे. प्रत्येकमतदारसंघात सरासरी सारखीच लोकसंख्या असावी व प्रत्येक खासदाराने साधारणपणे समान लोकसंख्येचे प्रतिनिधित्व करावे अशी त्यामागची कल्पना आहे. सध्या एका लोकसभा मतदारसंघात सरासरी सहा लाख मतदार असतात. पण काही ठिकाणची लोकसंख्या अधिक वाढल्याने किंवा बाहेरून लोक मोठ्या प्रमाणात आल्याने एकेका मतदारसंघात १५ लाख मतदार झाले आहेत. हा दोष फेररचनेमध्ये दूर व्हावा अशी अपेक्षा असते. त्यासाठी मतदारसंघांमध्ये बदल करून त्यातले काही भाग शेजारच्या कमी मतदार असलेल्या संघांना जोडले जातात. १९७१ पर्यंत हे परिसीमन किंवा डिलिमिटेशन दर दहा वर्षांनी होत असे. पण १९७६मध्ये याला प्रथम २५ वर्षांची स्थगिती देण्यात आली. २००१ मध्ये ती पुन्हा २५ वर्षांनी वाढवण्यात आली. त्यानुसार २०२६ मध्ये परिसीमन होऊन नवे मतदारसंघ होणे अपेक्षित होते. मधल्या काळात लोकसंख्या वाढलेली असल्याने मतदारसंघांची संख्या म्हणजेच लोकसभेच्या जागाही बऱ्याच प्रमाणात वाढतील असे गृहित होते. पण मोदी सरकारचे कारस्थान असे की त्यांनी २०२१ ची जनगणना केलीच नाही. परिसीमन तर ताज्या आकडेवारीच्या आधारे करावे असे अपेक्षित असते. आता जनगणनेची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. पण ती पूर्ण होऊन तिचे अंतिम आकडे येईपर्यंत २०२८ उजाडण्याची शक्यता आहे. २०२९ ला पुढच्या लोकसभा निवडणुका आहेत. त्याच्या आत परिसीमन होणे त्यामुळे कठीण होणार आहे. मोदी सरकारने हे सर्व जाणीवपूर्वक रचलेले कारस्थान आहे हे आता स्पष्ट झाले आहे.

### विरोधकांची कसोटी

२०२३ मध्ये महिला राखीव जागा या नवीन जनगणना व तिच्या आधारे नवीन परिसीमन केल्यानंतर अस्तित्वात येतील असे म्हटलेले आहे. म्हणजेच सध्याच्या स्थितीत २०३४ मध्येच महिलांना ३३ टक्के आरक्षण मिळणार होते. पण आता २०२९ ची निवडणूक जिंकणे सोपे राहणार नाही असे बहुदा मोदींच्या लक्षात आलेले दिसते. आता त्यांनी मनसुबे बदलले आहेत. महिलांना राखीव जागांचे गाजर दाखवून त्यांची मते मिळवता येतील व सत्ता राखता येईल असे त्यांना वाटते आहे. त्यासाठी नारी शक्ती वंदन कायद्यात दुरुस्ती करून २०११ च्या जनगणनेच्या आधारे परिसीमन करता येईल व महिलांसाठी राखीव जागा ठेवता येतील अशी तरतूद करायचे घाटते आहे. मोदी आता असे सांगत आहेत की महिलांच्या राखीव जागा २०२९ लाच अस्तित्वात याव्यात ही विरोधकांचीच मागणी होती व ती आम्ही पुरी करीत आहोत. पण हे करताना त्यांनी विरोधकांसोबत कोणतीही चर्चा केलेली नाही. एकही सर्वपक्षीय बैठक वगैरे झालेली नाही. दुसरे म्हणजे सध्या बंगाल, तमिळनाडू इत्यादींच्या निवडणुका चालू असताना ऐन प्रचारात विशेष सत्र घेण्याची घाई केली जात आहे. याची काहीही गरज नाही. हे सत्र २९ एप्रिलला सर्व राज्यांचे मतदान संपल्यानंतर घेतले असते तरीही चालले असते. किंवा पावसाळी अधिवेशनात ही दुरुस्ती आणली असती तरीही चालली असती. पुढच्या निवडणुकांना अजून तीन वर्षे बाकी आहेत. पण मोदींना बंगाल वगैरे ठिकाणी प्रचारासाठी मुद्दा हवा आहे. महिलांसाठी आपण किती काय करतो आहे हे दाखवायचे आहे. या क्षुद्र स्वार्थापायी मोदी सरकार इतक्या महत्वाच्या व संवेदनशील विषयाचा वापर करून घेणार आहे. यामध्ये सर्वात कळीचा मुद्दा परिसीमन किंवा डिलिमिटेशनचा आहे. सरकारच्या प्रस्तावानुसार लोकसभेच्या जागा ५४३ वरून सुमारे ८५० होणार आहेत. या जागा अर्थातच लोकसंख्येच्या प्रमाणात वाढवल्या जाणार असून उत्तर भारतात किंवा हिंदी पट्ट्यात जबरदस्त वाढ होणार आहे. दक्षिणेकडील राज्ये व अगदी महाराष्ट्र यामध्ये लोकसंख्येचे प्रमाण उत्तरेइतके वाढलेले नाही. केरळमध्ये तर कमी झाले आहे. त्यामुळे या राज्यांच्या लोकसभेच्या जागा उत्तरेच्या मानाने आणखी कमी होणार आहेत. हा उत्तर विरुध्द दक्षिण हा विषय पेटणार हे पूर्वीपासून दिसत होतेच. आता हा मुद्दा ऐरणीवर आला आहे. मात्र याला महिला आरक्षणाची जोड देऊन या डिलिमिटेशनला विरोध करणे म्हणजे महिला राखीव जागांना विरोध असा प्रचार करण्याचा भाजपचा कुटील डाव आहे. तो हाणून पाडण्यासाठी विरोधकांना हुशारीने पावले टाकावी लागणार आहेत.

विचार

# केरळमध्ये पारंपरिक आघाड्यांमध्येच लढत

***केरळमधील आगामी विधानसभा निवडणूक केवळ सत्तांतराची लढाई नसून राज्याच्या राजकीय संस्कृतीची, मतदारांच्या बदलत्या मनोवृत्तीची आणि तिसऱ्या शक्तीच्या वाढत्या महत्त्वाची गुंतागुंतीची परीक्षा ठरणार आहे. निवडणुकीत डावी आघाडी आणि काँग्रेसप्रणीत 'युनायटेड डेमोक्रॅटिक फ्रंट' मध्ये मुख्य संघर्ष असला, तरी तिसऱ्या पर्यायाच्या रूपाने भारतीय जनता पक्षदेखील आपली उपस्थिती ठळकपणे दाखवून देत आहे.***



मधुरा कुलकर्णी

केरळमध्ये सध्या एलडीएफ ही डाव्यांची आघाडी सत्तेवर आहे. त्यात मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष हा प्रमुख पक्ष आहे. ही आघाडी सलग दुसऱ्या कार्यकाळात सत्तेत आहे. परंपरेने केरळमध्ये प्रत्येक निवडणुकीनंतर सत्तांतर होत आले आहे; मात्र २०२१ मध्ये 'एलडीएफ'ने ही परंपरा मोडत पुन्हा सत्ता मिळवली. या पार्श्वभूमीवर या वेळी सलग तिसऱ्यांदा एलडीएफ सत्तेत येऊन हॅट्रिक करणार का, हा चर्चेचा केंद्रबिंदू ठरला आहे. 'एलडीएफ' सरकारच्या कामगिरीकडे पाहिले तर सामाजिक कल्याण योजना, सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेतील सुधारणा आणि शिक्षणक्षेत्रातील गुंतवणूक यांचा उल्लेख करावा लागेल. विशेषतः कोविडकाळातील व्यवस्थापनामुळे सरकारची प्रतिमा मजबूत झाली; मात्र याचबरोबर आर्थिक तुटीचा वाढता बोजा, बेरोजगारी आणि काही भ्रष्टाचाराच्या आरोपांनी विरोधकांना सरकारवर टीका करण्याची संधी दिली आहे. विरोधी आघाडीतील काँग्रेसची स्थिती मात्र काहीशी विस्कळीत दिसते. काँग्रेस ही 'यूडीएफ'चा मुख्य आधार असला, तरी अंतर्गत मतभेद, नेतृत्वातील अस्पष्टता आणि सातत्यपूर्ण रणनीतीचा अभाव यामुळे पक्षाला अपेक्षित गती मिळालेली नाही. काही भागांमध्ये काँग्रेसचे पारंपरिक मतदार अजूनही पक्षाशी निष्ठावान असले, तरी राज्यव्यापी पातळीवर प्रभावी लाट निर्माण करण्यात पक्षाला अडचणी येत आहेत. काँग्रेस सत्तेत येण्याची शक्यता पूर्णपणे नाकारता येत नाही; मात्र ती आव्हानात्मक आहे. केरळमधील निवडणुकीचा निकाल बहुधा 'स्विंग' मतदारसंघांवर अवलंबून असतो. काँग्रेसला या मतदारसंघांमध्ये निर्णायक आघाडी मिळवता आली, तर सत्तांतर शक्य आहे; परंतु 'एलडीएफ' कडे असलेली मजबूत संघटनात्मक रचना आणि स्थिर मतदारवर्ग काँग्रेससमोर मोठे आव्हान उभे करतो.

केरळमधील पारंपरिक संघर्षात भाजपचा वाढता शिरकाव हा एक महत्त्वाचा घटक आहे. भारतीय जनता पक्षाने गेल्या काही वर्षांमध्ये केरळमध्ये आपला प्रभाव वाढवण्याचा प्रयत्न केला आहे. विधानसभा पातळीवर मोठे यश मिळाले नसले, तरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये भाजपने काही ठिकाणी लक्षणीय कामगिरी केली आहे. ग्रामपंचायत, नगरपालिका आणि जिल्हा परिषदांमध्ये मिळालेल्या जागांमुळे पक्षाला स्थानिक स्तरावर पाय रोवण्यास मदत झाली आहे. या वाढत्या उपस्थितीमागे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे दीर्घकालीन कामही महत्त्वाचे मानले जाते. संघाने सामाजिक, सांस्कृतिक आणि संघटनात्मक पातळीवर केलेले कार्य भाजपसाठी आधारभूत ठरले आहे. कार्यकर्त्यांचे जाळे, शाखांची उपस्थिती आणि स्थानिक मुद्द्यांवर सातत्याने केलेले काम यामुळे भाजपला काही प्रमाणात सामाजिक स्वीकार मिळू लागला आहे. केरळमधील राजकीय वास्तव अद्याप द्विध्रुवीय आहे. 'एलडीएफ' आणि 'यूडीएफ' या दोन आघाड्यांमधील संघर्षात भाजपला निर्णायक तिसरी शक्ती म्हणून उदयास येण्यासाठी अजून वेळ लागेल, असे अनेक विश्लेषक मानतात, तरीही भाजपची उपस्थिती ही दोन्ही आघाड्यांसाठी 'स्पॉइलर' ठरू शकते. चुरशीच्या लढतीत भाजपचे मतविभाजन दोन्ही आघाड्यांसाठी त्रासदायक ठरू शकते. आगामी निवडणुकीकडे पाहता, काही महत्त्वाचे घटक निर्णायक ठरणार आहेत. त्यात सत्ताधाऱ्यांविरोधातील नाराजी किती प्रभावी आहे, काँग्रेसला संघटित आणि आक्रमक रणनीती राबवता येते का आणि भाजप कितपत मतविभाजन करू शकतो, हे पहावे लागणार आहे.

दक्षिण केरळमधील अंदाज येऊ न शकणारे मतदारसंघ आणि तरुण मतदारांचा कल निकालावर प्रभाव टाकू शकतो. विधानसभा निवडणूक जसजशी जवळ येत आहे, तसतसे या राज्याच्या राजकारणातील सूक्ष्म प्रवाह अधिक स्पष्टपणे दिसू लागले आहेत. परंपरेने उच्च राजकीय जाणीव, साक्षरता आणि सामाजिक भान यासाठी ओळखल्या जाणाऱ्या केरळमध्ये निवडणूक ही केवळ पक्षांमधील लढाई नसते, तर समाजातील विविध घटक, त्यांच्या अपेक्षा आणि बदलत्या प्राधान्यक्रमांची एकत्रित अभिव्यक्ती असते. या निवडणुकीत चएचेत आलेल्या प्रमुख प्रश्नांकडे पाहता सर्वप्रथम आर्थिक स्थिती आणि बेरोजगारी हे मुद्दे समोर येतात. राज्याची आर्थिक तूट, वाढते कर्ज आणि मर्यादित औद्योगिक वाढ यामुळे तरुणांमध्ये अस्वस्थता आहे. परदेशी रोजगारावर मोठ्या प्रमाणात अवलंबून असलेले केरळ आता स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मितीची मागणी अधिक ठळकपणे करत आहे. यासोबतच महागाई, इंधनदर आणि दैनंदिन खर्चाचा वाढता ताण हे ही सामान्य मतदारांसाठी महत्त्वाचे मुद्दे ठरत आहेत. 'एलडीएफ' आपल्या कामगिरीवर भर देत आहे. सार्वजनिक आरोग्य, शिक्षण आणि सामाजिक सुरक्षा योजनांमध्ये केलेल्या गुंतवणुकीचा उल्लेख करून 'कल्याणकारी राज्य' ही प्रतिमा टिकवण्याचा प्रयत्न होत आहे. दुसरीकडे, काँग्रेस नेतृत्वाखालील 'यूडीएफ' आघाडी बेरोजगारी, भ्रष्टाचाराचे आरोप आणि आर्थिक कुप्रबंधन या मुद्द्यांवर सरकारला घेरत आहे. भाजप मात्र विकास, पायाभूत सुविधा आणि 'पर्यायी राजकारण' या मुद्द्यांवर आपली ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे.

विविध पक्षांची आश्वासनेही या निवडणुकीत महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. 'एलडीएफ' कल्याणकारी योजनांचा विस्तार, पेन्शन आणि सामाजिक सुरक्षेची हमी देत आहे. 'यूडीएफ' रोजगारनिर्मिती, उद्योगांना प्रोत्साहन आणि प्रशासनातील पारदर्शकता यावर भर देत आहे. भाजप राज्यात अधिक गुंतवणूक, पायाभूत सुविधा आणि केंद्र-राज्य समन्वयातून विकासाचे आश्वासन देत आहे. मतदारांचा विचार मात्र केवळ आश्वासनांवर मर्यादित नाही. केरळमधील मतदार पारंपरिकदृष्ट्या जागरूक असून ते स्थानिक उमेदवाराची प्रतिमा, त्याची उपलब्धता आणि कामगिरी यालाही तितकेच महत्त्व देतात. 'पार्टी लाइन'सोबतच 'लोकल फॅक्टर' हा निकाल ठरवणारा महत्त्वाचा घटक ठरतो. केरळमध्ये तो इतर अनेक राज्यांपेक्षा वेगळ्या पद्धतीने दिसतो. येथे हिंदू, मुस्लिम आणि ख्रिश्चन असे मोठे धार्मिक गट आहेत. राज्यात अंदाजे ५५ टक्के हिंदू, २७ टक्के मुस्लिम आणि १८ टक्के ख्रिश्चन लोकसंख्या आहे. 'इंडियन नॅशनल युनियन मुस्लिम लीग'चा मुस्लिम मतदारांमध्ये प्रभावी आहे, तर ख्रिश्चन समुदायाचा कल अनेकदा 'यूडीएफ'कडे झुकलेला दिसतो. हिंदू मतदारांमध्ये विविध जातीय विभागणी असून त्यांचा कल वेगवेगळ्या पक्षांमध्ये विभागलेला असतो. तथापि, केरळमध्ये धर्म आणि जात हे निर्णायक असले, तरी ते 'एकमेव' घटक नाहीत. शिक्षण, सामाजिक जागरूकता आणि राजकीय परंपरेमुळे मतदार अनेकदा मुद्द्यांवर आधारित मतदान करतात. त्यामुळेच येथे सत्तांतराची परंपरा दीर्घकाळ टिकून राहिली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अलीकडील निवडणुकांमध्ये सत्ताधारी आघाडीला काही ठिकाणी फटका बसल्याचे दिसून आले. काही नगरपालिकांमध्ये आणि पंचायत स्तरावर विरोधकांनी अपेक्षेपेक्षा चांगली कामगिरी केली. या निकालांकडे 'वॉर्निंग सिग्नल' म्हणून पाहिले जात आहे. स्थानिक पातळीवरील नाराजी, विकासकामांमधील विलंब आणि स्थानिक नेत्यांविषयी असलेला असंतोष या गोष्टी या निकालांमागे कारणीभूत मानल्या जातात. आता या पार्श्वभूमीचा आगामी विधानसभा निवडणुकीवर काय परिणाम होईल, हा कळीचा प्रश्न आहे. स्थानिक निवडणुका आणि विधानसभा निवडणुका यांचे मुद्दे वेगळे असले, तरी मतदारांच्या मनातील असंतोषाचे प्रतिबिंब मोठ्या निवडणुकीतही दिसू शकते. हा असंतोष वाढला, तर सत्ताधाऱ्यांसाठी आव्हान निर्माण होऊ शकते. एकंदरीत, केरळची निवडणूक ही अनेक स्तरांवर लढली जात आहे. आर्थिक प्रश्न, सामाजिक रचना, स्थानिक मुद्दे आणि राजकीय रणनीती यांचा गुंता यात आहे. मतदार मात्र या सर्वांचा शांतपणे विचार करत आहे. तो केवळ आश्वासनांकडे पाहत नाही, तर प्रत्यक्ष अनुभव, विश्वास आणि भविष्यातील अपेक्षा यांचा तोल सांभाळत निर्णय घेतो. यामुळेच केरळमध्ये निवडणुकीचा निकाल शेवटच्या क्षणापर्यंत अनिश्चित राहतो. आणि कदाचित, हाच या राज्याच्या लोकशाहीचा सर्वात परिपक्व आणि वैशिष्ट्यपूर्ण पैलू आहे.

चर्चा आजची

# समस्यांवर उपाय ठरणार जनगणना

सुयोग आंग्रे

कल्याणकारी राज्याच्या भूमिकेत जनगणनेची भूमिका अत्यंत महत्त्वाची मानली जाते. जर राज्याला चांगले शासन करायचे असेल तर त्याला तेथील लोकांचे चांगले ज्ञान असले पाहिजे. जे राज्य आपल्या लोकांची गणना करत नाही ते अंधारात राज्य करते, असे अर्थशास्त्र या ग्रंथात कौटिल्याने लिहून ठेवले आहे. कोविड आणि इतर काही कारणांमुळे भारतात सुरू असलेल्या जनगणनेच्या मार्गात जो अडथळा निर्माण झाला होता तो अखेर दूर झाला असून या महिन्याच्या सुरुवातीपासून देशात जनगणनेला औपचारिक सुरुवात झाली आहे. भारत हा जगातील सर्वाधिक लोकसंख्येचा देश असल्याने गणनाची ही प्रक्रियाही त्याच प्रमाणात खूप विस्तारली जाणार आहे. यामध्ये ३० लाखांहून अधिक प्रगणक, निरीक्षक आणि अधिकारी काही महिन्यांच्या कालावधीत १४० कोटी भारतीयांना ३३ प्रश्न विचारतील. देशातील सात हजारांहून अधिक शहरे आणि सहा लाखांहून अधिक गावांमध्ये राबवण्यात येणारा हा जगातील सर्वात मोठा प्रशासकीय सराव असणार आहे.

या जनगणनेचे एक वैशिष्ट्य म्हणजे ही जनगणना पूर्णपणे डिजिटल स्वरूपात केली जाणार आहे. सर्व भारतीय नागरिक १६ भाषांमध्ये उपलब्ध असलेल्या पोर्टलद्वारे स्वतः गणना करू शकतात. त्याच्या शुभंकराला प्रगती आणि विकास असे नाव देण्यात आले आहे. त्याच्या प्रतीकात्मक अर्थापासून ते त्याच्याशी निगडित आकांक्षाही अगदी स्पष्ट आहेत. भारतातील जनगणनेची परंपरा स्वातंत्र्यापूर्वीपासून आहे. त्याचे पहिले आधुनिक प्रयत्न १८६५ ते १८७२ च्या दरम्यान ब्रिटीश राजवटीत करण्यात आले. तथापि, त्यावेळी असा सराव एकाच वेळी केला जात नव्हता आणि सर्व प्रांतांमध्ये समन्वयाचा अभाव होता. १८८१ मध्येच अविभाजित भारतात प्रथमच एकाचवेळी जनगणना होऊ शकली. स्वातंत्र्यानंतर १९५१ मध्ये पहिली जनगणना झाली आणि तेव्हापासून काही अपवाद वगळता हा क्रम अखंड सुरू आहे. जनगणनेच्या प्रश्नांचे स्वरूपही काळानुसार बदलत गेले. १८७२ च्या शेड्यूलमध्ये फक्त १७ प्रश्न होते, ज्यामध्ये 'कोण कुठे राहतो' यापेक्षा अधिक काहीही नोंदवलेले नव्हते. तर १९०१ च्या जनगणनेत, इंग्रजी भाषेतील प्राविण्य विचारण्यात आले होते, जे वसाहतीच्या काळात विशेष प्राधान्य होते. तथापि, २०११ पर्यंतच्या जनगणनेमध्ये स्थलांतर इतिहास, जननक्षमता, कामाच्या सवयी आणि अपंगत्व यावरील तपशीलवार डेटा समाविष्ट करणे सुरू झाले. अशा स्थितीत जनगणना ही राज्यापुढील उदयोन्मुख पैलूंचे प्रतिबिंब आहे, असे म्हणणे योग्य ठरेल. देशात २०२१ ची जनगणना होऊ शकली नाही. यामागील एक प्रमुख कारण म्हणजे कोविड महामारी, ज्यामुळे प्राधान्यक्रम अचानक बदलला आणि एवढी मोठी प्रशासकीय प्रक्रिया शक्य वाटली नाही. तरीही, काही प्रश्न उद्भवतात की २०२२ पर्यंत कोविडशी व्यवहार करताना परिस्थिती बऱ्याच प्रमाणात सामान्य झाली होती आणि २०२३ ते २०२४ पर्यंत जनगणना प्रक्रिया पूर्ण करण्यास वाव होता, परंतु त्या आघाडीवर आवश्यक प्रयत्न केले गेले नाहीत.

नुकतीच सुरू झालेल्या जनगणनेची औपचारिक अधिसूचना जून २०२५ मध्ये आली आणि त्यानंतर १५ महिन्यांनी प्रक्रिया सुरू झाली. असे म्हणता येईल की कधीही न येण्यापेक्षा उशीर चांगला आहे, परंतु विलंबाचे समर्थन करणे थोडे कठीण आहे. गेल्या दीड दशकात भारतातील शासन पद्धती २०११ मध्ये झालेल्या जनगणनेवर आधारित राहिली, तर या काळात परिस्थिती मोठ्या प्रमाणात बदलत होती. असो, १५ वर्षे हा काही कमी कालावधी नाही. या काळात कोट्यवधी भारतीयांनी त्यांच्या मूळ ठिकाणाहून स्थलांतर केले. व्यवसाय बदलला. ते गाव सोडून शहरी झाले आहेत. तर धोरण नियोजनामध्ये, ग्रामीण-शहरी भागांच्या वर्गीकरणाबाबत स्पष्टतेचा अभाव तर आहेच, पण त्यांचा आधार २०११ च्या जनगणनेची आकडेवारी देखील आहे. ही जुनी परिस्थिती कल्याणकारी योजना आणि सार्वजनिक खर्चासाठी योग्य नाही. त्याचे व्यावहारिक परिणाम देखील केवळ काल्पनिक किंवा सैद्धांतिक नसतात. संशोधक आणि धोरण निर्माते जनगणनेचा त्यांचा आधार म्हणून उपभोग खर्चापासून ते श्रमशक्तीच्या सहभागापर्यंत किंवा सामाजिक परिस्थितीपर्यंत सर्व गोष्टींचे मूल्यांकन करतात. जेव्हा अशी यादी १५ वर्षे जुनी असेल तेव्हा त्या आधारे तयार केलेले चित्र वास्तववादी ठरणार नाही. अशा प्रकारे, लहान विसंगती जमा होतात आणि एक अतिशय गंभीर परिस्थिती निर्माण होते. २०२७ च्या जनगणनेमध्ये लोकसंख्येपेक्षा बरेच काही धोक्यात आहे. असा एक पैलू म्हणजे संसदीय आणि विधानसभा मतदारसंघांचे परिसीमन, ज्यामध्ये नवीन जनगणनेची आकडेवारी अत्यंत निर्णायक ठरेल. भारताचा राजकीय नकाशा अजूनही जुन्या परिस्थितीवर आधारित आहे, जो बदलत्या देशाच्या आकांक्षा आदर्शपणे दर्शवत नाही. नव्या जनगणनेमुळे यामध्ये सुधारणा करण्याची संधी मिळणार आहे. यामध्ये १९३१ नंतर प्रथमच जातींचीही मोजणी केली जात आहे. हा मुद्दा बराच वादग्रस्त आहे. जातीची मोजणी केल्याशिवाय कल्याणकारी योजनांची ब्ल्यू प्रिंट नीट बनवता येणार नाही, असे मत मांडणाऱ्यांचे म्हणणे आहे. तर त्याचे विरोधकांचे म्हणणे आहे की यामुळे विभाजनाच्या रेषा आणखी खोल होऊ शकतात ज्यांना अस्पष्ट करून राज्यघटनेने दूर करण्याचा प्रयत्न केला. दोन्ही युक्तिवादात काही योग्यता आहे. जनगणनेला उशीर होण्याचे एक कारण म्हणजे या मार्गावर पुढे जायचे की नाही, या जातीच्या जनगणनेबाबतची संदिग्धता हे मानले जाऊ शकते. या संदर्भात हे लक्षात घेतले पाहिजे की जो समाज आपल्या समस्यांचे मोजमाप करत नाही तो त्या सोडवू शकत नाही. जनगणनेच्या विलंबामुळे धोरण ठरवण्याच्या पातळीवर निर्माण झालेली पोकळी अचानक दूर होणार नाही, हे खरे असले तरी देशाला पुढे जाण्यासाठी जो आरसा आवश्यक आहे, तो दाखवण्यात तो नक्कीच यशस्वी होईल.

लोकसंसद

### स्वत:चे आरोप योग्य, इतरांचे मात्र राजकीय !

राजकारणात आरोपप्रत्यारोप नवीन नाहीत. मात्र, जेव्हा एखादा नेता स्वतःवर आलेल्या आरोपांना ''राजकीय'' म्हणून झटकून टाकतो, तेव्हा प्रश्न केवळ त्या आरोपांचा राहत नाही, तर तो लोकशाहीतील उत्तरदायित्वाचा बनतो. अलीकडेच दीपक केसरकर यांनी सुषमा अंधारे यांच्या आरोपांवर प्रतिक्रिया देताना ''हे आरोप राजकीय आहेत, त्यामुळे उत्तर देण्यास मी बांधील नाही,'' असा बचावात्मक पवित्रा घेतला. राजकारणात आरोप हे अनेकदा राजकीय हेतूनेच केले जातात, हे खरे. पण त्याच वेळी, आरोपांमध्ये तथ्य असण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणूनच, कोणत्याही जबाबदार लोकप्रतिनिधीकडून अपेक्षा असते ती स्पष्ट आणि ठोस उत्तरांची. ''राजकीय'' हा शिक्का मारून आरोपांकडे दुर्लक्ष करणे हे योग्य नाही. यातील विसंगती आणखी ठळक होते, जेव्हा हेच नेते इतरांवर सातत्याने टीका करताना दिसतात. स्वतःवर आरोप झाले, की तेच अचानक ''राजकीय'' ठरतात, ही भूमिका प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे. आज प्रश्न असा नाही की आरोप कोणी केले आणि कोणावर केले. प्रश्न आहे, त्या आरोपांची सत्यता तपासली जाणार का? आणि संबंधित व्यक्ती त्याबाबत स्पष्ट भूमिका घेणार का? लोकशाहीत उत्तर देणे ही बंधनकारक जबाबदारी आहे; ती टाळण्याचा पर्याय नाही. म्हणूनच आरोपांना ''राजकीय'' म्हणून नाकारण्याऐवजी, त्यावर सुस्पष्ट उत्तर देणे आणि आवश्यक असल्यास चौकशीला सामोरे जाणे, हीच लोकशाहीची खरी कसोटी आहे. अन्यथा, आरोपप्रत्यारोपांचा हा खेळ सुरूच राहील.

**दीपक काशिराम गुंडये, वरळी.**

दिनविशेष

# थोर तत्त्वचिंतक डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा आज स्मृतिदिन. राधाकृष्णन हे भारताचे दुसरे राष्ट्रपती (१९६२-६७) व पाश्चात्य जगाला भारतीय तत्त्वज्ञानाची ओळख करून देणारे थोर तत्त्वचिंतक होते. त्यांचा जन्म ५ सप्टेंबर १८८८ रोजी आंध्र प्रदेशातील तिरुत्तनी या गावी झाला. तिरुत्तनी येथे त्यांचे प्राथमिक शिक्षण झाले. उच्च शिक्षण चेन्नई येथील ख्रिश्चन महाविद्यालयामध्ये झाले.

नंतर चेन्नईचे प्रेसिडेन्सी महाविद्यालय (१९०९-१६), म्हैसूर विद्यापीठ (१९१६-२१), कोलकाता विद्यापीठात (१९२१-३१) तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक म्हणून त्यांनी काम केले. त्याचवेळी ते ऑक्सफर्ड येथील मँचेस्टर महाविद्यालयामध्ये तुलनात्मक धर्मशास्त्राचे प्राध्यापक होते (१९२९) व नंतर वॉल्टेअर येथील आंध्र विद्यापीठाचे (१९३१-३५) व बनारस हिंदू विद्यापीठाचे कुलगुरू (१९३९-४८) होते. तसेच लंडन येथे 'पौरस्त्य धर्म आणि नीतिशास्त्र' यांचे प्राध्यापक होते. १९३१ ते ३९ पर्यंत ते राष्ट्रसंघात भारताचे प्रतिनिधी होते. त्यांनी आपल्या लिखाणात शंकराचार्यांच्या केवलाद्वैत मताचीच थोडी फेरमांडणी करून त्यांनी जी मांडणी केली, ती आधुनिक काळाला साजेल अशी केली. शिवाय त्यांनी नित्य परिवर्तनशील परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शाश्वत मूल्यांचे पुनर्संस्करणही केले. शांकर तत्त्वज्ञानाच्या आधारावर प्रवृत्तीपर जीवन जगता येईल, असे त्यांनी दाखवून दिले. धर्म व तत्त्वज्ञान यांप्रमाणे शिक्षण हाही डॉ. राधाकृष्णन यांच्या परिशीलनाचा विषय होता. स्वतंत्र भारताच्या पहिल्या शिक्षण आयोगाचे (१९४८) ते अध्यक्ष होते. त्यांच्या शैक्षणिक कार्याविषयीचा आदर व्यक्त करण्यासाठी व या आदर्श शिक्षकाच्या सन्मानार्थ भारतात सर्वत्र त्यांचा जन्मदिन (५ सप्टेंबर) हा ङ्गशिक्षकदिनफ म्हणून साजरा केला जाते. शिक्षणाबद्दल त्यांना अतिशय जिव्हाळा होता. शिक्षण क्षेत्रात अधिकाधिक विकास घडून यावा यासाठी ते आयुष्यभर प्रयत्नशील होते. चांगल्या शिक्षकांचा सन्मान हा संस्कृतीचा, सत्याचा व ज्ञानाचा सन्मान आहे. समाजाचा विकास सत्तेने होत नाही, यंत्राने होत नाही तर तो आदर्श शिक्षकांमुळे होत असतो, असे त्यांचे मत होते. भारताचे दुसरे राष्ट्रपती आणि शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची आज पुण्यतिथी. एक शिक्षक, तत्त्वज्ञानाचे अभ्यासक आणि राजकीय नेते म्हणून २०व्या शतकातील शिक्षण व तत्त्वज्ञान क्षेत्रातील सर्वात प्रसिद्ध व प्रभावी भारतीय विचारवंतांपैकी ते एक होते. त्यांचे विचार आजही तितकेच प्रेरणादायी आहे. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन हे भारतातील महान व्यक्तिमत्त्वांपैकी एक होते आणि त्यांनी तौलनिक धर्मशास्त्र व तत्त्वज्ञान या क्षेत्रात २० व्या शतकातील आघाडीचे शास्त्रज्ञ म्हणून लौकिक मिळवला होता. डॉ. राधाकृष्णन यांचा जन्म ५ सप्टेंबर १८८८ रोजी झाला आणि त्यांच्या वाढदिवसानिमित्त दरवर्षी ५ सप्टेंबर रोजी संपूर्ण भारतात शिक्षक दिन साजरा केला जातो. त्यांनी नेहमीच सांगितले की शिक्षक हे देशातील सर्वोत्कृष्ट विचारवंत असावेत. जेव्हा ते भारताचे राष्ट्रपती झाले, तेव्हा त्यांच्या विद्यार्थ्यांनी त्यांचा वाढदिवस साजरा करण्याची विनंती केली होती. पण त्यांनी तो दिवस सर्व शिक्षकांना समर्पित केला जे समाजात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात आणि बालकांचे भविष्य घडवतात.

त्यांनी युनेस्कोमधील भारतीय प्रतिनिधीमंडळाचे नेतृत्व केले आणि नंतर युनेस्कोच्या कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष म्हणूनही काम पाहिले. राष्ट्रपती होण्यापूर्वी त्यांनी इ.स. १९५२ ते १९६२ या कालावधीत भारताचे उपराष्ट्रपती देखील होते. डॉ. राधाकृष्णन यांच्या तत्त्वज्ञान, शिक्षणातील योगदान आणि मूल्यांमुळे ते आजही लाखो विद्यार्थ्यांसाठी आणि शिक्षकांसाठी प्रेरणास्त्रोत आहेत. शिक्षणाचे अंतिम उद्दिष्ट असे स्वतंत्र, सर्जनशील व्यक्तिमत्त्व घडवणे असले पाहिजे, जे ऐतिहासिक अडचणींना आणि निसर्गाच्या संकटांना सामोरे जाऊ शकते.आनंदी आणि सुखी जीवन हे केवळ ज्ञान आणि विज्ञानाच्या आधारेच शक्य आहे. खरे शिक्षक म्हणजे तेच जे आपल्याला स्वतःसाठी विचार करायला शिकवतात. पुस्तके ही संस्कृतींमध्ये पूल बांधण्याचे माध्यम आहेत. ज्ञान आपल्याला सामर्थ्य देते; प्रेम आपल्याला परिपूर्णता देते. अशा या महान तत्त्वचिंतकाचे १७ एप्रिल १९७५ रोजी निधन झाले.

# अवैध धंद्यांचा सुळसुळाट

## ● सीबीडी बेलापूर येथील स्पा सेंटरवर छापा; सात महिलांची सुटका

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

**नवी मुंबई पोलीस गुन्हे शाखेने सीबीडी बेलापूर येथील स्पा सेंटरवर छापा टाकून एका मोठ्या रॅकेटचा पर्दाफाश केला आहे. या कारवाईत सात महिलांची सुटका करण्यात आली असून मॅनेजर नितू प्रजापत हिला अटक करण्यात आली आहे. मात्र, या कारवाईनंतर शहरातील कायदा-सुव्यवस्थेबाबत आणि पोलीस यंत्रणेच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत.**

नवी मुंबईतील परिस्थिती हळूहळू रेड झोनकडे झुकत आहे, अशी स्थानिक नागरिकांमध्ये सध्या चर्चा आहे. गेल्या ४० महिन्यांपासून अनेक पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या झालेल्या नाहीत. एकाच ठिकाणी दीर्घकाळ तैनात असल्यामुळे काही अधिकारी आणि अवैध धंदे चालवणारे यांचे साटेलोटे निर्माण झाल्याची शक्यता वर्तवली जात आहे. यामुळेच शहरात बेकायदेशीर धंद्यांना खतपाणी मिळत असल्याचे बोलले जात आहे.




शहरात अधिकृतपणे बार बंद असले, तरी १५० पेक्षा अधिक स्पा आणि मसाज सेंटरच्या नावाखाली वेश्याव्यवसाय फोफावल्याचा आरोप केला जात आहे. गुन्हे शाखेने केलेली कारवाई ही केवळ हिमनगाचे टोक असल्याचे मानले जात आहे. विशेष म्हणजे, सुटका करण्यात आलेल्या महिलांमध्ये थायलंड आणि ईशान्य भारतातील महिलांचा समावेश असल्याने मानवी तस्करीचे जाळे आंतरराष्ट्रीय स्तरावर असण्याची भीती व्यक्त होत आहे.

वरिष्ठ पोलीस अधिकारी अवैध धंद्यांविरोधात कठोर असल्याचे भासवत असले तरी, अधूनमधून होणाऱ्या या कारवाया केवळ आपली प्रतिमा सुधारण्यासाठी आहेत का, अशी टीका होत आहे. ''आम्ही बेकायदेशीर धंद्यांना थारा देत नाही'' हे दाखवण्यासाठी काही ठराविक ठिकाणी छापेमारी केली जाते, मात्र प्रत्यक्षात शहरातील गल्लीबोळातील वास्तव वेगळेच असल्याचा दावा नागरिक करत आहेत.

### परदेशी नागरिकांच्या बेकायदेशीर वास्तव्याचा प्रश्न

या कारवाईमुळे बांगलादेशी आणि इतर परदेशी नागरिकांच्या बेकायदेशीर वास्तव्याचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. थायलंडमधील महिला स्पा सेंटरमध्ये आढळल्याने व्हिसा नियमांचे उल्लंघन आणि मानवी तस्करी यांसारख्या गंभीर गुन्ह्यांचा तपास होणे आवश्यक असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. सध्या गुन्हे शाखा या प्रकरणाचा सखोल तपास करत असून, या रॅकेटमागील मुख्य सूत्रधार कोण आहेत, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

## निवडक

### नागरिकांनी मॉब लिचिंग टाळावे

#### अभिजित शिवथरे यांचे आवाहन

**श्रीवर्धन** : श्रीवर्धन शहरातील विविध भागांत गेल्या महिना-दीड महिन्यापासून चोऱ्यांचे सत्र चालू असून अद्याप पोलिसांचे हाती चोरटे लागत नाहीत. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर श्रीवर्धन पोलिसांतर्फे शहरातील ग.स. कातकर सभागृहात एका सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेला नागरिकांकडून चांगला प्रतिसाद मिळाला. यावेळेस उपस्थित नागरिकांनी चोऱ्या आणि चोरट्यांच्या संदर्भात काही अनुभव सांगितले. चोरट्यांनी काही घरे फोडून किंमती ऐवज लंपास केला. तसेच चोरटे हातात लोखंडी सळया घेऊन रात्रीच्या वेळी फिरत असतात आणि घरांवर दगड फेकून दहशत पसरवित आहेत, असे अनुभव सांगितले. त्या अनुषंगाने शहरात फिरणारे अनोळखी फेरीवाले, भंगारवाले, परप्रांतीय कामगार यांच्याकडून पोलीस यंत्रणेमार्फत ओळखीचे काही पुरावे घेतले जातात का? अशी पृच्छा नागरिकांकडून करण्यात आली. रायगडचे अपर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, शहरात संशयित व्यक्ती दिसून आल्यास ११२ क्रमांकावर त्वरित संपर्क साधावा. पुष्कळ वेळा संतापाच्या भरात संशयित व्यक्ती आढळल्यास संतप्त जमावाकडून त्यास मारहाण केली जाते, कधी कधी त्यामध्ये संशयित व्यक्तीचा मृत्यूही होतो. तरी नागरिकांनी मॉब लिचिंग टाळावे. नागरिकांना पोलिसांचे कायम सहकार्य आहे. आम्ही ड्रोन कॅमेऱ्याबाबत विचाराधीन आहोत. यावेळी उपस्थितांना शिवथरे यांचे व्यतिरिक्त उप विभागीय पोलीस अधिकारी सविता गर्जे, नगराध्यक्ष ॲड. अतुल चौगुले यांनीही मार्गदर्शन केले.

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१७ एप्रिल
१) श्रीम.शैलजा मनोहर पवार रामनाथ, अलिबाग, दि.१७-४-१९५०
२)श्रीम.मंगला मधुकर घरत मु.वरसोली, अलिबाग दि.१७-४-१९५०


### कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

आजचे अन्नदाते



**कै. कुंदा दत्तात्रेय म्हात्रे, स्मरणार्थ, प्रयास हॉस्पिटल, कार्लेखिंड, अलिबाग**

**पूजा राजेंद्र ठाकूर, अलिबाग**


पान ३ वरून

## उष्णतेचा यलो अलर्ट

जिल्हा प्रशासन व आरोग्य विभागाने नागरिकांना भरपूर पाणी पिणे, थेट सूर्यप्रकाश टाळणे, हलके व सैल कपडे परिधान करणे तसेच दही, ताक यांसारख्या थंड पदार्थांचा आहारात समावेश करण्याचा सल्ला दिला आहे. तसेच गरज नसताना घराबाहेर पडणे टाळावे, असेही आवाहन करण्यात आले आहे. उष्णतेच्या या वाढत्या लाटेमुळे येत्या काही दिवसांत नागरिकांनी अधिक सतर्क राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

**अकोला सर्वाधिक उष्ण**

दरम्यान, राज्यातील इतर भागातही उष्णतेची तीव्रता वाढली असून, अकोल्यात तापमान ४४ अंशांच्या पुढे गेले असून, राज्यातीलच नव्हे तर, जगा-तील उष्णतेचे शहर बनले आहे. त्यामुळे संपूर्ण राज्यात उष्णतेचा प्रभाव वाढत असल्याचे चित्र आहे.

**शीतपेयांना वाढती मागणी**

कडक उन्हामुळे थंड पेयांना मोठी मागणी निर्माण झाली आहे. लिंबूपाणी, ताक, नारळपाणी तसेच विविध शीतपेयांच्या विक्रीत लक्षणीय वाढ झाली असून, दुकाने व फेरीवाल्यांकडे ग्राहकांची गर्दी दिसून येत आहे. ३० रुपये ग्लासप्रमाणे शीतपेयाची विक्री करण्यात येत आहे.

## अवैध उमेदवाराला वाचवण्याचा प्रयत्न?

आणून दिली. मात्र, अवैध ठरू शकणाऱ्या उमेदवाराला वैध करण्यासाठी निवडणूक विभागाकडून मनमानी सुरू असल्याचा आरोप मंगेश राणे यांनी केला आहे.

परिणामी, नियम व अटी स्पष्ट असतानाही त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केलं जात असल्याने संपूर्ण प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झालं आहे. मंगेश आठवले यांच्या कागदपत्रांमध्ये स्पष्ट त्रुटी असूनही त्यावर कारवाई टाळली जात आहे. उलट, नियमांची व्याख्या बदलून किंवा तांत्रिक कारणं पुढे करून त्या उमेदवाराला वैध ठरवण्याचा प्रयत्न सुरू असल्याची चर्चा सर्वत्र सुरु आहे. या प्रकारामुळे सर्वांसाठी एकच नियम की निवडकांसाठी वेगळं धोरण? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

निवडणूक विभागाची भूमिका मात्र अद्याप अस्पष्ट आहे, त्यामुळे संशय अधिकच गडद होत आहे. दरम्यान, या प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी आणि संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अन्यथा, लोकशाही प्रक्रियेवरच विश्वास उरणार नाही, असे मत शेकापच्या प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी व्यक्त केले आहे.

## विधानपरिषद निवुडणुकीचा बिगुल वाजला

कार्यक्रमानुसार, २३ एप्रिलपासून उमेदवारी अर्ज दाखल करता येणार असून, ३० एप्रिल ही उमेदवारी अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख असणार आहे. २ मे २०२६ रोजी अर्जांची छाननी करण्यात येणार आहे, तर ४ मे हा उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस आहे. विधानपरिषद निवडणुकीसाठी १२ मे २०२६ रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत मतदान होणार असून, त्याच दिवशी सायंकाळी ५ वाजता मतमोजणीला प्रारंभ होईल.

दरम्यान, विधानसभेत असणाऱ्या संख्याबळानुसार विधानपरिषद निवडणुकीत ९ जागांपैकी ५ जागा भाजपच्या वाट्याला, २ जागा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला, १ जागा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या राष्ट्रवादीला आणि महाविकास आघाडीतील तीन पक्षांत मिळून एक जागा मिळण्याची शक्यता आहे.

## रेवंदडा ग्रामपंचायतीचा निष्क्रिय कारभार

जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद मुख्याधिकारी आणि गटविकास अधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार दाखल करत तात्काळ कारवाईची मागणी केली आहे. मात्र, स्थानिक ग्रामपंचायतीने याकडे जाणीवपूर्वक डोळेझाक केल्याचा आरोप होत आहे.

ग्रामपंचायतीच्या निष्क्रियतेमुळे हरेश्वर मैदानाचा ऱ्हास वेगाने सुरू असून, ''नोटीस देतो'' यापलीकडे कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने ग्रामस्थ संतप्त आहेत. विशेष म्हणजे, सत्ताधारी गटातीलच नेत्याने प्रशासनावर बोट ठेवल्याने ग्रामपंचायतीतील कारभारावर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

**साईराज अपार्टमेंटला याआधी नोटीस देण्यात आली होती. याठिकाणी सांडपाण्याचा प्रश्न ऐरणीवर आल्याच्या तक्रारीनुसार पुन्हा नोटीस देण्यात येईल.** - सुदेश राऊत, ग्रामविकास अधिकारी

## थेरोंडा येथे मटका जुगारावर छापा

धंदा बेकायदेशीररित्या चालवत असल्याचे आढळून आले.

याप्रकरणी रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कारवाईदरम्यान पोलिसांनी आरोपीकडून ६०० रुपये रोख रक्कम, त्यामध्ये ५०० रुपयांची एक नोट व १०० रुपयांची एक नोट, तसेच ओएक्स हाऊसेर कंपनीचा निळ्या शाईचा पेन जप्त केला आहे. आकडेमोडीशी संबंधित साहित्यही पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

याप्रकरणी फिर्याद सिद्धेश सुभाष शिंदे (३२), पोलीस कर्मचारी, रेवदंडा पोलीस ठाणे यांनी दिली आहे. ही कारवाई सपोनि बी.के. जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली असून, पुढील तपास पोलीस हवालदार आर.के. थळे करीत आहेत.

## 'स्पा'च्या नावाखाली देहव्यापार

मसाजच्या नावाखाली महिलांकडून जबरदस्तीने वेश्याव्यवसाय करून घेतला जात असल्याचे समोर आले होते. या माहितीची खात्री करण्यासाठी वरिष्ठ पोलीस निरीक्षक पृथ्वीराज घोरपडे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने सापळा रचला. योजनेनुसार एका बनावट ग्राहकाला स्पा सेंटरमध्ये पाठवण्यात आले. काही वेळातच त्याने दिलेल्या सांकेतिक इशाऱ्यानंतर पोलिसांनी तात्काळ धाड टाकली. छाप्यामध्ये स्पाच्या आत सुरू असलेला प्रकार उघडकीस आला.

या ठिकाणी सात महिलांना जबरदस्तीने देहव्यापारात ढकलण्यात आल्याचे निष्पन्न झाले. त्यांना मसाजच्या नावाखाली ग्राहकांसमोर उभे केले जात होते. या प्रकरणामागे स्पाची व्यवस्थापिका नितू हजारीलाल प्रजापत हिचा सहभाग असल्याचे पोलिसांच्या तपासात समोर आले. ती महिलांना कामाचे आमिष दाखवून येथे आणत आणि त्यांच्याकडून देहव्यापार करून घेत असल्याचे उघड झाले आहे.

पोलिसांनी तात्काळ सर्व महिलांची सुटका करून त्यांना संरक्षणात घेतले, तसेच आरोपी व्यवस्थापिकेला अटक केली. सुटका करण्यात आलेल्या महिलांमध्ये ४ थायलंडमधील, २ मिझोराम आणि १ मणिपूर येथील महिलेचा समावेश असल्याची माहिती समोर आली आहे. या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली असून, अशा प्रकारच्या अनैतिक व्यवसायांवर पोलिसांनी पुन्हा एकदा कठोर कारवाईचा इशारा दिला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू असून, यामध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा शोध घेतला जात आहे.

## धरण उशाला, कोरड घशाला!

जलस्रोत असूनही त्याचा नागरिकांना कोणताही फायदा होत नाही. या पार्श्वभूमीवर पेण नगरपालिकेने तातडीने पाणी वितरण यंत्रणा सक्षम करणे, तसेच जलसंपदा विभागाशी समन्वय साधून आंबेगाव धरणातील पाण्याचा प्रभावी वापर सुरू करावा, अशी मागणी जोर धरत आहे. अन्यथा, 'पाणी असूनही तहान' ही स्थिती कायम राहण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

## सायबर चोरट्यांकडून वृद्धाची फसवणूक

**। रत्नागिरी । प्रतिनिधी।**

जुन्या दुर्मिळ नोटा आणि नाणी विकून लाखो रुपये मिळवण्याच्या नादात अनेकांची सायबर चोरट्यांकडून फसवणूक होत आहे. अशातच रत्नागिरीतील भाटमिऱ्या परिसरातील हेमंत मारुती शिवलकर या वृद्धाला अशाच एका ट्रॅक्टर असलेल्या ५ रुपयांच्या नोटेचे आमिष दाखवून तब्बल ९ लाख २१ हजार रुपयांना लुटल्याचा प्रकार समोर आला आहे.

या फसवणुकीची सुरुवात फेसबुक ॲपवरून झाली. उत्तर प्रदेशातील अमित चव्हाण नावाच्या संशयिताने फेसबुकवर रिल्स बनवून ५ रुपयांच्या नोटेवर ट्रॅक्टरचे चित्र असल्यास १५ लाख रुपये मिळतील अशी जाहिरात केली होती. हे रिल्स पाहून शिवलकर यांनी आरोपीशी संपर्क साधला आणि आपल्याकडे अशी नोट असल्याचे सांगितले. १५ लाख रुपये मिळवून देण्यासाठी काही शासकीय शुल्क किंवा प्रोसेसिंग फी भरावी लागेल, अशी बतावणी आरोपीने केली.

ही फसवणूक ऑगस्ट २०२५ पासून जानेवारी २०२६ या दरम्यान घडली. आरोपीने सांगितलेल्या विविध खात्यांमध्ये शिवलकर यांनी गुगल पेद्वारे एकूण ९ लाख २१ हजार रुपये आरोपीला देण्यात आले. मात्र वारंवार पैसे भरूनही १५ लाख रुपये मिळत नसल्याने आपली फसवणूक झाल्याचे शिवलकर यांच्या लक्षात आले.

## मृगगडावरील पाण्याच्या टाक्यांची सफाई



**सुधागड** : मृगगड संवर्धनासाठी ३० शिलेदारांची टीम सरसावली असून गड संवर्धनाचा एक भाग म्हणून मातीने, गाळाने भरलेल्या दोन पाण्याच्या टाक्यांची साफसफाई करण्यात आली. तसेच टाक्यांमध्ये पडलेले दगड बाहेर काढण्यात आले. गडावर पाण्याचे दुर्भिक्ष्य असल्याने प्रथम पाण्याची टाकी साफ करून त्यात पाण्याचा साठा कसा होईल, यावर भर देण्यात येत आहे. मृगगड हा सुधागड तालुक्यातील भेलीव गावालगत असणारा डोंगरी गड. लोणावळा, खंडाळा येथे जाण्यासाठी येथून पायवाटा आहेत. गडावर पाच ते सहा पाण्याच्या टाक्या असून जुन्या वस्तीचे अवशेष आढळतात. गडकरी परिवार व स्वयंपूर्ण सुधागड या संस्थांच्या स्वयंसेवकांनी १२ एप्रिल रोजी पहाटे गडावर पोहोचून काम सुरू केले. दुपारपर्यंत गाळ काढण्याचे काम पूर्ण करण्यात आले. या मोहिमेत सरपंच, शिक्षक तसेच ग्रामस्थांचे सहकार्य मिळाले. दोन टाक्यांचे काम पूर्ण झाले असून पुढल्या मोहिमेत तिसरी पाण्याची टाकी साफ करण्याचा मनोदय गडकरी परिवार व स्वयंपूर्ण सुधागडच्या सदस्यांनी व्यक्त केला.


### पनवेल महानगरपालिका, पनवेल

जा.क्र.पमपा/सचिव/२०-२६/प्र.क्र.०४/१२४/२६
महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- १६/०४/२०२६

**पनवेल महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची सूचना**

प्रति,
श्री/श्रीमती.
मा.सदस्य / सदस्या,
पनवेल महानगरपालिका, पनवेल.
महोदय/महोदया,

पनवेल महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा शुक्रवार, दिनांक २४/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता, महापालिकेच्या ''आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल'' येथे खालील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी बोलविण्यात आली आहे.

**सर्वसाधारण सभा क्रमांक ०४. दिनांक २४/०४/२०२६ ची विषयपत्रिका**

**विषय**

१. मागील सर्वसाधारण सभा दिनांक ०१/०४/२०२६ रोजीच्या सभेचे इतिवृत्त कायम करणे.
२. प्रश्नोत्तरे
३. मा. आयुक्त महोदयांकडील कार्यालयीन कामकाज :
१. पनवेल महानगरपालिकेमार्फत राबविणेत येणारी जयंती उत्सव साजरे करणेत येणारे सण व विविध कार्यक्रमानिमित्त इमारती, रस्ते, चौक व स्मारक या ठिकाणी तीन वर्ष कालावधीकरीता भाडेतत्वावर आकर्षित विद्युत रोषणाई उपलब्ध करुन देणे.
२. पनवेल महानगरपालिका हद्दीतील नविन पनवेल (पूर्व) सेक्टर-१, रोड नं.४ येथे पावसाळी गटार बांधणे. ३. पनवेल महानगरपालिका हद्दीमधील प्रभाग समिती अ, ब, क व ड मध्ये अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम निष्कासन करणेकामी मनुष्यबळ, यंत्रसामुग्री व वाहने पुरविणेकामी निविदा मागविणेबाबत.
४. पनवेल महानगरपालिका हद्दीतील विविध ठिकाणी वार्षिक दराने वृक्ष व रोपांचा पुरवठा, लागवड व संगोपन करणे.
५. पनवेल महानगरपालिका मालकीच्या बंदर रोड पनवेल येथील १४ द.ल.लि. क्षमतेच्या मलप्रक्रिया (STP) केंद्रातील इलेक्ट्रॉमेकॅनिकल व पंपीग मशीनरी तसेच इमारतीची दुरुस्ती करणे या कामाच्या प्रस्तावास व खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळणेबाबत.
६. पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.०३, खारघर, सेक्टर-३६ मधील मुख्य रस्ता ते स्वप्नपुर्ती गृहसंकुल व व्हॅलीशिल्प पर्यंतच्या रस्त्याचे पुर्नपुष्टीकरण करणे. (डांबरीकरण करणे)
७. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती ''अ'' मधील विविध ठिकाणी दोन वर्षाकरिता पावसाळी पाण्याचा उपसा करण्यासाठी भाडेतत्वावर पंपाचा पुरवठा करुन परिचलन करणे या कामाचा प्रस्तावास प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळणेबाबत.
८. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती ''ब'' मधील विविध ठिकाणी दोन वर्षाकरिता पावसाळी पाण्याचा उपसा करण्यासाठी भाडेतत्वावर पंपाचा पुरवठा करुन परिचलन करणे या कामाचा प्रस्तावास प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळणेबाबत.
९. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती ''क'' मधील विविध ठिकाणी दोन वर्षाकरिता पावसाळी पाण्याचा उपसा करण्यासाठी भाडेतत्वावर पंपाचा पुरवठा करुन परिचलन करणे या कामाचा प्रस्तावास प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळणेबाबत.
१०. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती ''ड'' मधील विविध ठिकाणी दोन वर्षाकरिता पावसाळी पाण्याचा उपसा करण्यासाठी भाडेतत्वावर पंपाचा पुरवठा करुन परिचलन करणे या कामाचा प्रस्तावास प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळणेबाबत.
११. ना.प्र.आ. केंद्र नविन पनवेल येथील नविन ईमारतीमध्ये डॉयलॅसिस सेंटर मधील रुग्णांसाठी मेडिकल गॅस पाईप लाईनचे काम करुन घेणेकरिता प्रशासकीय व आर्थिक मंजुरी मिळणेकामी व ई-निविदा प्रसिद्ध करणेकामी मान्यता मिळणेबाबत.
१२. ना.प्र.आ. केंद्र खारघर येथील नविन ईमारतीमध्ये डॉयलॅसिस सेंटर मधील रुग्णांसाठी मेडिकल गॅस पाईप लाईनचे काम करुन घेणेकरिता प्रशासकीय व आर्थिक मंजुरी मिळणेकामी व ई-निविदा प्रसिद्ध करणेकामी मान्यता मिळणेबाबत.
१३. पनवेल महानगरपालिका मालकीच्या आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहामधील मध्यवर्ती वातानुकुलित यंत्रणेची तीन वर्षाकरिता दैनंदिन परिचालन देखभाल, दुरुस्ती, सुधारणा व नुतनीकरण करणे.

(मा. महापौर महोदय यांचे मंजुरीने व आदेशान्वये )

सही/-
**नानासाहेब कामठे**
**महापालिका सचिव**
**पनवेल महानगरपालिका**

महापालिका भवन, पनवेल
दिनांक :- १६/०४/२०२६



### जयभवानी नागरी सहकारी पतसंस्था म. अलिबाग

**मु. स्नेहसदन श्रीबाग अलिबाग**
ता. अलिबाग, जि. रायगड
फोन नं. ९१५६७६६०७७

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०चे कलम १५६ व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये**
**जाहीर लिलाव नोटीस**

जयभवानी नागरी सहकारी पतसंस्था म. अलिबाग या पतसंस्थेतून श्रीमती मंदा पांडुरंग पाटील/श्री रामचंद्र नागु म्हात्रे मु. श्रीगणेश हौसिंग सोसायटी चेंढरे ता. अलिबागा जि. रायगड यांचे कर्ज थकीत झाल्यामुळे कर्जदाराकडील येणे असलेल्या थकीत कर्जाची रक्कम वसुलीसाठी त्याचे खालील वर्णनाच्या स्थावर मालमत्तेची महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०चे कलम १५६ व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये जाहीर लिलावाने विक्री करणे आवश्यक झाले आहे. त्यानुसार सोमवार दिनांक १८/०५/२०२६ रोजी सकाळी ठिक १.३० वाजता वसुली अधिकारी हे जयभवानी नागरी सहकारी पतसंस्था म. अलिबाग शाखेत हजर राहून खालील वर्णनाच्या स्थावर मालमत्तेची आहे त्या ठिकाणी आहे त्या परिस्थितीत जाहिर लिलावाने विक्री करतील.

**जाहिर लिलाव करावयाच्या स्थावर मालमत्तेचे वर्णन**

| कर्जदाराचे नाव व मालमत्ता धारकाचे नाव व पत्ता | मालमत्तेचे वर्णन व तपशील | वाजवी मुल्य |
|---|---|---|
| श्रीमती.मंदा पांडुरंग पाटील/ श्री.रामचंद नागु म्हात्रे मु.श्रीगणेश हौसिंग सोसायटी चेंढरे ता.अलिबाग जि.रायगड | मौजे चेंढरे ता. अलिबाग जि. रायगड येथिल ग्रामपंचायत चेंढरे हद्दीतील भुमापन क्र.व उपविभाग ९५/०१ क्षेत्र ०-०५-३० हि मिळकत | मा.जिल्हा उपनिबंधक सो, सहकारी संस्था रायगड-अलिबाग यांनी निश्चित केलेली वाजवी किंमत ५३,००,०००/- अक्षरी रूपये त्रेपन्न लाख मात्र |

**लिलावाच्या शर्ती व अर्टी -**

१ जाहिर लिलावाच्या शर्ती व अटी पतसंस्थेच्या मुख्य कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर व लिलावाच्या ठिकाणी पहावयास मिळतील.
२. लिलावामध्ये ज्याला बोली बोलावयाची असेल त्यांनी रू.१,००,०००/- (अक्षरी रूपये एक लाख ) मात्र एवढी रक्कम 'अनामत' म्हणून पतसंस्थेकडे लिलावापुर्वी किमान १ तास अगोदर जमा करणे आवश्यक आहे.
३. लिलाव मंजूर करणे अगर काही कारणाने लिलाव तहकूब करणे, रद्द करणे किंवा पुढे ढकलण्याचे सर्व अधिकार वसुली अधिकारी व पतसंस्थेकडे राहतील.
४. लिलावाच्या तारखेपर्यंत कर्जदार यांनी येणे असलेल्या कर्जाची व्याजासह पुर्ण परतफेड केल्यास लिलाव रद्द करण्यात येईल.
५. लिलाव करावयाच्या मालमत्तेसंबंधी माहिती अगर कागदपत्रे पतसंस्थेच्या कार्यालयीन वेळेत मुख्य कार्यालयात पहावयास मिळतील.
६. अपसेट प्राइज (वाजवी किंमत) पेक्षा कमी किमंतीच्या बोली नोंदल्या जाणार नाहीत अपसेट प्राइज रू. ५३,००,०००/- अक्षरी रूपये त्रेपन्न लाख रूपये इतकी आहे.
७. मालमत्तेच्या हस्तांतरणाची स्टॉम्प डयुटी, रजिस्ट्रेशन खर्च व इतर थकीत देय संबधित खर्च भागविण्याची जबाबदारी ही यशस्वी खरेदीदार/बोलीदार यांची राहील.

ठिकाण अलिबाग
दि. १६/०४/२०२६

**श्री.विवेक वि.पाटील**
**वसुली अधिकारी**
**रायगड जिल्हा सहकारी पतसंस्थाचाचा महासंघ म.अलिबाग**



### जयभवानी नागरी सहकारी पतसंस्था म. अलिबाग

मु. स्नेहसदन श्रीबाग अलिबाग
ता. अलिबाग, जि. रायगड
फोन नं. ९१५६७६६०७७

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०चे कलम १५६ व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये**
**जाहीर लिलाव नोटीस**

जयभवानी नागरी सहकारी पतसंस्था म. अलिबाग या पतसंस्थेतून श्रीमती सोनाली पांडुरंग पाटील/श्रीमती. रूपाली रामचंद्र पाटील मु.श्रीगणेश हौसिंग सोसायटी चेंढरे ता. अलिबागा जि. रायगड यांचे कर्ज थकीत झाल्यामुळे कर्जदाराकडील येणे असलेल्या थकीत कर्जाची रक्कम वसुलीसाठी त्याचे खालील वर्णनाच्या स्थावर मालमत्तेची महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०चे कलम १५६ व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये जाहीर लिलावाने विक्री करणे आवश्यक झाले आहे. त्यानुसार सोमवार दिनांक १८/०५/२०२६ रोजी सकाळी ठिक १२.३० वाजता वसुली अधिकारी हे जयभवानी नागरी सहकारी पतसंस्था म. अलिबाग शाखेत हजर राहून खालील वर्णनाच्या स्थावर मालमत्तेची आहे त्या ठिकाणी आहे त्या परिस्थितीत जाहिर लिलावाने विक्री करतील.

**जाहिर लिलाव करावयाच्या स्थावर मालमत्तेचे वर्णन**

| कर्जदाराचे नाव व मालमत्ता धारकाचे नाव व पत्ता | मालमत्तेचे वर्णन व तपशील | वाजवी मुल्य |
|---|---|---|
| श्रीमती.सोनाली पांडुरंग पाटील /श्रीमती.रूपाली रामचंद्र म्हात्रे मु.श्रीगणेश हौसिंग सोसायटी चेंढरे ता. अलिबाग जि.रायगड | मौजे चेंढरे ता. अलिबाग जि.रायगड येथील ग्रामपंचायत चेंढरे हद्दीतील भुमापन क्र.व उपविभाग ९५/०१ क्षेत्र ०-०५-३० हि मिळकत | मा. जिल्हा उपनिबंधक साो, सहकारी संस्था रायगड-अलिबाग यांनी निश्चित केलेली वाजवी किंमत ५३,००,०००/- अक्षरी रुपये त्रेपन्न लाख मात्र |

**लिलावाच्या शर्ती व अटी**

१ जाहिर लिलावाच्या शर्ती व अटी पतसंस्थेच्या मुख्य कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर व लिलावाच्या ठिकाणी पहावयास मिळतील.
२. लिलावामध्ये ज्याला बोली बोलावयाची असेल त्यांनी रू.१,००,०००/- (अक्षरी रूपये एक लाख) मात्र एवढी रक्कम 'अनामत' म्हणून पतसंस्थेकडे लिलावापुर्वी किमान १ तास अगोदर जमा करणे आवश्यक आहे.
३. लिलाव मंजूर करणे अगर काही कारणाने लिलाव तहकूब करणे, रद्द करणे किंवा पुढे ढकलण्याचे सर्व अधिकार वसुली अधिकारी व पतसंस्थेकडे राहतील.
४. लिलावाच्या तारखेपर्यंत कर्जदार यांनी येणे असलेल्या कर्जाची व्याजासह पुर्ण परतफेड केल्यास लिलाव रद्द करण्यात येईल.
५. लिलाव करावयाच्या मालमत्तेसंबंधी माहिती अगर कागदपत्रे पतसंस्थेच्या कार्यालयीन वेळेत मुख्य कार्यालयात पहावयास मिळतील.
६. अपसेट प्राइज (वाजवी किंमत) पेक्षा कमी किमंतीच्या बोली नोंदल्या जाणार नाहीत अपसेट प्राइज रू. ५३,००,०००/- अक्षरी रूपये त्रेपन्न लाख रूपये इतकी आहे.
७. मालमत्तेच्या हस्तांतरणाची स्टॉम्प डयुटी, रजिस्ट्रेशन खर्च व इतर थकीत देय संबधित खर्च भागविण्याची जबाबदारी ही यशस्वी खरेदीदार/बोलीदार यांची राहील.

ठिकाण अलिबाग
दि. १६/०४/२०२६

**श्री.विवेक वि.पाटील**
**वसुली अधिकारी**
**रायगड जिल्हा सहकारी पतसंस्थाचाचा महासंघ म.अलिबाग**

## निवडक



### दुरटोली जत्रेत वेशभूषा सादर

**सुतारवाडी** : रोहा तालुक्यातील दुरटोली या गावात अनेक वर्षांपासून गावची जत्रा भरते. यावर्षी मात्र तरुण-तरुणी ग्रामस्थ ज्येष्ठ नागरिक नोकरीनिमित्त गावी गेलेले तरुण, तरुणी आदींनी पारंपारिक जत्रेला नवा लुक दिला. आहे. या जत्रेत हुबेहूब हनुमान, श्रीराम, लक्ष्मण, सीता, रावणाची भूमिका साकारत रामायणातील वेशभूषा अनेकांची मने जिंकली. याशिवाय जत्रेमध्ये लाठी काठी, मल्लखांब, लेझीम. शोभायात्रा आदी कार्यक्रमांची मेजवानी नागरिकांना पाहायला मिळाली. कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन दुरटोली ग्रामस्थ, सर्व तरुण-तरुणी, ज्येष्ठ ग्रामस्थ, महिला, यांनी उत्तम प्रकारे करून गावची भव्य जत्रा पार पाडली.

### पळस्पेत समाधान शिबिराचे आयोजन

**नवीन पनवेल** : शासन आपल्या दारी या संकल्पनेतून पनवेल तालुक्यातील छत्रपती शिवाजी महाराज विद्यालय, पळस्पे येथे छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिराचे आयोजन शुक्रवार (दि.१७) एप्रिल रोजी सकाळी १० वा.करण्यात आले आहे. या शिबिरामध्ये शेतकऱ्यांसाठी महाविस्तार नोंदणी व फार्मर आयडी रजिस्ट्रेशन, निवडणूक ओळखपत्राचे SIR मॅपिंग, आधारकार्ड अपडेट, आयुष्यमान भारतकार्ड, आरोग्य सुविधा, कृषी विभागाच्या सुविधा, रेशनकार्ड संबंधित सुविधा, ७/१२ संबंधित सुविधा, विविध प्रकारचे दाखले ई अर्ज स्वीकारले जातील आणि दाखल्यांचे वाटप केले जाईल. शिबिरास येताना नागरिकांनी आधारकार्ड, रेशनकार्ड, बँक पासबुक, जमीन विषयक-सात बारा उतारा आदी आवश्यक पूरक कागदपत्रे कागदपत्रे सोबत ठेवावीत. याप्रसंगी प्रांताधिकारी पवन चाडंक, तहसीलदार मिनल भामरे भोसले, नायब तहसीलदार राजश्री जोगी, मंडळ अधिकारी शशिकांत सानप व पळस्पे मंडळातील सर्व ग्राम महसूल अधिकारी, महसूल सेवक आणि इतर विभागांचे अधिकारी उपस्थित राहणार आहेत. प्रशासनाने नागरिकांना या शिबिराचा लाभ घेण्यासाठी वेळेवर उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

### चार बांगड्यांची चोरी

**पनवेल** : घरातून दोन तोळ्याच्या सोन्याच्या चार बांगड्यांची चोरी झाल्याची घटना तालुक्यातील बालाजी सिम्फनी, सुकापुर येथे घडली. या प्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. फिर्यादी यांची मैत्रीण शितल कश्यप या त्यांच्या घरी सुकापुर येथे आले असताना फिर्यादी त्यांच्या मुलीला स्कूल व्हॅनमध्ये बसवण्यासाठी घराच्या बाहेर गेल्या. त्या घरी परत आल्यानंतर बेडरूममध्ये ठेवलेल्या तिजोरीच्या ड्रॉवरमध्ये पाहिले त्यावेळेस चावी तशीच होती आणि सोन्याच्या बांगड्या नव्हत्या. त्यांनी बांगड्यांचा घरात शोध घेतला मात्र, बांगड्या कुठेच सापडल्या नाहीत.




### कोळघर आश्रमशाळेत रक्तगट तपासणी

**रायगड** : पूनम लालवानी संस्थापित व त्यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेल्या द लाईफ फाऊंडेशन या संस्थेमार्फत शासकीय आश्रमशाळा कोळघर येथे रक्तगट व हिमोग्लोबिन तपासणीचे दोन दिवसीय शिबीर यशस्वीपणे पार पडले. हे शिबीर दि. ९ व १५ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आले होते. या शिबिरामध्ये एकूण ३३७ विद्यार्थी व शिक्षकांची रक्तगट व हिमोग्लोबिन तपासणी करण्यात आली. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र, चिखली येथील लॅब टेक्निशियन श्रद्धा गावंडे तसेच आरोग्य अधिकारी डॉ. प्रणाली शिंदे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. संपूर्ण शिबिराचे नियोजन व अंमलबजावणी द लाईफ फाऊंडेशनचे प्रकल्प व्यवस्थापक भूषण चंद्रकांत घवाळे व समाजसेविका राखी राणे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. तसेच शाळेचे मुख्याध्यापक के. जी. राम वाघ, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनीही शिबीर यशस्वी करण्यासाठी उत्तम सहकार्य केले. विद्यार्थ्यांना भविष्यात आरोग्यविषयक सुविधा मिळविण्यासाठी अशा तपासण्यांचा मोठा उपयोग होत असून, द लाईफ फाऊंडेशनतर्फे राबविण्यात येणारा हा उपक्रम समाजोपयोगी आणि कौतुकास्पद आहे.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **झिराड आणि मांडवा येथील** दुकानात पीकअप आशयर व ४०७ वर ड्रायवर हवे आहेत. संपर्क - ८००७८९३२३२
- **बागायती वाडी विक्री १३ गुंठे** (घर, नारळ, सुपारी, विहीर) @२२ लाख पर गुंठा समुद्रापासून २०० मीटर मालक- सुहास माळी गाव- थळ गुंजाळ आळी, अलिबाग. रिसॉर्टसाठी योग्य जागा. मो. ८७७९८०५३५३
- **फर्निचर वर्कशॉपमध्ये कामाला** मुले पाहिजेत १२/१५ वी पास, १५००० महिना, ठिकाण- बामणसुरे संपर्क -९८२३५८५३२१
- **नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी** स्टाफची आवश्यकता आहे. रिसेप्शनिस्ट, हाऊसकीपर,रेस्टॉरंट कॅप्टन, हाऊसकिपिंग सुपरवायझर, इच्छुक उमेदवारांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा. अथवा व्हॉटसअॅपवर मेसेज करावा. मोबाईल- ७५५९१८४६१२
- **शेतावर राहून काम करण**्यासाठी जोडपे पाहिजे. संपर्क - ९८२२००१८५३
- **पाहिजेत- पाण्याच्या पंपाच्या** दुकानात कामासाठी कायमस्वरूपी शिकाऊ कामगार, प्लंबर, मेकॅनिक पाहिजे. तसेच कॉन्ट्रक्ट बेसीसवर काम करण्यासाठी मेकॅनिक पाहिजेत. बाहेरगावच्या व्यक्तसाठी राहण्याची सोय. संपर्क - ९८२२००१८५३

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# मोकाट गुरांमुळे शेतकरी त्रस्त

## मालकांनी बंदोबस्त करण्याची मागणी, संतप्त शेकऱ्यांचे अखेरचे आवाहन



**| कोलाड | प्रतिनिधी |**

रोहा तालुक्यातील तसेच देवकान्हे परिसरातील शेतकरी मोकाट गुरांच्या उपद्रवामुळे मेटाकुटीला आले आहेत. तोंडांत पडलेले कडधान्याचे पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान केले तर बाहे येथे शेतकऱ्यांचे भाजी पाल्याचे नुकसान करत आहे. या मोकाट गुरांच्या बंदोबस्तासाठी एकटवणार असून ज्यांची गुरे असतील त्यांनी वेळीच आवर घाला अन्यथा त्या गुरांना पकडून गो शाळेत पाठवण्यात येतील असा अंतिम आवाहन या विभागातील शेतकरी ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

खांब देवकान्हे विभागातील तळवली, चिल्हे, धानकान्हे, देवकान्हे, बाहे आदी ठिकाणी मोकाट गुरे शेतपिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान करत असल्याने शेतकरी संतापले आहेत. तर त्यांचा बंदोबस्तासाठी या आदी देखील सोशल मीडिया आणि वृत्तपत्रांच्या माध्यमातून सदरील मालकांसाठी आवाहन करण्यात आले होते. तसेच तसेच सदरील खात्याला या बाबतचे उपाय योजना संदर्भात निवेदन देखील देण्यात आले आहे.

सुटलेली ही मोकाट आणि उन्नाड गुरे कोणी कोणी मालकांची असल्यास येत्या तीन चार दिवसांत त्यांना दावणीला बांधून घ्यावे असे आवाहन करण्यात आले. यावेळी प्रगतशील शेतकरी धनाजी लोखंडे, वसंतराव मरवडे, बाळा भोईर, रवींद्र मरवडे, रामचंद्र बामणे, किशोर भोईर, डॉ. श्याम लोखंडे, संतोष भोईर, पांडुरंग गोसावी, डॉ. एस पी जाधव, राम महाडिक, राम लोखंडे, राम शेलार, संदीप लोखंडे, सुरेश महाडिक, ठमाजी महाडिक, संदेश लोखंडे, गणेश महाडिक, महेश मरवडे, किशोर कान्हेकर, गजानन जंगम, अनिल खांडेकर, मंगेश लोखंडे, कल्पेश महाडिक, तळवलीतर्फे अष्टमी, चिल्हे, धानकान्हे, देवकान्हे, येथील बहुसंख्येने उपस्थित होते.

### चिल्हे येथे सभा

पुन्हा एकदा येथील शेतकरी वर्ग एकत्रित येऊन यावर उपाययोजना करण्यासाठी चिल्हे येथे सभा घेण्यात आली होती. तर सदरच्या आयोजित सभेत पुन्हा एकदा मालकांनी माणुसकीचा हात देत आपापल्या गुरांचा बंदोबस्त करण्यासाठी आवाहन केले आहे.

## सावित्री ठाकूर यांचे निधन

**उरण** : उरण तालुका शेतकरी कामगार पक्षाचे सहचिटणीस यशवंत ठाकूर यांच्या पत्नी सावित्री यशवंत ठाकूर यांचे नुकतेच निधन झाले. सांत्वनपर माजी आ. बाळाराम पाटील यानिमित्त यांनी घरी जाऊन सांत्वनपर भेट घेतली.



सावित्रीताई यांनी समाजसेवेचा वसा घेतला होता. शेतकरी कामगार पक्षाविषयी त्यांना अपार श्रद्धा होती ग्रामपंचायत सदस्यपद त्यांनी भूषवले होते. शेतकरी कामगार पक्षाच्या आंदोलनात वेळोवेळी सहभाग घेत असत. यावेळी द्रोणागिरी शहराध्यक्ष खंडेश्वर राकेश पाटील, रुपाली पाटील, स्मिता पाटील, ययाती ठाकूर आदी यावेळी उपस्थित होते.

## भटक्या श्वानांचे निर्बीजीकरणाचा शुभारंभ

**| नवीन पनवेल | प्रतिनिधी |**



मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत पनवेल तालुक्यातील ग्रामपंचायतींमधील भटक्या श्वानांचे निर्बीजीकरण, लसीकरण व जंतूनिर्मूलन मोहिमेचा शुभारंभ बुधवारी (दि.८) एप्रिल रोजी आकुर्ली येथे झाला. रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांच्या हस्ते या मोहिमेचे उद्घाटन पार पडले. पनवेल तालुक्यात पहिल्यांदाच पहिल्यांदाच श्वानांचे निर्बीजीकरण होणार आहे. पनवेल तालुक्यात भटक्या कुत्र्यांच्या चाव्यामुळे अनेक जण जखमी झाले होते. त्यामुळे श्वानांचे निर्बीजीकरण करणे आवश्यक होते. दरवर्षी हजारो नागरिकांना कुत्रे चावे घेतात. त्या संदर्भात अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी देखील पाठपुरावा केला. पनवेलचे गटविकास अधिकारी समीर वाठारकर आणि पशुसंवर्धन विभागांनी यासाठी पुढाकार घेतला.

वाढत्या भटक्या श्वानांच्या समस्येवर नियंत्रण मिळवण्यासाठी आणि सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने ही मोहीम अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. पशुसंवर्धन विभाग, पंचायत समिती पनवेल, ग्रामपंचायत आकुर्ली आणि युनिव्हर्सल ॲनिमल वेल्फेअर सोसायटीच्या माध्यमातून हे अभियान राबविण्यात येत आहे. या मोहिमेमुळे परिसरात रेबीजसारख्या आजारांना आळा बसण्यास मदत होईल, असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला. निमल वेल्फेअर सोसायटी या संस्थेच्या माध्यमातून हे करण्यात येणार आहे. परिसरातील भटक्या श्वानांचे निर्बीजीकरण करावयाचे असल्यास त्या त्या ग्रामपंचायतीतील ग्रामसेवक त्यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमास अरुण भगत, रंजना वास्कर, भूपेंद्र पाटील, समीर वाठारकर, प्राची जाधव, आत्माराम भस्मा, राजेंद्र पाटील, वैशाली सावंत, अमित जाधव यांच्यासह तालुक्यातील सरपंच, सदस्य ग्रामसेवक, पदाधिकारी, अधिकारी, कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.

### संघटन सृजन अभियानाला प्रतिसाद

**| पनवेल | प्रतिनिधी |**

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या आदेशानुसार प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली संघटन सृजन अभियानाच्या माध्यमातून ब्लॉक स्तरीय पदाधिकारी निवड प्रक्रिया सुरू झाली असून, त्याअंतर्गत पनवेल शहर जिल्ह्यात दौरा संपन्न झाला. या दौऱ्यात विविध विभागातील कार्यकर्त्यांशी संवाद साधण्यात आला. यावेळी पनवेल शहर जिल्हा अध्यक्ष सुदाम पाटील, नगरसेवक हरीश केणी, नगरसेवक लतीफ शेख, हेमराज म्हात्रे, चंद्रकला नायडू, अखिल अधिकारी, शशिकला सिंग, आरती ठाकूर, चेतन म्हात्रे, अमित दवे, शैलेश पाटणे, प्रीतेश शाहू, सुधीर मोरे, नीता शेनोय, अरुण कुंभार, अशोक पोटे, गोविंद लोंढे, मर्फी म्हसकर, शाहीद मुल्ला, जयवंत देशमुख,अमित लोखंडे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.



## मतदार पुनरावलोकन जनजागृती कार्यक्रम

**| मुरुड जंजिरा | प्रतिनिधी |**

अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स मुरुड-जंजिरा येथे जमातुल मुस्लिमीन मोहल्ला बाजार यांच्या संयुक्त विद्यमाने मतदार यादींचे पुनरावलोकन जनजागृती व मॅपिंग शिबिराचे आयोजन करण्यात आले. हा उपक्रम स्थानिक प्रशासनाच्या सहकार्याने यशस्वीरीत्या पार पडला.या शिबिरात मुरुड शहरातील सर्व मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांनी सक्रिय सहभाग नोंदवून एस.आय.आर. मॅपिंगची प्रक्रिया प्रभावीपणे पूर्ण केली. या उपक्रमाला मुरुड शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उत्स्फूर्त प्रतिसाद दिला, ज्यामुळे शिबिराला विशेष यश लाभले. या शिबिराद्वारे मतदार नोंदणी, माहिती अद्ययावत करणे आणि निवडणूक प्रक्रियेशी संबंधित आवश्यक बाबींबाबत नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन राशीद फहीम, मुसव्वीर जमादार, मुसद्दिक कादिरी, नबील संभुलखानी, मोईन दामाद, जाहिद फकजी, मौलाना मेहमूद उलडे व इतर पदाधिकारी यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच अंजुमन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. साजिद शेख, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. फिरोज शेख व महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी मोलाचे सहकार्य केले.

## आनंद पाटील यांची बिनविरोध निवड

**| खरोशी | प्रतिनिधी |**



पेण प्राथमिक शिक्षक पतपेढीच्या चेअरमन व्हाईस चेअरमन पदासाठी निवडणूक पार पाडली. त्यात आनंद पाटील यांची चेअरमन तर व्हॉइस चेअरमन म्हणून विज्ञान पाटील यांची बिनविरोध निवड करण्यात आली. याप्रसंगी विठोबा पाटील, विनोद जोशी, उज्वला कनोजे, महेंद्र शिर्के, मोहन पाटील, संदीप पाटील, जीवन तेलंगे, कृष्णा पिंगळा, सुमित्रा खेडेकर, अरविंद मोरे, दत्ताराम शिर्के, हितेंद्र म्हात्रे, जगदीश म्हात्रे, कैलास भोईर, विष्णू सफरा, संदीप म्हात्रे, सुभाष बुधाटे, प्रमोद पाटील, प्रसाद म्हात्रे, अमरचंद पाटील, सोपान चांदे, अजय कापसे विनोद कडव आदी उपस्थित होते.

## पनवेल महानगरपालिकेकडून अग्निशमन सेवा सप्ताह

**| पनवेल ग्रामीण | प्रतिनिधी |**

नागरिकांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत पनवेल महानगरपालिकेकडून 'अग्निशमन सेवा सप्ताह २०२६' विविध उपक्रमांनी साजरा करण्यात येत आहे. १४ ते २० एप्रिल या कालावधीत सुरू असलेल्या या सप्ताहात अग्निसुरक्षेबाबत व्यापक जनजागृती करण्यावर भर देण्यात आला आहे.

या सप्ताहाचा शुभारंभ १४ एप्रिल रोजी कळंबोली अग्निशमन केंद्र येथे शहीद अग्निशमन जवानांना श्रद्धांजली अर्पण करून करण्यात आला. यावेळी आयुक्त मंगेश चितळे, प्रमिला पाटील, विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे, कैलास गावडे, मुख्य अग्निशमन अधिकारी प्रवीण बोडखे, अरविंद मांडके तसेच माजी मुख्य अग्निशमन अधिकारी आणि अग्निशमन विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

१९४४ साली मुंबई बंदरात झालेल्या भीषण स्फोट दुर्घटनेत शहीद झालेल्या जवानांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा सप्ताह साजरा केला जातो. या पार्श्वभूमीवर महानगरपालिकेकडून नागरिकांच्या जीवित व मालमत्तेच्या सुरक्षेसाठी अत्याधुनिक साधनसामग्री व प्रशिक्षित मनुष्यबळाच्या साहाय्याने अग्निशमन सेवा अधिक सक्षम करण्यात येत आहे.

सुरक्षित शाळा, सुरक्षित रुग्णालय आणि सुरक्षिततेसाठी आग प्रतिबंधकतेसाठी एकत्र येऊ हे यंदाच्या वर्षाचे घोषवाक्य असून त्याअनुषंगाने विविध जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. १५ ते १९ एप्रिलदरम्यान निवासी इमारती, कारखाने, गोदामे, रुग्णालये व मॉल्स येथे प्रत्यक्ष भेट देऊन अग्निसुरक्षा उपाययोजनांचे प्रात्यक्षिक सादर करण्यात येत आहे. तसेच अग्निशमन वाहनांची जनजागृती रॅली काढण्यात येत आहे.

## निलेश पाटील यांची नियुक्ती

**| उरण | प्रतिनिधी |**



महाराष्ट्र राज्यातील आगरी-कोळी समाज हा पारंपरिक, सांस्कृतिक व सामाजिक दृष्ट्या फार महत्त्वपूर्ण घटक आहे. कोकणात आणि विशेष करून मुंबई महानगर प्रदेशात प्रभावी लोकसंख्या असलेला आणि स्थानिक भूमिपुत्र असलेल्या या समाजाला गेल्या पन्नास वर्षात अनेक प्रकल्पांनी वेढा घातलेला असून या समाजास विविध शासकीय, शैक्षणिक, रोजगार व सामाजिक प्रश्नांना सामोरे जावे लागत आहे. आगरी व कोळी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी व त्यांच्या समस्या शासन प्रशासनस्तरावर प्रभावीपणे मांडून सोडवण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार यांच्या वतीने आगरी व कोळी समाज सेल-महाराष्ट्र प्रदेशची स्थापना करण्यात आलेली असून त्याचे नेतृत्व करण्याची जबाबदारी नवी मुंबईतील उच्च शिक्षित निलेश पाटील यांच्याकडे देण्यात आलेली आहे.

## तळोजात हेल्मेटचे वाटप

**| पनवेल | प्रतिनिधी |**

नवी मुंबई वाहतूक पोलीस यांच्या मार्गदर्शनाखाली तळोजा वाहतूक पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिलीप चव्हाण यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली गोरगरजू नागरिकांना चांगल्या प्रतीचे हेल्मेट उपलब्ध करून देण्यासाठी गंधार कंपनी व गंधार फाऊंडेशनच्या वतीने २०० हेल्मेटचे वाटप करण्यात आले.

तळोजा येथील गंधार कंपनीच्या प्रांगणात आयोजित या कार्यक्रमात वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिलीप चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत हेल्मेट वितरण करण्यात आले. यावेळी नागरिकांना हेल्मेटचे महत्त्व पटवून देत वाहतूक नियमांचे पालन करण्याबाबत मार्गदर्शनही करण्यात आले. या उपक्रमासाठी रमेश पारेख, समीर पारेख व आश्लेष पारेख यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक पोलिसांच्या मागणीनुसार सुमारे दोनशेहून अधिक हेल्मेट वाहतूक पोलिसांकडे सुपूर्द करण्यात आल्या.

### रायगड जिल्ह्यातील मध्यवर्ती असलेले ठिकाण | रेल्वे प्रशासनाने सकारात्मक निर्णय घेण्याची अपेक्षा

# कोकण कन्येला माणगाव थांबा देण्याची मागणी

**| माणगाव | प्रतिनिधी |**




(संग्रहित छायाचित्र)

निसर्गाच्या सान्निध्यात विसावण्याची इच्छा असणाऱ्या हजारो प्रवाशांसाठी कोकण कन्या एक्सप्रेस (रेल्वे क्र. २०१११) ही केवळ एक रेल्वेगाडी नसून, भावनांना स्पर्श करणारा प्रवास आहे. मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून रात्री ११:०२ वाजता सुटणारी ही गाडी सकाळी ०९:४५ वाजता मडगावला पोहोचते. रात्रीच्या शांततेत सुरू झालेला प्रवास सकाळी कोकणच्या निसर्गरम्य दर्शनाने भारावून टाकतो.

मात्र, रायगड जिल्ह्यातील मध्यवर्ती ठिकाण असलेल्या माणगाव येथील रेल्वे स्थानकावर थांबा नसल्याने दक्षिण रायगडमधील सात तालुक्यातील हजारो रेल्वे प्रवाशांना लाभ मिळत नाही. त्यामुळे माणगाव येथील रेल्वे स्थानकावर कोकण कन्या एक्स्प्रेसला थांबा देण्याची मागणी विविध संघटनांनी केली आहे.

इतक्या महत्त्वाच्या आणि लोकप्रिय गाडीचा माणगाव येथे थांबा नसणे, ही स्थानिकांसाठी मोठी खंत बनली आहे.

माणगाव हे कोकणातील एक प्रमुख शैक्षणिक, व्यापारी आणि सामाजिक केंद्र असूनही या गाडीने येथे थांबा न घेणे, ही एक प्रकारची उपेक्षा असल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे.

दररोज शिक्षण, नोकरी, व्यवसाय किंवा उपचारासाठी मुंबई-गोवा मार्गावर प्रवास करणाऱ्या नागरिकांना मोठा फटका बसतो. विद्यार्थ्यांना, ज्येष्ठ नागरिकांना, महिला प्रवाशांना अनावश्यक त्रास सहन करावा लागतो. जवळच्या स्थानकांवर उतरून अतिरिक्त प्रवास करावा लागतो, ज्यामुळे वेळ, पैसा आणि श्रमाचा ताण वाढतो.

स्थानिक नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि प्रवासी संघटनांकडून माणगाव येथे कोकण कन्या एक्स्प्रेसला थांबा द्यावा, अशी मागणी दिवसेंदिवस तीव्र होत आहे. या मागणीकडे रेल्वे प्रशासनाने संवेदनशीलतेने पाहून सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी सर्वांची अपेक्षा आहे.

### प्रवासातील महत्त्वाचे टप्पे

दादर, ठाणे, पनवेल, खेड, चिपळूण, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, राजापूर रोड, वैभववाडी रोड, कणकवली, सिंधुदुर्ग, कुडाळ, सावंतवाडी रोड, थिविम, करमळी ते मडगाव या प्रत्येक स्थानकातून कोकणच्या जीवनशैलीची, संस्कृतीची आणि सौंदर्याची झलक पाहायला मिळते.

# राईट्स-क्रिएटीव्ह ग्रुपची सल्लागार म्हणून नियुक्ती

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

मुंबई महानगर प्रदेशातील वाढत्या हवाई प्रवासी मागणीच्या पार्श्वभूमीवर, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे तिसऱ्या धावपट्टीच्या विकासासाठी तांत्रिक-व्यावसायिक व्यवहार्यता अभ्यास करण्यासाठी सिडकोने राईट्स लिमिटेड आणि क्रिएटीव्ह ग्रुप एलएलपी यांची सल्लागार म्हणून नियुक्ती केली आहे. हा अभ्यास सहा महिन्यांच्या कालावधीत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे.

सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांच्या अध्यक्षतेखाली तांत्रिक-व्यावसायिक व्यवहार्यता अभ्यासाबाबत महत्त्वाच्या बाबींवर चर्चा करण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली.

या बैठकीस गीता पिल्लई, सीजीएम, सिडको बिंदू मुरलीधरन, अतिरिक्त मुख्य परिवहन अभियंता, सिडको अनिल असवानी, महाव्यवस्थापक, विमानतळ विभाग, राइट्स लिमिटेड तसेच गुरप्रीत सिंग शाह, व्यवस्थापकीय संचालक, क्रिएटिव्ह ग्रुप एलएलपी उपस्थित होते. या पार्श्वभूमीवर राईट्स - क्रिएटीव्ह ग्रुप यांची सल्लागार म्हणून नियुक्ती ही सिडकोच्या दूरदृष्टीपूर्ण आणि भविष्याभिमुख पायाभूत विकासाच्या दृष्टिकोनाचे द्योतक आहे. असे सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक, तथा उपाध्यक्ष विजय सिंघल यांनी यावेळी सांगितले.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की मौजे वडवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळककतीचे विद्यमान मालक श्री.शिरीषकुमार महादेव बुटाला यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले आहे सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे. वडवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| १९ | १अ/३ | ०-२१-०० | २-४७ |

तरी सदर मिळकतीमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणचीही हरकत न आल्यास व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधन कारक राहाणार नाही.

कर्जत
ता. १७/०४/२०२६
मो. न. ९९२१७२२२००

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**ॲड. समीर हरिश्चंद्र लाड**
फ्लॅट नं. ३०१,राजलक्ष्मी अपार्टमेंट,
विठ्ठल नगर, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार १) श्री. समीर सफरअली विराणी, २) श्री. अल्ताफ लियाकत डोंगरे, यांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत त्या मिळकतीचे मालक श्री. अरविंद नानजी ठक्कर यांचे वारस श्री. जयेश अरविंद ठक्कर व इतर ०३, यांचेकडून विकत घेण्याचे ठरवले आहे.

मिळकतींचे वर्णन:

**मौजे-ममदापुर ता. कर्जत, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर. चौ. मी. | आकार | |
|---|---|---|---|---|
| | | | रूपये | पैसे |
| १४१ | १० | ०-४०-१०<br>पो. ख. ०-०२-८०<br>एकुण ०-४२-९० | २ | ०६ |
| पैकी, खरेदी देणार देण्याचे ठेरलेले ०-२२-९० हे.आर.चौ.मी. क्षेत्र. | | | | |

सबब सदर बाबत कोणाचीही दान, गहाण, साठेकरार, खरेदीखत, ताबा, कब्जा, वहीवाट, बक्षीसपत्र, लिज अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांच्याकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत दाखल करावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार केला जाईल. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक १७/०४/२०२६
पत्ता : १०१, १०२, १०३, बुरहान प्लाझा,
दिलकप कॉलेज रोड, ममदापुर, पो. नेरळ,
ता. कर्जत, जि. रायगड-४१०१०१
मो. ८८०६०२५८३१

सही/-
**ॲड. भावेश रघुनाथ विरले**
(वकिल उच्च न्यायालय)

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली शेती मिळकत असून त्या मिळकतीचे विद्यमान मालक गुरुनाथ कमल्या शेलका उर्फ गुरुनाथ कामल्या शेळके रा. १०२ केशव कॉम्प्लेक्स, मिडल क्लास सोसायटी, पनवेल ता. पनवेल जि. रायगड यांच्याकडून कायम विकत घेण्याबाबत आमच्या अशिलांनी व्यवहार ठरविलेला आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर. पॉ.) | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| डेरवली ता. पनवेल जि. रायगड | ८९/२ | ०-४९-०० | ४.६६ |

सदर वर नमूद केलेल्या मिळकतीमधील विद्यमान मालक यांच्या मालकीचे ताबेकब्जा वहिवाटीतील ०-३०-०० हे. आर. पॉ. मिळकत हि या जाहीर नोटीसचा विषय आहे.

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क हितसंबंध बोजा अथवा गहाण, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेंटेनन्स, मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध व हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यांसह आपली हरकत खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (१४) चौदा दिवसांचे आत आणून द्याव्यात. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाची कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लीअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यात येईल, हे सर्वास कळावे.

अलिबाग
तारीख १७/०४/२०२६

सही/-
**ॲड. शैलेश प्रभाकर पाटील**
ऑफिस पत्ता - दुय्यम निबंधक
अलिबाग कार्यालयासमोर पो. अलिबाग
ता. अलिबाग जि. रायगड.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली शेती मिळकत असून त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. रमेश भीमा दुबारीया रा २००४, २० वा मजला, रॉयल पॅलेस, फितवीला रोड साई धाम समोर, डिलायल रोड एलफिस्टोन मुंबई-१३ यांच्याकडून कायम विकत घेण्याबाबत आमच्या अशिलांनी व्यवहार ठरविलेला आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर. पॉ.) | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| डेरवली ता. पनवेल जि. रायगड | ८९/२ | ०-४९-०० | ४.६६ |

सदर वर नमूद केलेल्या मिळकतीमधील विद्यमान मालक यांच्या मालकीचे ताबेकब्जा वहिवाटीतील ०-१९-०० हे. आर. पॉ. मिळकत हि या जाहीर नोटीसचा विषय आहे.

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क हितसंबंध बोजा अथवा गहाण, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेंटेनन्स, मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध व हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यांसह आपली हरकत खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (१४) चौदा दिवसांचे आत आणून द्याव्यात. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाची कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लीअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यात येईल, हे सर्वास कळावे.

अलिबाग
तारीख १७/०४/२०२६

सही/-
**ॲड. शैलेश प्रभाकर पाटील**
ऑफिस पत्ता - दुय्यम निबंधक
अलिबाग कार्यालयासमोर पो. अलिबाग
ता. अलिबाग जि. रायगड.

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस या नोटीशीने कळविण्यात येत आहे की, मौजे शिंगढोळ, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील भोगवटादाराचे मालकीहक्कातील, ताबेकब्जा व वहिवाटीतील खालील वर्णनाची मिळकत आमचे अशिल श्री. गोरखनाथ राम धुमाळ यांनी कायम स्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतींचे वर्णन**

**मौजे शिंगढोळ, ता. कर्जत, जि. रायगड**

| मालकाचे/कब्जेदाराचे नाव | भुमापन क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| श्यामलकुमार हिरा | ७८/१० | १ | ०-२२.००<br>पो.ख.०-०२.००<br>एकूण क्षेत्र ०-२४.००<br>(खाते क्र. ४४५) | ०.२२ |

तरी वर नमुद मिळकतीवर अगर मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाही व्यक्ती, संस्था, कंपनी, वालीवारस यांपैकी कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहान, दान, बक्षिस, बोजा, चार्ज, अटॅचमेंट, लीज, वहिवाट, वारसाहक्क, दावा, वादविवाद व इतर कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास सदर व्यक्ती, संस्था अथवा कंपनी वा त्यांचे हितसंबंधी यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसांचे आत आपली हरकत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यानिशी सिद्ध करता येईल अशी कागदपत्रे घेवून खालील सही करणार यांच्या पत्त्यावर लेखी रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडूनही कोणत्याही प्रकारची लेखी हरकत न आल्यास सदर मिळकत ही बोजारहित व निर्वेध असून, सदर मिळकतीवर कोणाचाही हक्क हितसंबंध नाही असे आमचे अशिल गृहित धरुन सदरहू मिळकतीबाबचा विक्री व्यवहार पूर्ण करुन, सदरहू मिळकत ही आपल्या नावे कायमस्वरुपी हस्तांतरीत करुन घेतील, तसेच वरील मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकतीचा विचार केला जाणार नाही व सदरच्या हरकती आमच्या अशिलांवर व त्यांचे वालीवारसांवर बंधनकारक राहणार नाही, याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

पनवेल.
ता. १६/०४/२०२६.

सही/-
**ॲड. महेश रमेश केणी**
कार्यालयीन पत्ता: शॉप नं.०२, पहिला मजला,
उषा लक्ष्मी बिल्डींग, कमर्शिअल कॉप्लेक्स, विरुपक्ष
मंदिरासमोर, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड, ४१०२०६,
मो. नं. ९९२०८७४१३८.

## जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत तिचे मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे नेवाळी, ता. कर्जत, जि. रायगड.**

| मालकाचे नाव | स.नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पैसे. |
|---|---|---|---|
| श्री.विक्रांत गंगाधर जाधव | ४०/२४ | ००-०६-०० | ०-०६ |
| श्री.गंगाधर कारभारी जाधव | ४२/४ | ००-०८-०० | ०-०९ |
| श्री.पांडु धोंडु दुर्गे व इतर | ४२/६ | ००-०८-०० | ०-०९ |

तरी, वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दूसरे कोणाचा साठेकरार, कूळमूखत्यारपत्र, बयाना, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज लिज, अटेचमेंट, लिन, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पूराव्यासह लेखी हरकत कळवावी. मूदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. असे सर्वांस कळावे.

दि. १७/०४/२०२६

**ॲड. संजय हरिश्चंद्र म्हसे.**
पत्ता - बी-३०१, सायली निर्माण,
निर्माण नगरी, नेरळ,
ता. कर्जत, जि. रायगड.
मो.नं. ९४०३६४७९५३

## जाहीर नोटीस

दिनांक १६/०४/२०२६

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे सुचीत करण्यात येत आहे की, आमचे अशिल यांनी मौजे देऊळवाडी, ता.कर्जत, जि.रायगड येथील,

| सर्व्हे/हिस्सा क्र. | क्षेत्रफळ | आकार |
|---|---|---|
| ५९/२अ | ०-५३-८० पैकी लिहून देणार यांचे मालकी हक्काची ०-१६-०० एवढया क्षेत्राची संपुर्ण मिळकत | ८-५० |

च्या शेतजमीन मिळकत विद्यमान मालक यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करावयाची ठरविलेली आहे. तसा उभयातांमध्ये व्यवहार घडून आलेला आहे.

तरी उपरोक्त शेतजमीन मिळकतीमध्ये कोणाही व्यक्तीचा कसलाही अगर ताबा, बयाणपावती, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीन, लीज, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास सदरील नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसाचे आत खाली सही करणार अधिवक्ता यांचेकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरुपात दाखल कराव्यात सदर मुदतीत हरकती न आल्यास उपरोक्त शेतजमीन मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन इतर कोणाही व्यक्तींचा कसलाही कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध नाही. व असल्यास ते जाणीपुर्वक आमचे अशिलांचे लाभात सोडून दिलेले आहेत. असे समजुन कायदेशिर बाबींची पुर्तता करुन आमचे अशिल उपरोक्त जीमन मिळकत संदर्भातचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील आणि मग मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत वा तक्रार आमचे अशिल यांचेवर बंधनकारक राहणार नाही. याची या जाहिर नोटीसने तमाम जनतेने नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहिर नोटीस आहे.

**ॲड. प्रमोद नथुराम सुर्वे**
रा.मातोश्री निवास आवळस, ता.कर्जत, जि.रायगड
भ्रमनध्वनी क्र. ०९८८१५७९५५५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की मौजे निगडोली ता. खालापुर जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे आशिलांनी कब्जेदारांकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे. निगडोली ता. खालापुर जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| जमिन मालकाचे नाव | गट नं | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|---|
| श्री.शैलेश रमणिकलाल शहा | १२० | ५क | ०-८१-०० अधिक पो ख ०-०२-०० असे एकुण क्षेत्र ०-८३-०० हे.आर.पॉ | ०-८२ |

तरी सदर मिळकतीवर कोणाचाही गहाण, दान, लिज, विक्रीचा करार, पोटगी, चार्ज बक्षिस खरेदीखत वहीवाट इजमेंट बोजा तारण वारसा ट्रस्ट कुळहक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबध असल्यास त्यांनी आपली लेखी हरकत सकृतदर्शनी पुराव्यासह खाली नमुद ॲडव्हाकेट यांचेकडे सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ (सात) दिवसाचे आत नोंदवावी. वरील मुदतीत कोणाचीही काहीही हरकत न आल्यास सदरची मिळकत ही निर्वेध बोजारहीत असल्याचे गृहीत धरून आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक १७/०४/२०२६
मो.नं.८००७५३७६५६

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**ॲड. महेश कमलाकर थोरवे**
रा.कर्जत ता.कर्जत जि.रायगड

## जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकत तिचे मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या बिनशेती मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे बोपेले, ता. कर्जत, जि. रायगड.**

| मालकाचे नाव | स. नं./हि. नं. | एकुण क्षेत्र चौ.मी. | आकार रू.पैसे. |
|---|---|---|---|
| सौ.शलाका शिरिष जोशी | २६/३/अ/५ | ४७१.७५ | ४७-१८ |

तरी, वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दूसरे कोणाचा साठेकरार, कूळमूखत्यारपत्र, बयाना, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज लिज, अटेचमेंट, लिन, मृत्युपत्र, पोटगी, अदलाबदल वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मूदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. असे सर्वांस कळावे.

दि. १७/०४/२०२६

**ॲड. संजय हरिश्चंद्र म्हसे.**
पत्ता-बी-३०१, सायली निर्माण,
निर्माण नगरी, नेरळ,
ता.कर्जत,जि.रायगड.
मो.नं. ९४०३६४७९५३

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे सावरगांव, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकत आहे, या मिळकतीचे मालक भावेश गुलाबचंद छेडा यांचेकडुन आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविले आहे.

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ एकक आर.चौ.मी | आकार रु. पै. |
|---|---|---|
| ६४/१२ | ४६.००.०० | ४६०-०० |

सबब सदर वर वर्णन केलेली मिळकतींबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास, त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून, ०७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : १७ एप्रिल २०२६

**ॲड.शरद आर. सावंत**
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता-सदनिका नंबर ०२, तळमजला,
बी विंग, विहंग को.ऑ.हौ.सो.लि.
कोतवालनगर कर्जत ता.कर्जत,
जि. रायगड-४१०२०१
मो.नं.९५२७२८२५२५

## जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिल श्री. श्रीकांत चंद्रकांत बोराडे, सौ. प्राजक्ता राजेश नलावडे यांनी खालील वर्णन केलेली मिळकत तिचे मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे वारे, ता. कर्जत, जि. रायगड.**

| मालकाचे नाव | स.नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पैसे. |
|---|---|---|---|
| श्रीम.सुनिता वसंत देशमुख | १९/२ | एकुण क्षेत्र ००-६५-६० हे. आर. पॉ. पैकी विकत देत असलेले क्षेत्र ००-२०-०० हे.आर. | २-८१ |

तरी, वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दूसरे कोणाचा साठेकरार, कूळमूखत्यारपत्र, बयाना, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटेचमेंट, लिन, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पूराव्यासह लेखी हरकत कळवावी. मूदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. असे सर्वांस कळावे.

दि. १७/०४/२०२६

**ॲड. संजय हरिश्चंद्र म्हसे.**
पत्ता-बी-३०१, सायली निर्माण,
निर्माण नगरी, नेरळ,
ता. कर्जत, जि. रायगड.
मो.नं. ९४०३६४७९५३

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे वारे, ता. कर्जत, जि.रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेल्या जमीन मिळकती आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालकांकडून खरेदी घेण्याचे ठरविले आहेत सदर जमिन मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे -

**मौजे वारे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकती :**

| जमीन मालकांचे नाव | स.नं. | हि.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु पै.) |
|---|---|---|---|---|
| राजेश जयंतीलाल परमार | ४५ | ६/अ | ०-८६-०० पैकी ०-४३-०० | ०-५० |
| १) राजेश जयंतीलाल परमार<br>२) सुभाष पोरवाल गुलाबचंदजी | ४३ | १ | १-८०-०० | १-१७ |

तरी वरील मिळकतीच्या बाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, कुल अखत्यारपत्र अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. १७/०४/२०२६

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**किशोर तुकाराम देशमुख**
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो. ९४२२०६८७५५

## जाहीर नोटीस

दिनांक : १६/०४/२०२६

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकतीचे विद्यमान मालक नंदकुमार भाऊ म्हात्रे यांच्या कडुन सदर मिळकत कायम विकत घेण्याचे ठरविले आहे व तशी बोलणी केलेली आहेत. विकत घेणाऱ्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | ग.नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| पेझारी ता. अलिबाग | २२/४ | ०-५४-९०<br>पो.ख. ०-०५-९०<br>एकुण ०-६०-८० | ९.१९ |

वरील तपशिलात नमुद केलेली मिळकतीच्या एकुण क्षेत्रापैकी ०-६०-८० हे. आर इतकी मिळकत या जाहिर नोटीसीचा विषय आहे.

सदर वर वर्णन केलेली मिळकत ही निर्वेध व बोजारहीत असल्याचा दावा विदयमान मालकांनी आमच्या अशिलाना केलेला आहे.

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही ताबा, कुळवहिवाट, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, बक्षिस, दान, जप्ती, लिज, वहिवाट अथवा अन्य प्रकारचा कसलाही हक्क व हितसंबंध असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती कागदोपत्री पुराव्यासह सादर कराव्यात. अन्यथा मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे गृहित धरुन सदरचा व्यवहार आमचे अशिल पुर्ण करतीलव मागाहून आलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी. कळावे.

अलिबाग :
दिनांक १६/०४/२०२६

सही/-
**ॲड. कांचन प्रशांत नार्वेकर**
ॲडव्होकेट
मु.ॲकॉन क्लासिक, फ्लॅट नं. १०६,
जिल्हा न्यायालय रायगड समोर
अलिबाग, रायगड ४०२२०१
मो.९८५०७५०८३४

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटिसीने कळविण्यात येते की खालीलप्रमाणे महसूल दप्तरी वर्णन केलेली मिळकत आमचे अशिलांनी सदरहू मिळकतीचे मालकांकडून विकत घेण्याचे योजिले आहे. सदरहू मिळकतीचे मालकी हक्क तपासणीकामी तसेच होणाऱ्या व्यवहारासंबधी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध करत आहे.

**मौजे-चिंचवण, तालुका पनवेल, जि. रायगड**

| | गट क्र | क्षेत्र हे आर चौ मी | आकार रु. पैसे | भोगवटदाराचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | ६८/१/ब | ०.१३.२० | ०.१७ | १. मथुरा बबन टकले<br>२. किसन गजानन पाटील<br>३. निरा गजानन पाटील<br>४. बेबी गजानन पाटील<br>५. जनाबाई रामचंद्र म्हसकर |
| २ | ६८/३ | ०.२१.०० | ३.९४ | |
| | एकूण क्षेत्र | ०.३४.२० | | |

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकंनी कृपया नोंद घ्यावी.

**ॲड. अमोल पवार**
पत्ता : पहिला मजला, अवमेध व्हिला,
सेक्टर १२, प्लॉट १२, नवीन पनवेल
(पूर्व) जि.रायगड ४१० २०६
मो.क्र. ९८३३७३७९२२

## जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत तिचे मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे वाकस, ता. कर्जत, जि. रायगड.**

| मालकाचे नाव | स.नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पैसे. |
|---|---|---|---|
| पेजगंगा वृक्षलागवड सहकारी संस्था मर्या. चेअरमन श्री. गंगाधर कारभारी जाधव | ५२/७/९/१० /११/१३/क | खाता क्र. ७७० मधील लिहुन देणार यांचे मालकीचे विकत देत असलेले क्षेत्र ००-११-०० हे.आर.पॉ. | ०-१३ |

तरी, वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दूसरे कोणाचा साठेकरार, कूळमूखत्यारपत्र, बयाना, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटेचमेंट, लिन, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पूराव्यासह लेखी हरकत कळवावी. मूदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. असे सर्वांस कळावे.

दि. १७/०४/२०२६

**ॲड. संजय हरिश्चंद्र म्हसे.**
पत्ता-बी-३०१, सायली निर्माण,
निर्माण नगरी, नेरळ,
ता. कर्जत, जि. रायगड.
मो.नं. ९४०३६४७९५३

## जाहीर नोटीस

दिनांक : १६/०४/२०२६

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे खानाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील सर्व्हे नं. ४१/१, एकूण क्षेत्र ०-६७-९० हे. आर., आकार ७.०० रू. पैसे ही मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. जयंत जयराम आपटे रा. मु. खानाव, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडुन आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी. अलिबाग,

तारीख : १६/०४/२०२६

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता - श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग,
रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की मौजे पुलाचीवाडी, ता. कर्जत, जि.रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री. महेंद्र भरत चौधरी यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले आहे सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे. पुलाचीवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| २४ | २/ब | ४-६१-००<br>पैकी १-२०-००<br>या क्षेत्रापैकी लिहून देणार यांचे मालकीचे ०-३०-००<br>इतके विकत दिलेले अविभक्त क्षेत्र | २-१४ |

तरी सदर मिळकतीमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणचीही हरकत न आल्यास व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहाणार नाही.

कर्जत
ता. १७/०४/२०२६
मो. न. ९९२१७२२२००

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट.
**ॲड. समीर हरिश्चंद्र लाड.**
फ्लॅट नं. ३०१,राजलक्ष्मी अपार्टमेंट,
विठ्ठल नगर, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे पोसरी, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेल्या जमीन मिळकती आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालकांकडून खरेदी घेण्याचे ठरविले आहेत. सदर जमिन मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मौजे पोसरी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकती :**

| जमीन मालकांचे नाव | स. नं. | हि.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|---|
| योगेश रंभाजी थोरवे | ५२ | ९ | ०-२७-०० | ४-०५ |
| निकीता योगेश थोरवे | ५२ | ८/अ/२ | ०-२०-०० | १-९३ |

तरी वरील मिळकतीच्या बाबत कोणाचाही कुळ, वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, कुल अखत्यारपत्र अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा ) दिवसांच्या आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. १७/०४/२०२६

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**किशोर तुकाराम देशमुख**
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो.९४२२०६८७५५

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## निवडक



● (छायाचित्रः अनिल गवळे)

### पोलीस ठाण्यात बाबासाहेबांना अभिवादन

**वेणगाव :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मंगळवारी (दि.१४) कर्जत रेल्वे पोलीस ठाण्यात साजरी करण्यात आली. पोलीस निरीक्षक तानाजी खाडे यांच्या हस्ते डॉ, बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर पोलीस उप निरीक्षक सूर्यकांत देसाई यांनी बाबासाहेबांचे जीवन चरित्र व त्यांच्या समाज कार्याची माहिती आपल्या मनोगतातून व्यक्त केली. यावेळी पोलीस उपनिरीक्षक भाऊसाहेब कुरुंद, पोलीस अंमलदार व कर्मचारी उपस्थित होते.



### वृद्धाश्रमात जीवनावश्यक साहित्यांचे वाटप

**रसायनी :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त ग्रुप ग्रामपंचायत तुपगांव सदस्य निलेश मोरे यांच्याकडून आदित्य तर वृद्धाश्रमात जीवनाश्यक साहित्याचे वाटप व भोजन दान करण्यात आले. तसेच, महिला कर्मचाऱ्यांना साडी वाटप करण्यात आल्या. या कार्यक्रमासाठी उपस्थित डॉ. आशिष जावळे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला. महेंद्र सोनवणे यांनी दीप प्रज्वलित केले. गौतम मोरे यांनी धूप पूजन केले. त्यानंतर रंजना मोरे यांनी साहित्य वाटप केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची शिकवण नेहमी लक्षात ठेऊन गरजूंना नेहमी मदत करत राहीन. यापुढे याच्यापेक्षा अधिक चांगले करण्यासाठी नक्की मेहनत करेन, असे निलेश मोरे यांनी सांगितले.



### जयंती प्रबोधनात्मक कार्यक्रमांनी साजरी

**पाली :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सुधागड तालुक्यात विविध ठिकाणी अभिवादन सोहळे आयोजित करण्यात आले होते. या सोहळ्यांमध्ये विविध क्षेत्रातील मान्यवर, लोकप्रतिनिधी, शासकीय अधिकारी आणि भिम अनुयायी व नागरिकांनी बाबासाहेबांना आदरांजली वाहिली. या अभिवादन सोहळ्यांमध्ये प्रतिमांना पुष्पहार अर्पण करणे, सामूहिक अभिवादन करणे आणि विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सुधागड तालुका बौद्धजन पंचायत संस्थेकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक सभागृहात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून सर्व बौद्ध अनुयायांनी अभिवादन केले. भिमनगर परळी येथे भिमशक्ती मित्र मंडळाकडून भिमजयंती मोठ्या उत्साहात व धूमधडक्यात साजरी करण्यात आली. यावेळी परळी बाजारपेठेतून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेचे रथामधून वाद्याच्या गजरात मिरवणूक काढण्यात आली.




### अध्यक्षपदी आनंद पाटील यांची निवड

**हमरापूर :** पेण प्राथमिक शिक्षक पतपेढीच्या अध्यक्षपदाची निवड नुकतिच पार पडली. यावेळी अध्यक्षपदी आनंद पाटील, तर उपाध्यक्षपदी विज्ञान पाटील हे निवडून आले. यावेळी मानद सचिव मोहन भोईर, शिक्षक नेते अजय कापसे, विनोद जोशी, विनोद कडव, जे.एस. म्हात्रे, पॅनल प्रमुख सोपान चांदे, देवानंद पिंगळे, प्रमोद पाटील, विठोबा पाटील, अमरचंद पाटील, प्रसाद म्हात्रे यांच्यासह सर्व संचालक, शिक्षक वर्ग तसेच कर्मचारी उपस्थित होते. नवनिर्वाचित अध्यक्ष आनंद पाटील व उपाध्यक्ष विज्ञान पाटील यांचे सर्व संचालक तसेच शिक्षक वर्ग कर्मचाऱ्यांनी पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.

### 'माथेरानला नवीन झळाळी देणार'

**माथेरान :** ज्या स्थळांवरील रस्ते सुस्थितीत असतात त्या




स्थळांचा सर्वांगीण विकास होतो ही खऱ्या अर्थाने वस्तुस्थिती आहे. त्यामुळे माथेरानच्या मुख्य महात्मा गांधी मार्गावरील बहुतांश भागात विद्रुपीकरण झाल्याने पर्यटकांना मोकळा श्वास घेता यावा. याच उद्देशाने माथेरानच्या मुख्य रस्त्याला मॉल रोडच्या धर्तीवर नवीन झळाळी प्राप्त करुन देण्यासाठी प्रयत्नशील आहोत, असे विद्यमान नगरसेवक शिवाजी शिंदे यांनी सांगितले. पुढे बोलताना, या मार्गावर असणाऱ्या मोकळ्या जागेत वृक्षारोपण करून त्याचे संवर्धन नियमितपणे केले जाणार आहे. रस्त्याच्या बाजूला नगरपरिषदेच्या जागेवर काही ठिकाणी पत्र्याचे कंपाउंड टाकून जागा व्यापल्या आहेत. अशाप्रकारची अतिक्रमणे ताबडतोब काढून त्या जागी पर्यटकांना बसण्यासाठी आकर्षक बाके लावण्याची व्यवस्था केली जाणार आहे. त्यामुळे क्षणभर विश्रांती घेण्यासाठी पर्यटकांना फायदेशीर ठरू शकते. पर्यावरण, पर्यटन व नियोजन या समितीचे सभापती पद असल्याने या पदाला न्याय देण्यासाठी आम्ही तत्पर आहोत. स्वच्छतेच्या दृष्टीने प्लास्टिक मुक्त माथेरान करण्यासाठी नुकत्याच झालेल्या बैठकीत पावसाळी हलक्या दर्जाचे प्लास्टिक रेनकोटवर कायमची बंदीचा ठराव करण्यात आला आहे. तसेच, पर्यटन वाढीसाठी पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी त्यांना अत्यावश्यक सेवासुविधा पुरविणे हे नगरपरिषदेचे कर्तव्य आहे, असेही शिवाजी शिंदे यांनी स्पष्ट केले.

# चिंचवली येथील शेतकरी आक्रमक

■ **रेल्वे उड्डाण पुलाची मोजणी रोखली**

■ **स्थानिक पातळीवर मोठा विरोध**

**| नेरळ | प्रतिनिधी |**

**मुंबई-पुणे मार्गावर असलेल्या कर्जत तालुक्यातील चिंचवली येथे रेल्वेकडून उड्डाण पूल बांधला जाणार आहे. परंतु, या उड्डाण पुलाला स्थानिक पातळीवर मोठा विरोध होत असून स्थानिकांनी शासनाला निवेदने देऊन विरोध केला आहे. तरीदेखील रेल्वे अधिकारी उड्डाण पूल बांधण्यासाठी जमिनीची मोजणी करण्यासाठी त्याठिकाणी पोहचले. यादरम्यान, स्थानिकांनी मोजणी बंद पाडली.**



कर्जत तालुक्यातील चिंचवली येथील फाटक क्रमांक २३ बंद करण्यात येणार आहे. त्यामुळे त्या भागात उड्डाण पूल बांधण्यास मुंबई रेल कॉर्पोरेशन कडून परवानगी दिली आहे. त्यामुळे रेल्वेकडून त्या ठिकाणी उड्डाण पूल बांधण्यासाठी हालचाली केल्या जात आहेत. रेल्वे प्रशासनाने जुलै २०२३ रोजी नकाशात नमूद केल्या प्रमाणे हिरव्या रंगातील अलाइनमेंट निश्चित केली होती. या अलाइनमेंटमध्ये कोणत्याही स्थानिकांचे घर बाधित होत नव्हते, तसेच सध्याच्या अस्तित्वात असलेल्या रस्त्याला जोडली जात होती. मात्र, त्यानंतर डिसेंबर २०२५ रोजी रेल्वेने लाल रंगातील नवीन अलाइनमेंट निश्चित केली. या बदलामुळे अनेक रहिवाशांची घरे जमीनदोस्त होणार आहेत. विशेष म्हणजे, आजूबाजूला पर्यायी मोकळी जमीन उपलब्ध असतानाही हा निर्णय घेतला जात आहे. त्यामुळे हा प्रकार जाणीवपूर्वक होत असल्याची भावना स्थानिकांमधून निर्माण होत आहे.

याबाबत स्थानिक शेतकरी आणि रहिवाशी यांनी डेप्युटी कलेक्टर आणि रेल्वे प्रशासनाला लेखी आक्षेप नोंदवला होता. त्यानुसार, दि.३ एप्रिल रोजी डेप्युटी कलेक्टर श्रीकांत गायकवाड आणि रेल्वे अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली. त्यावेळी आमची हरकत नोंदवून तलाठी यांना पंचनामा तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या. त्यामध्ये स्पष्ट नमूद करण्यात आले की, कोणतेही घर बाधित होऊ नये. परंतु, आता पुन्हा शनिवारी (दि.१८) सर्व्हे होणार असल्याची नोटीस देण्यात आली आहे. पूर्वी निश्चित केलेल्या अलाइनमेंटमध्ये कमी शेतीजमीन बाधित होत होती, कोणतेही घर बाधित होत नव्हते आणि प्रकल्पाचा खर्चही कमी होणार होता. तरीसुद्धा त्या अलाइनमेंटचा विचार न करता नवीन अलाइनमेंट का राबवली जात आहे, हा प्रश्न उपस्थित होत आहे. तरीदेखील पोलीस बंदोबस्तात जबरदस्तीने सर्व्हे करण्याचा प्रयत्न होत असल्याने शेतकरी नाराज आणि संतप्त आहेत. रेल्वेकडून शेतकऱ्यांचे म्हणणे ऐकून घेतले जात नसल्याने शेवटी स्थानिक पातळीवर बाधीत होण्याच्या शक्यतेमुळे शेतकऱ्यांनी नियोजित उड्डाण पुलाच्या विरोधात ठाम भूमिका घेतली आहे. उड्डाण पुलाच्या नवीन रेखांकनामुळे शेतकरी आणि रहिवाशी यांनी मोजणी हाणून पाडली आहे. मोजणीसाठी आलेले रेल्वे अधिकारी कर्मचारी यांना स्थानिक शेतकऱ्यांच्या आक्रमक भूमिकेमुळे तेथून गाशा गुंडाळावा लागला.

> “आम्हाला पूर्वी दिलेल्या नोटीसीनुसार आमची कोणाचाही घरे तुटली जाणार नव्हती. परंतु,आता नवीन प्लॅन बनविल्याने अनेकांची घरे जमिनदोस्त होणार आहेत.हे लक्षात घेऊन शासनाकडे आम्ही दाद मागितली आहे.शासनाचा मुख्य उद्देश हा कमीतकमी पुनर्वसन करून प्रकल्प बांधण्याचे धोरण असते. परंतु, येथे एवढी घरे तोडून प्रकल्प पूर्ण करून आम्हाला देशोधडीला लावणार का?
> –योगेश विरले, स्थानिक रहिवाशी”

## वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात




**| भालनाका | प्रतिनिधी |**

अलिबाग तालुक्यातील भालनाका येथील ज्येष्ठ नागरिक संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवारी (दि.१२) संस्थेचे अध्यक्ष श्रीरंग घरत यांच्या उपस्थितीत जनआधार ग्रामीण सहकारी पतपेढीत पार पडली. या सभेमध्ये संस्थेच्या प्रगतीचा आढावा घेण्यासोबतच सभासदांच्या कौटुंबिक यशामध्ये सहभाग नोंदवत विविध सामाजिक उपक्रम राबवण्याचा संकल्प करण्यात आला.

सभेच्या सुरुवातीला मागील सभेचे इतिवृत्त, वार्षिक अहवाल आणि जमाखर्चाचे वाचन करण्यात आले. त्यानंतर सभासदांच्या नातवंडांनी शैक्षणिक व इतर क्षेत्रात मिळवलेल्या यशाबद्दल त्यांचा गुणगौरव करण्यात आला. तसेच, उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींचा सत्कार करण्यात आला. विशेष आकर्षण म्हणजे, ज्या सभासदांच्या विवाहास ५० वर्षे पूर्ण झाली आहेत, अशा आदर्श दांपत्यांचा संस्थेच्यावतीने विशेष सन्मान करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष श्रीरंग घरत यांनी संस्थेच्या वाटचालीची आणि भविष्यातील योजनांची माहिती उपस्थितांना दिली.

## शिरवली येथे कीर्तनाचे आयोजन




**| कोलाड | प्रतिनिधी |**

विठोबा, तुकोबा, ज्ञानोबा, शिवबा हे महाराष्ट्राचे खरे जादूगार आहेत. कारण विठोबाने प्रेम दिले, तुकोबाने गाथा दिली, ज्ञानोबाने ज्ञानेश्वरी व हरिपाठ दिला तर शिवबांनी सर्वांना स्वातंत्र दिले, असे मत कबीर आत्तार यांनी व्यक्त केले. शिरवली येथील पोटफोडे परिवारातर्फे किर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी गोवे सरपंच महेंद्र पोटफोडे, रविंद्र मरवडे, भाई देवकर, किरण ठाकूर, गणेश दिघे, ज्ञानेश्वर दळवी, गणेश नलावडे, भाऊ दळवी, अक्षय ओव्हाळ तसेच रोहा तालुक्यातील असंख्य वारकरी, महिला वर्ग व तरुण वर्ग उपस्थित होते.

## सुरक्षा रक्षकांच्या नेमणुकीची मागणी

**| नवीन पनवेल | प्रतिनिधी |**

स्मशानात अग्नी दिल्यानंतर होणारी राख कोणीतरी चोरून नेली होती. ही बाब चिंताजनक असून मानवी जीवनाची अवहेलना करणारी आहे. अशा प्रकारामुळे भविष्यात परिसरात तणावाचे वातावरण उद्भवण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे महानगरपालिका परिसरात शांतता आणि सुव्यवस्था भंग होण्याची चिन्हे आहेत. त्यामुळे याठिकाणी सुरक्षारक्षकांची नेमणूक करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य सुरक्षा रक्षक श्रम कामगार युनियनचे सरचिटणीस विनायक गांधी यांनी पनवेलच्या आयुक्तांकडे केली आहे.

## नगरपरिषदेच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



**| मुरुड | प्रतिनिधी |**

मुरुड नगरपरिषद शाळांमधील प्रज्ञाशोध परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. शिवसेना ठाकरे गटाचे शहर प्रमुख व नगरसेवक आदेश हरिश्चंद्र दांडेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा गौरव सोहळा संपन्न झाला. प्रज्ञाशोध परीक्षेत मुरुड तालुक्यातून स्वरांजली जगताप (इ.२री) हिने राज्यात ९३वा क्रमांक मिळवून तालुक्यात प्रथम स्थान पटकावले. अर्णव टोकलवाड (इ.४थी) आणि वेदिका भोसले (इ.६वी) यांनीही तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवला. यावेळी नगरसेवक रुपेश पाटील, श्रद्धा अपरा, देवयानी गुरव, उपशहर प्रमुख कासेकर, शकीब शाहबंदर, यश माळी व शिवसैनिक उपस्थित होते.

## नमिता घारे यांची ग्रामस्थांशी पाणीटंचाईवर चर्चा

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यातील पाषाणे ग्रामपंचायतीमधील आर्डे गावामध्ये गेली २ महिने पिण्याच्या पाण्याची टंचाई आहे. समाज माध्यमांवर याबाबत वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर कर्जत पंचायत समितीचे पदाधिकारी आणि अधिकारी आर्डे गावात पोहचले. सभापती नमिता घारे यांनी येथील पाणी टंचाई दूर करण्यासाठी प्रथम ग्रामस्थांशी चर्चा केली आणि त्यानंतर ग्रामपंचायत कार्यालयात जाऊन ग्रामपंचायत अधिकारी यांची झाडाझडती घेतली.




कर्जत तालुक्यातील पाषाणे ग्रामपंचायत हद्दीतील आर्डे गावात निर्माण झालेल्या तीव्र पाणीटंचाईच्या समस्येची माहिती मिळताच कर्जत पंचायत समितीचे पदाधिकारी आणि अधिकारी आर्डे गावात पोहचले. पंचायत समितीच्या सभापती नमिता सुधाकर घारे आणि गटविकास अधिकारी सुशांत पाटील हे तातडीने थेट गावात पोहचले. गावात सुमारे १४०० ते १५०० नागरिकांची वस्ती असून लघुपाटबंधारे विभागाच्या माध्यमातून धरणाजवळ बंधारा उभारून पाईपलाईनद्वारे पाणीपुरवठा करण्यात आला आहे. मात्र, अलीकडील काळात पाणी अत्यल्प प्रमाणात येत असल्याने महिलांना पाणी भरण्यासाठी लांब पायपीट करावी लागत होती. कपडे धुण्यासाठीही विहिरी किंवा बंधाऱ्याजवळ जावे लागत होते. या समस्येबाबत ग्रामस्थांनी सभापती नमिता घारे यांच्याकडे तक्रार केली होती.

या तक्रारीची दखल घेत सभापती नमिता घारे यांनी दि.१५ एप्रिल रोजी गटविकास अधिकारी सुशांत पाटील, पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी सुजित धनगर, विस्तार अधिकारी उज्ज्वला भोसले, राजपूत यांच्यासह गावात भेट देत परिस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेतला.

## पीएनपी होली चाईल्डचा १०० टक्के निकाल

■ **सिया राऊळ (९०.६० टक्के) संस्थेत प्रथम**



**| अलिबाग | प्रतिनिधी |**

राज्यातील सीबीएसई दहावी शालांत परीक्षेचा निकाल मंगळवारी (दि.१५) ऑनलाईन पद्धतीने जाहीर करण्यात आला. त्यामध्ये अलिबाग तालुक्यातील पीएनपी होली चाईल्ड वेश्वी सीबीएसई स्कूलने १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखत घवघवीत यश संपादन केले. विद्यार्थी अमीर अली खान याने ९० टक्के गुण मिळवून शाळेत पहिला क्रमांक पटकावला आहे. तर, मनस्व थळे याने ८८.२ टक्के गुणांसह दुसरा क्रमांक मिळवला आणि विधी निगडे हिने ८६ टक्के गुण प्राप्त करून तिसरा क्रमांक पटकावला आहे. तसेच, पीएनपी सायरस पुनावाला स्कूल नागावचा ९३ टक्के निकाल लागला असून विद्यार्थिनी सिया राऊळ हिने ९०.६० टक्के गुण मिळवून संस्थेत प्रथम येण्याचा बहुमान पटकावला आहे. तर, पीएनपी वाय.एम.पी. सांबरी सीबीएसई स्कूलचा निकाल ८६ टक्के लागला आहे. या नेत्रदीपक यशाबद्दल सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे पीएनपी एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष जयंत पाटील, खजिनदार नृपाल पाटील, कार्यवाह चित्रलेखा पाटील, पीएनपी होली चाईल्ड वेश्वी शाळेच्या मुख्याध्यापिका वेल्लईम्मल्ल वेणी, सायरस पुनावाला नागाव शाळेच्या मुख्याध्यापिका गीतिका भूचर आणि पीएनपी वायएमपी शाळेच्या मुख्याध्यापिका मेधा दुबे यांच्यसाह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकडून भरभरून कौतुक व अभिनंदन करण्यात येत आहे.

## रिलायन्स फाऊंडेशनचे सर्व विद्यार्थी उत्तीर्ण

**| नागोठणे | प्रतिनिधी |**

रिलायन्स फाऊंडेशन स्कूलच्या दहावी सी.बी.एस.सी परीक्षेचा निकाल १०० टक्के लागला आहे. तसेच, परीक्षेला बसलेले सर्व ६६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. या स्कूलची विद्यार्थीनी सई रोकडे हिने ९५.७१ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक मिळविला आहे. तर, सान्वी पाटील (९५.५७ टक्के) व तीर्था जवके (९३.८६ टक्के) यांनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविला आहे. तसेच, स्वरा मुंडे (९२.८६ टक्के) व रुचल जाना (९२.७१ टक्के) या दोघी अनुक्रमे चतुर्थ व पाचव्या क्रमांकाने उत्तीर्ण झाल्या आहेत.

## पेंधर-खारघर मार्गाच्या कामाला गती



**| पनवेल | ग्रामीण प्रतिनिधी |**

पेंधर ते तळोजा फेस-२ मार्गे खारघरला जोडणाऱ्या महत्त्वाच्या रस्त्याच्या कामाला सध्या वेग आला आहे. मुंब्रा-पनवेल मार्गावरील उड्डाणपूलाचे काम पूर्ण झाल्याने पुढील जोडरस्त्याच्या विकासाला चालना मिळाली आहे. या प्रकल्पामुळे पेंधर, तळोजा फेस १ आणि २ तसेच तळोजा औद्योगिक वसाहत परिसरातील वाहन चालकांना मोठा दिलासा मिळणार आहे. येथील रहिवाशांना अवघ्या काही मिनिटांत हार्बर रेल्वे मार्गावरील खारघर रेल्वे स्थानक गाठने शक्य होणार आहे. सध्या या मार्गावर डांबरीकरण, रस्त्याचे रुंदीकरण तसेच सुरक्षा बॅरिअर्स उभारण्याचे काम सुरू आहे. काही ठिकाणी बेस लेयर आणि स्ट्रक्चरल कामे पूर्ण झाली असून, अंतिम टप्प्यातील कामे युद्धपातळीवर सुरू असल्याचे दिसून येते. मुंब्रा-पनवेल मार्गावरील उड्डाणपूल पूर्ण झाल्यामुळे या नव्या जोडरस्त्याला थेट कनेक्टिव्हिटी मिळाली आहे. त्यामुळे पेंधर, तळोजा आणि खारघर परिसरातील नागरिकांना पर्यायी व जलद मार्ग उपलब्ध होणार आहे. विशेषतः दैनंदिन प्रवाशांसाठी हा मार्ग वेळ व इंधन बचतीसाठी उपयुक्त ठरणार आहे. स्थानिक नागरिकांनी या प्रकल्पाचे स्वागत केले आहे.

**ॲड. गौतम पाटील यांच्याकडून शुभेच्छा** | **एकूण २८७ विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र**

## जेएसएमचा पदवी प्रमाणपत्र वितरण सोहळा

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

जेएसएम. व ॲड. दत्ता पाटील विधी महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठीचा पदवी प्रमाणपत्र वितरण सोहळा बुधवारी (दि.१५) संपन्न झाला. यावेळी जेएसएम महाविद्यालयातील २०७ आणि विधी महाविद्यालयातून ८० पदवी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना पदवी व पदव्युत्तर पदवी प्रमाणपत्र देण्यात आले.





या सोहळ्याचे अध्यक्ष म्हणून जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. गौतम पाटील हे उपस्थित होते. तर, उपाध्यक्षा डॉ. साक्षी पाटील या विशेष अतिथी म्हणून उपस्थित होत्या. यावेळी व्यासपीठावर जेएसएम कॉलेजच्या प्राचार्य डॉ. सोनाली पाटील व ॲड. दत्ता पाटील विधी महाविद्यालयाच्या प्र.प्राचार्य डॉ. नीलम हजारे आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाला पदवीप्राप्त विद्यार्थ्यांच्या मिरवणुकीने या कार्यक्रमाला प्रारंभ झाला. यावेळी ॲड. दत्ता पाटील विधी महाविद्यालयाच्या प्र. प्राचार्य ॲड. डॉ. नीलम हजारे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. त्यांनी सर्व यशस्वी पदवीधर विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना भावी वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या. आपल्या मनोगतात प्राचार्य डॉ. सोनाली पाटील यांनी, पदवीदान समारंभ हा विद्यार्थ्यांच्या जीवनातील एक महत्वाचा व अविस्मरणीय क्षण असून विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या ज्ञानाचा स्वतःच्या व समाजाच्या उत्कर्षासाठी विनियोग करावा, असे आवाहन करत, भावी आयुष्यात विशेष कर्तृत्व करून दाखवावे, असे प्रोत्साहन दिले.

त्यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष ॲड. गौतम पाटील यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या व पदवी प्रमाणपत्र वितरण करण्यासंबंधीची उद्घोषणा केली. यावेळी जे. एस. एम. महाविद्यालयातील कला, विज्ञान आणि वाणिज्य शाखांमधून पदवी प्राप्त केलेल्या २०७ विद्यार्थ्यांना, तर विधी महाविद्यालयातून पदवी प्राप्त केलेल्या ८० विद्यार्थ्यांना पदवी व पदव्युत्तर पदवी प्रमाणपत्र अध्यक्ष ॲड. गौतम पाटील, उपाध्यक्षा डॉ. साक्षी पाटील, प्राचार्य डॉ. सोनाली पाटील, प्र. प्राचार्य ॲड. नीलम हजारे व विविध विषयांचे विभागप्रमुख यांच्या हस्ते प्रदान करण्यात आली.

कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। RGD/016/2026-2028






## राशीभविष्य

- **मेष** : सुवार्ता कानी येईल. आर्थिक व्यवहार लाभदायक ठरतील. महत्त्वाच्या भेटीतून दिलासा मिळेल.
- **वृषभ** : खर्च वाढला तरी प्राप्ती तशीच राहील. यांत्रिक क्षेत्रात उत्कर्षाच्या संधी लाभतील. आनंदी रहाल.
- **मिथुन** : नव्या जबाबदाऱ्या येतील. कामाचा ताण वाढेल. खरेदी-विक्रीच्या व्यवहारात लाभ होईल.
- **कर्क** : व्यवसायात साधारण स्थिती राहील. छोटा-मोठा प्रवास घडेल. स्थावर प्रश्न प्रलंबित राहतील.
- **सिंह** : अपेक्षाभंगाचं दुःख संभवतं. कर्तव्याकडे अधिक लक्ष द्यावं. प्रेम प्रकरणात अकारण वाद टाळावे.
- **कन्या** : अनपेक्षित दिलासा मिळेल. नोकरीत पदोन्नतीच्या हालचाली होतील. प्रवास शक्यतो टाळावा.
- **तूळ** : महत्त्वाच्या भेटी लांबणीवर पडतील. व्यवहारात नुकसान संभवतं. विचारपूर्वक बोलायला हवं.
- **वृश्चिक** : वरिष्ठांशी मतभेद संभवतात. स्वप्रयत्नानेच अपेक्षित साध्य करू शकाल. बाकी चिंता नसावी.
- **धनु** : आजचा दिवस धावपळीचा राहील. उष्णतेचा त्रास संभवतो. पूर्वीच्या गुंतवणुकीतून लाभ होईल.
- **मकर** : गृहकलह वेळीच टाळायला हवा. वाहन चालवताना काळजी घ्या. बेरोजगारांना दिलासा मिळेल.
- **कुंभ** : प्रियजनांच्या भेटीगाठी होतील. घरगुती व्यवसायाचा व्याप वाढेल. कलाकारांना संधी लाभतील.
- **मीन** : आनंदवार्ता समजेल. विवाहाच्या प्रयत्नात दिलासा मिळेल. प्रेम प्रकरणात दिलासा मिळेल.

## १७ एप्रिल — दिनविशेष

१९७५ : भारताचे दुसरे राष्ट्रपती सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे निधन.


२०१३ : बंगळुरूमध्ये भारतीय जनता पक्षाच्या कार्यालयाबाहेर झालेल्या शक्तिशाली स्फोटात १६ जण जखमी.

२०१६ : म्यानमारचे अध्यक्ष तिने क्याव यांनी ८३ राजकीय कैद्यांची शिक्षा माफ केली.

२०१८ : चेन्नई, मुंबई आणि हैदराबाद विमानतळांवरून एकाच वेळी विमानांचे अपहरण करण्याच्या दहशतवाद्यांच्या डावाचा संशय व्यक्त.

## आरोग्यमंत्र — भयानक क्षयरोग

क्षय अथवा टीबी हा अतिशय गंभीर आजार असून भारतात दर दिवशी ४० हजारांपेक्षा अधिक लोकांना याचा संसर्ग होतो हे वास्तव भयावह आहे. यापैकी पाच हजारांहून अधिक लोकांनी क्षयाची लागण होते असं एका आकडेवारीवरुन दिसून येतं. क्षयाने मृत्युमुखी पडण्याचं प्रमाण दर दीड मिनिटाला एक रूग्ण असं आहे. जागतिक आरोग्य संस्थेच्या अंदाजानुसार २०२० मध्ये जगातील अंदाजे एक अब्ज जनसंख्या क्षयरोगाने ग्रस्त असेल. १९९२ मध्ये शासनस्तरावर राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम सुरू करण्यात आला असून २००५ पर्यंत हा कार्यक्रम संपूर्ण देशात राबवण्याचा संकल्प सोडण्यात आला आहे. क्षयरोग हा मायक्रोबॅक्टेरियम ट्युबरक्युलोसीस नावाच्या जंतूमुळे होणारा संसर्गजन्य रोग आहे. १८८२ मध्ये डॉ. रॉबर्ट कॉक यांनी क्षयरोगाच्या जिवाणूंचा शोध लावला. जागतिक शास्त्रज्ञांच्या परिषदेत या संबंधीचा प्रबंध मांडला आणि २४ मार्च रोजी त्याला मान्यता मिळाली. म्हणूनच दरवर्षी २४ मार्च हा दिवस जागतिक क्षयरोग दिन म्हणून पाळला जातो. क्षयरोग (टीबी) झालेला रुग्ण बोलला, थुंकला किंवा शिंकला तरी त्याच्या शरीरातील क्षयाचे जंतू बाहेर पडतात आणि हवेद्वारे जवळ असलेल्या निरोगी व्यक्तीच्या शरीरात प्रवेश करतात. त्यामुळे त्या निरोगी व्यक्तीलाही क्षय जंतूचा संसर्ग होतो. संसर्ग झालेल्या व्यक्तीची रोग प्रतिकार शक्ती कमी झाल्यास अशा व्यक्तींना लगेचच क्षयरोगाची लागण होते.



## टेक नॉलेज — घरबसल्या जगाची भ्रमंती!

गुगलच्या 'अर्थ व्हर्च्युअल रिॲलिटी' या फीचरमुळे तुम्ही जगातल्या कोणत्याही ठिकाणाला भेट देऊ शकता. फीचरचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे ही ठिकाणं बघण्यासोबतच तिथे उपस्थित असल्याचा अनुभवही तुम्हाला मिळू शकतो. अर्थात यासाठी तुमच्याकडे व्हीआर थ्रीडी हेडसेट असला पाहिजे. यामुळे युजर्सना थ्रीडीसारखा अनुभव घेता येईल.

आपल्या मनात काही ठिकाणांचं विशेष स्थान असतं. या आठवणींना उजाळा देण्याची संधी गुगलच्या या फीचरमुळे तुम्हाला मिळू शकते. या फीचरचा वापर करण्यासाठी त्या ठिकाणचा पत्ता किंवा नाव टाकावं लागेल. यानंतर ते ठिकाण स्क्रीनवर दिसू लागेल. थ्रीडी हेडसेट लावला की त्या ठिकाणी उपस्थित असल्यासारखा अनुभव घेता येईल. मग मित्रांनो, आहे ना धम्माल? सुटीत कुठे फिरायला जायचा बेत नसेल तर गुगलच्या या व्हर्च्युअल सेवेचा वापर करायला हरकत नाही. गुगलच्या या उपक्रमामुळे जगभ्रमंती आवाक्यात आली आहे हो की नाही!

## करीअर ग्रोथ

सोशल मीडियावरच्या 'टेन ईयर चॅलेंज'बद्दल तुम्हाला माहीत असेल. या संकल्पनेत थोडा बदल करून तुम्ही करीअरच्या दृष्टीने याचा विचार करू शकता. म्हणजे आजपासून दहा वर्षांनी तुम्ही करीअरच्या कोणत्या टप्प्यावर असाल याचं आकलन करायचं. करीअरच्या दृष्टीने स्वतःलाच दहा वर्षांचं म्हणजे 'टेन ईयर चॅलेंज' कसं द्यायचं याबाबतच्या काही टिप्स...

* ध्येय ठरवणं सर्वात महत्त्वाचं. कोणत्याही ध्येयाशिवाय घेतलेल्या निर्णयांना काहीही अर्थ नसतो. मात्र ध्येय ठरलेलं असेल तर तुम्ही प्रत्येक निर्णय त्याच्याशी जोखून घेऊ शकता. (क्रमशः)

## ब्युटी टॉक — उन्हाळ्यासाठी मेक अप टिप्स

मेक अप तुमचं सौंदर्य खुलवू शकतो किंवा तुमच्या लूकची पुरती वाट लावू शकतो. मेक अप उत्पादनांचा वापर तुम्ही कसा करताय, यावर सगळं काही अवलंबून असतं. त्यातच उन्हाळ्यात विशेष काळजी घेणं गरजेचं असतं. तापलेल्या वातावरणात मेक अपच्या कोणत्या चुका टाळाव्या याविषयी...

* कालावधी संपलेली सौंदर्य प्रसाधनं, मेक अप प्रोडक्ट्स कचऱ्याच्या डब्यात टाका. जुनी उत्पादनं वापरल्याने चेहऱ्यावर पुरळ येऊ शकतं. ॲलर्जी होण्याची शक्यता असते. त्यातच अशी उत्पादनं परिणामकारक ठरत नाहीत. त्यामुळे मेक अपचं साहित्य कितीही महाग असलं तरी ते वापरू नका.

* ब्रशमुळे मेक अप योग्य पद्धतीने करता येतो. त्यामुळे तुमच्याकडचे सगळे ब्रश नियमित स्वच्छ करा. घाणेरड्या, धूळ साचलेल्या ब्रशमुळे ॲलर्जी होऊ शकते. साबण मिश्रित गरम पाण्याने ब्रश धुवून घ्या. मग अँटीसेप्टिक लोशनमध्ये काही वेळ बुडवून ठेवा. यानंतर वाळवा. मेक अप ब्रश बाथरूममध्ये ठेऊ नका. पूर्ण वाळल्याशिवाय वापरू नका. (क्रमशः)

## पंचांग

**शुक्रवार, १७ एप्रिल २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८,
चैत्र कृ. १५, चंद्रराशी : मीन,
नक्षत्र : रेवती, योग : वैधृति/विष्कंभ,
सूर्योदय ६.२२, सूर्यास्त ६.५४

## फॉरवर्ड्स

**लोग़ दीवानें हैं बनावट क़े...**

**हम कहाँ जायें सादगी लेंकर....!**

## गुंतवणूक — मार्ग बचतीचे

लहान वयापासून बचतीची सवय लागली तर आर्थिक शिस्त लागतेच शिवाय भविष्यकाळ अधिक सुरक्षित होतो. नोकरीला नुकतीच सुरूवात केलेल्या तरूणांवर जबाबदाऱ्याही कमी असतात. त्यामुळे ३० टक्के बचतीचं लक्ष्य ठेवता येतं.



* सर्वप्रथम गुंतवणुकीचे योग्य मार्ग शोधा. गुंतवणुकीचा योग्य पर्याय निवडला नाही तर भविष्यात महागाईचा दर वाढल्यावर आपल्या पैशांचं मूल्यही कमी होतं. त्यामुळे अशा गुंतवणुकीला काहीच अर्थ उरत नाही. * फारसे धोके पत्करायचे नसतील तर पोस्ट ऑफिसमधल्या योजना, एनएससी, सुकन्या अशा योजनांमध्ये गुंतवणूक करता येईल. बँकेच्या तुलनेत पोस्ट ऑफिसमधल्या योजनांवर चांगलं व्याज मिळू शकेल. * गुंतवणुकीत थोडे धोके पत्करायचे असतील तर शेअर बाजार, म्युच्युअल फंड यात गुंतवणूक करा. नुकतीच नोकरी सुरू केली असेल तर तुम्ही काही धोके पत्करू शकता. फारशा जबाबदाऱ्या नसल्यामुळे हे शक्य होतं. * गाव किंवा शहराच्या लगतच्या प्लॉटमध्ये पैसे गुंतवणं ही एक महत्त्वाची गुंतवणूक ठरू शकते. पुढील दहा वर्षांमध्ये या जागेची किंमत काही पटीने वाढू शकते. त्यासाठी या परिसराचा अभ्यास मात्र नेटका हवा.

## खेचाखेची — साम्य !

बायकोत आणि सूर्यात काय साम्य आहे?

.
.
.
.
.
.

कितीही प्रयत्न केला तरी , आपण या दोघांकडे रागाने आणि एकटक पाहूच शकत नाही !

## वेगळं काही

तंदुरूस्त राहण्यासाठी चीनमधील झू विबू हा माणूस नदी पार करून कामाला जातो. ही नदी तो नावेतून किंवा पुलावरून पार करत नाही तर चक्क पोहत जातो. गेल्या अनेक वर्षांपासून तो याच पद्धतीचा अवलंब करतो. आपल्या कार्यस्थळी पोहोचण्यासाठी त्याला २.२ किलोमीटर अंतर पोहून जावं लागतं. पोहल्यामुळे तो फक्त अर्ध्या तासात कामाच्या ठिकाणी पोहोचतो तर ट्रेनने जायचं असेल तर त्याला एक तास लागू शकतो. झू चीनमधल्या हेनयांग जिल्ह्यात राहतो. तो वुचांग इथल्या फूड मार्केटमध्ये मॅनेजर म्हणून काम करतो. झू दररोज सकाळी सात वाजता नदीच्या किनारी पोहोचतो. कपडे, बूट आणि इतर वस्तू काढून एका वॉटरप्रूफ बॅगमध्ये ठेवतो. मग नदीतून पोहत जातो.

## लाईफ स्टाईल — कार ठेवा फ्रेश

आरामशीर प्रवासासाठी बरेच युवक कारला प्राधान्य देतात. स्वतःच्या कारमधून प्रवास करण्याची शानचं वेगळी असते. मात्र कारची स्वच्छता ही एक कटकटीची बाब ठरते. स्वच्छतेचे निकष पाळले नाहीत तर कारमध्ये दुर्गंध येतो. प्रदुषित हवेमुळे घुसमटल्यासारखं वाटतं. या समस्या सोडवण्यासाठी कार आयोनायझर सोबत ठेवा. यामुळे ताजेपणाची अनुभूती मिळू शकेल.

* कारमध्ये धूम्रपान केल्यानंतर धूर आणि वास भरून राहतो. त्याचा प्रभाव दूर करण्यासाठी कारमध्ये छानसा परफ्युम स्प्रे करा. * कधीकधी कारच्या एसीमधूनही वेगळा वास येऊ लागतो. अशा वेळी कार एसी क्लीनरचा वापर करू शकता. कार एसी क्लीनरमुळे चांगला गंध येतोच शिवाय जंतूही मरून जातात. अँटीबॅक्टेरियल क्लीनर निवडा. * कारच्या सीटमध्ये तसंच इतर ठिकाणी साठलेली धूळ काढून टाकण्यासाठी छोटा व्हॅक्युम क्लीनर मिळतो. या व्हॅक्युम क्लीनरमुळे आतली धूळ निघून जाते आणि कार चमकू लागते. * कार स्वच्छ करण्यासाठी घरातला कपडा न वापरता मायक्रोफायबरचं कापड वापरावं लागतं. यामुळे कारवर स्क्रॅचेस पडत नाहीत आणि ती नवी कोरी दिसते.

## सुडोकू ९२

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ३ | | ४ | | ७ | | २ |
| ७ | | | २ | | ८ | | | |
| | २ | | | | | | ३ | |
| | ७ | ५ | | | १ | ३ | ९ | |
| ६ | ३ | | ४ | | ७ | | २ | १ |
| | ८ | १ | ९ | | | ४ | ७ | |
| | ५ | | | | | | १ | |
| | | | १ | | ५ | | | ७ |
| १ | | ७ | | ९ | | २ | | |

टीप -

* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्र ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.


* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.

* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ९१ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | २ | ३ | ९ | ८ | ६ | १ | ४ | ५ |
| ८ | १ | ५ | २ | ३ | ४ | ९ | ७ | ६ |
| ४ | ६ | ९ | ५ | १ | ७ | २ | ३ | ८ |
| ६ | ५ | ४ | ७ | ९ | ३ | ८ | २ | १ |
| २ | ८ | १ | ६ | ४ | ५ | ३ | ९ | ७ |
| ३ | ९ | ७ | ८ | २ | १ | ५ | ६ | ४ |
| ५ | ३ | ६ | १ | ७ | ९ | ४ | ८ | २ |
| ९ | ७ | ८ | ४ | ५ | २ | ६ | १ | ३ |
| १ | ४ | २ | ३ | ६ | ८ | ७ | ५ | ९ |

## शब्दकोडे क्रमांक ९२



**आडवे शब्द :-**

१) सायंकाळ
५) मौखिक चाचणी
८) विजार, तुमान
१०) संगीतातील लकेर
११) मोठी तलवार
१३) टरफल
१४) अनुमती
१७) चांदणी
१९) सरहद्द
२०) उत्सवाचे दिवस
२२) बिना वासाचे पांढरे फूल
२३) अर्धवर्तुळाकार
२६) होडी
२७) शरीर
२९) पोपट
३०) सौंदर्य लाभलेला
३१) सख्खा भाऊ
३३) रागी धान्याचे एक नाव
३४) सहाय्य
३६) बूड
३७) आजच्या आधीचा दिवस
३८) न थांबता
३९) घाण
४०) पुष्कळ
४१) कट्टा,ओटा
४३) मनाचे समाधान होईल इतके
४५)शूल, झाडाचा टोचणारा अवयव
४६) कानन
४७) सारखा
४८) पान,पाकळी, तुकडी
४९) ढम ढम वाजणारे मोठे वाद्य
५१) घोडा
५२) जखमेवर केलेला तात्पुरता इलाज
५४) पवनपुत्र
५६) एक सुगंधी वनस्पती
५८) धनी
५९) राष्ट्रीय पक्षी
६०) मोठी उथळ वाटी
६१) मोठी नदी
६३) बातमीदार
६७) यमयातना भोगण्याची जागा
६९) नवरदेव
७१) आईची बहीण
७३) उत्तराधिकारी
७६) बादशाह शाहजहानने बांधलेली जगप्रसिद्ध वास्तू
७८) त्रास
७९) जोंधळ्याचा दाणा
८२) रंग (इं)
८३) तसराळे

**उभे शब्द :-**

१) राग
२) रुप ( चे.)
३) प्रवासातील एक टप्पा
४) मृत्युदेवता
५) मुख
६) साडीचा शेवटचा भाग
७) धुणे
८) मुरली
९)मोठा,शक्तीमान,जास्त
१२) पोते शिवण्याची सुई.
१३) माल,वस्तू
१४) पंख
१५) छोटी वसाहत
१६) शायर, कवी
१७) तारकांचा स्वामी,चंद्र
१८) कार्य,काज
१९) हद्दीचे भांडण
२०) जळाऊ लाकूड,कोळसा इ.
२१) गाड्या उभ्या करण्याची जागा
२३) युक्ती
२४) सुधा,मद्य
२५) सेवक,गुलाम
२६) नाविकदल
२८) मागणारा
३२) नकारच्या विरुद्ध
३५) तृष्णा
३८) निष्फळ आक्रोश
३९) हत्तीच्या गंडस्थळातील स्त्राव
४०) मूळ रस्त्यापासून फुटलेला दुसरा रस्ता
४१) कबूतर
४२) दारुचा एक प्रकार
४३) मऊ,तलम कापड
४४) जाणूनबुजून
४५) वेळ घाळविणे
४७) एक शिकारी पक्षी
५०) तमाशा कलावंत
५३) अर्धांगवायू
५५) अभिनेता,बोल्टचा साथीदार
५७) चेहरा, मुख
५८) माणुसकी
६२) छिद्र
६४) भारवाहक
६५) आवाज
६६) मोठा भाऊ
६८) जिव्हा
७०) धोबी
७२) थंड,गार
७३) चामड्याचा दोर, फिर्यादी
७४) अंगरखा
७५)चेहऱ्यावरील तेज
७७) बाजार
८०) छाती
८१) वेल

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



विनायक दळवी

## डग आऊटमधील फोन वापराचा नवा वाद



आयपीएल आणि वाद यांचे सौख्य सर्वश्रुत आहे. अगदी पहिल्या आयपीएल स्पर्धेपासून कोणत्या ना कोणत्या विषयावर वाद होत राहिले. काही विकोपाला गेले. काही शुल्लक होते, ते मिटवण्यात आले. यंदाच्या आयपीएलमध्ये, डग आऊटमधील फोन पाहण्याच्या प्रसंगावरून वाद घडला. राजस्थान रॉयल्स संघाचे व्यवस्थापक रोमी भिन्दर 'डग आऊट' मध्ये म्हणजे मैदानातील खेळाडू बसण्याची जागा. जिथे फोनचा वापर पूर्णपणे वर्जित आहे तेथे मोबाईल फोन पाहताना हे दृश्य वायरल झालं. त्या छायाचित्रात, हे व्यवस्थापक फोन पाहत असताना, त्या फोनमध्ये कौतुकाने डोकावून पाहणारा वैभव सूर्यवंशी हा खेळाडू स्पष्ट दिसत होता.त्यामुळे हा वाद आणखीन उफाळून वर आला. आश्चर्याची गोष्ट अशी की आयपीएलची स्पर्धा ज्यांच्या कल्पना सुपीक डोक्यातून जन्माला आली आणि साकारली गेली त्या ललित मोदी यांनी हे छायाचित्र पाहून, बीसीसीआयने यावर ॲक्शन घ्यावी अशी मागणी केली.

आयपीएल आणि वाद याप्रमाणे ललित मोदी आणि वाद हे देखील त्यावेळी समीकरण झालं होतं. पहिल्या तीन वर्षात ललित मोदी अनेक वादग्रस्त प्रसंगात घेरले गेले होते. त्याच ललित मोदी यांनी या प्रकरणावर कारवाई करावी, अशी मागणी केल्यानंतर सर्वप्रथम आश्चर्य वाटलं. तिसऱ्या आयपीएल स्पर्धेनंतरच ललित मोदी यांची, बीसीसीआयने गच्छंती केली होती. तेव्हापासून ते भारताबाहेरच आहेत. त्यांच्यावर अनेक प्रकारचे गंभीर आर्थिक गुन्हे दाखल केले गेले आहेत. अशा व्यक्तीने या प्रसंगावर फास्ट केलं आणि कारवाईची मागणी केली मात्र बीसीसीआय किंवा अन्य कुणालाही याबाबत कारवाई करण्यात यावी असं का वाटलं नाही? बीसीसीआयच्या अँटी करप्शन युनिटने मात्र वेळीच या प्रकरणी भिन्दर यांना नोटीस पाठवली होती. त्यावर देखील बीसीसीआयने अद्याप काहीही कारवाई केली नाही. भिन्दर यांना फुफ्फुसाचा विकार असून त्याचा त्रास होत असल्याचा म्हटले जाते. त्यामुळे त्यांना वैद्यकीय मदतीकरिता ही सवलत दिली गेली होती. एवढी नाजूक परिस्थिती असताना, मैदानाच्या प्रतिबंधित जागेत त्यांनी फोन पाहणे आक्षेपार्हच आहे. त्यांना मोबाईल इमर्जन्सी वापरासाठी स्वतःजवळ ठेवण्याची मुभा आहे. मात्र फोन पाहतानाचा त्यांचा फोटो व्हायरल झाला आहे. त्यापेक्षाही आक्षेप घेण्याजोगी घटना म्हणजे, भारताचा एक उदयोन्मुख फलंदाज वैभव सूर्यवंशी त्यांच्या फोनमध्ये डोकावून काहीतरी पाहत होता.

नेमकं ते काय होतं ? त्यामुळे या घटनेला अधिक महत्व प्राप्त झाले. निकाल निश्चितीचे मार्ग अधिक विकसित झाले आहेत. अशावेळी मैदानात, समोर सामना सुरू असताना, डग आऊटमध्ये राजरोसपणे फोन पाहणे हा मोठा प्रमाद आहे. कुणाच्यातरी चपळाईमुळे हा प्रसंग कॅमेऱ्याच्या चौकटीत पकडला गेला. अशा कितीतरी घटना घडल्यानंतर देखील दुर्लक्षित केल्या गेल्या असल्याची देखील शक्यता नाकारता येत नाही. एकीकडे छोट्या शुल्लक गोष्टींसाठी देखील खेळाडू किंवा काही संबंधितांवर कारवाई केली गेली होती. अशा अनेक घटना घडल्या आहेत. ही गोष्ट मात्र नजरेतून कशी सुटली.

चोरी करणारे खेळाडू किंवा निकाल निश्चितीच्या प्रकरणातील खेळाडू बेमालूमपणे काही गोष्टी करीत असतात. त्यांच्यावर बारकाईने डोळ्यात तेल घालून लक्ष देण्यासाठी अँटीकरप्शन युनिटची स्थापना झाली. त्यांनी देखील मैदानात वावरणाऱ्या अनेकांच्या मदतीने अनेक प्रकरणे बीसीसीआय किंवा आयसीसीच्या दृष्टीस आणून दिली होती, मात्र त्यावर किती कठोरपणे कारवाई केली. याबाबतचा तपशील फारसा चांगला नाही. यावेळी देखील सत्य काय आहे. ते बाहेर येण्याची शक्यता कमीच दिसते. भिन्दर यांना वैद्यकीय मदतीसाठी फोन वापरण्याची दिलेली मुभा, हे कारण पुढे केलं जाऊन, प्रकरण दडपले जाईल. याची शक्यता अधिक वाटते.

फोनवर उघडपणे पाहणाऱ्या वैभव सूर्यवंशीच्या कृतीचे काय? सध्या वयाची १८ वर्षे देखील पूर्ण न करणाऱ्या सूर्यवंशी सारख्या अनेक कुमार किंवा किशोरवयीन खेळाडूंना वारेमाप पैसा बीसीसीआय आणि जाहिरातदार किंवा फ्रँचाईजी यांच्याकडून मिळत असतो. तरी देखील त्यापेक्षाही मोठा आर्थिक लाभ मिळावा, यासाठी खेळाडू जाळ्यात फसत असतात.

या खेळाडूंना पाठीशी घालणारे फ्रँचाईजीचे मालक असतात काही पदाधिकारीदेखील असतात त्यांच्या आशीर्वादानेच अशा गोष्टी घडत असतात. खेळाडूंना जाळ्यात ओढणाऱ्यांना त्यापेक्षाही मोठा आर्थिक लाभ होत असतो. दुर्दैवाची गोष्ट अशी की या सर्व कृष्णकृत्यांमध्ये फ्रँचाईजीचे मालक किंवा त्या संदर्भातील व्यवस्थापनातील काही लोक सामील असतात अशी वदंता आहे. त्या बाबतीत बीसीसीआयने याआधी अनेक फ्रेंचाईजींचे मालक आणि व्यवस्थापक यांच्यावर कारवाई केली आहे. तरी देखील असे प्रकार घडतच आहेत.

# वैशालीने चेस कँडिडेट्स स्पर्धा जिंकली

## स्पर्धा जिंकणारी पहिली भारतीय महिला; वर्ल्ड चॅम्पियनशिपमध्ये जू वेनजुनशी सामना

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

भारताच्या २४ वर्षीय बुद्धिबळपटू वैशाली रमेशबाबूने १५ एप्रिल रोजी सायप्रसमधील कॅप सेंट जॉर्ज हॉटेल अँड रिसॉर्टमध्ये खेळल्या गेलेल्या अंतिम फेरीत शानदार विजय मिळवला आणि महिला उमेदवारी स्पर्धा २०२६ चे विजेतेपद पटकावले. या विजयासह, ती उमेदवारी स्पर्धा जिंकणारी पहिली भारतीय महिला ठरली आहे. आता ती जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत चीनच्या विद्यमान विश्वविजेत्या जू वेनजुनला आव्हान देईल. वैशालीने अंतिम फेरीत पांढऱ्या मोहऱ्यांनी खेळताना रशियाच्या अनुभवी खेळाडू कॅटरिना लग्नोला हरवले.



रशियाच्या कॅटरिना लग्नोने सामन्याच्या सुरुवातीला सिसिलियन डिफेन्सची ड्रॅगन व्हेरिएशन वापरली. म्हणजेच, तिने आपल्या राजाला सुरक्षित ठेवत काळ्या मोहऱ्यांची अशी मांडणी केली की तिचा उंट (बिशप) कोपऱ्यातून लांब अंतरापर्यंत प्रभाव टाकू शकेल.याला प्रत्युत्तर म्हणून वैशाली रमेश बाबूने युगोस्लाव्ह अटॅक खेळला. याचा अर्थ, तिने सुरुवातीपासूनच पांढऱ्या मोहऱ्यांनी किंग साइडवर (राजाच्या बाजूने) जोरदार हल्ला करण्याची रणनीती अवलंबली आणि खेळावर पकड मिळवली.

सुमारे १६व्या चालीपर्यंत वैशालीकडे स्पष्ट आघाडी होती. त्यानंतर तिने घाई न करता आपली स्थिती आणखी मजबूत केली आणि हळूहळू तिचे विजयात रूपांतर केले. यादरम्यान तिने रशियन खेळाडूच्या चुकांचाही पुरेपूर फायदा घेतला.४८व्या चालीवर लग्नोने हार मानली. त्यावेळी वैशालीकडे क्वीन आणि दोन हत्ती (रूक) होते, तर लग्नोकडे फक्त क्वीन आणि उंटच शिल्लक होता. ही स्थिती स्पष्टपणे वैशालीच्या बाजूने होती, त्यामुळे विजय निश्चित झाला. अंतिम फेरी सुरू होण्यापूर्वी वैशाली रमेशबाबू आणि कझाकिस्तानची बिबिसारा असौबायेवा ७.५ गुणांसह बरोबरीत होत्या.अंतिम सामन्यात कझाकिस्तानी खेळाडूला भारताच्या दिव्या देशमुखने ड्रॉवर रोखले. याचा फायदा वैशालीला मिळाला, त्यामुळे तिला आघाडी मिळाली आणि ती चॅम्पियन बनली. वैशाली स्पर्धेत सर्वात कमी रेटिंग असलेली खेळाडू होती. पहिले चार सामने ड्रॉ झाले आणि पाचव्या सामन्यात तिला पराभव पत्करावा लागला. यानंतर तिने सातत्याने उत्कृष्ट खेळ दाखवत पुनरागमन केले आणि विजेतेपद पटकावले.

२०१६ पासून महिला जागतिक अजिंक्यपद स्पर्धा पूर्णपणे चिनी खेळाडूंच्या ताब्यात आहे. वैशाली गेल्या दशकात चीनच्या या वर्चस्वाला आव्हान देणारी पहिली खेळाडू आहे. क्रीडा तज्ज्ञ आता वैशालीची तुलना गुकेशशी करत आहेत, ज्याने २०२४ मध्ये चीनच्याच डिंग लिरेनला हरवून जागतिक अजिंक्यपद जिंकले होते. २०२६ मध्ये वैशाली देखील जू वेनजुनला हरवून तीच कामगिरी करेल अशी अपेक्षा आहे.

मागील वेळी भारताच्या डी. गुकेशने ही स्पर्धा जिंकून चीनच्या डिंग लिरेनला आव्हान दिले होते. तेव्हा गुकेश कँडिडेट्स स्पर्धा जिंकणारा भारताचा दुसरा खेळाडू ठरला होता. ५ वेळा विश्वविजेते विश्वनाथन आनंद यांनी १९९५ मध्ये पहिल्यांदा कँडिडेट्स स्पर्धा जिंकली होती.कँडिडेट्स स्पर्धा बुद्धिबळ जगातील सर्वात महत्त्वाचा कार्यक्रम मानला जातो, कारण यामुळेच ठरते की जागतिक विजेत्याला पुढील आव्हान देणारा कोण असेल. याला जागतिक अजिंक्यपद स्पर्धेची उपांत्य फेरी देखील म्हटले जाते. विजेत्याला थेट जागतिक विजेत्याशी खेळण्याची संधी मिळते. ही बुद्धिबळाची सर्वात मोठी पात्रता स्पर्धा आहे.कँडिडेट्स स्पर्धा दर दोन वर्षांनी होते आणि विजेता जागतिक विजेत्याला आव्हान देतो. ओपन गटातील विजेत्याचा सामना भारताच्या डी. गुकेशशी होईल, तर महिला गटातील विजेतीचा सामना चीनच्या जू वेनजुनशी होईल.

## खारघरमध्ये १८ एप्रिलला महापौर मॅरेथॉन प्रोमो रन

**| पनवेल ग्रामीण | प्रतिनिधी |**

पालिकेच्या वतीने येत्या १८ एप्रिल रोजी खारघर येथील सेंट्रल पार्क येथे खारघर हिल महापौर मॅरेथॉन (प्रोमो रन) या भव्य क्रीडा उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. निसर्गरम्य खारघर हिल परिसरात होणाऱ्या या मॅरेथॉनमुळे शहरात फिटनेस व क्रीडा संस्कृतीला चालना मिळणार आहे.

नागरिकांच्या आरोग्याबाबत जागरूकता वाढवणे आणि फिटनेसप्रती सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करणे हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या प्रोमो रनमध्ये ५ किमी व १० किमी अशा दोन गटांमध्ये स्पर्धा होणार आहे. १० किमी मॅरेथॉन सकाळी ५.४५ वाजता तर ५ किमी मॅरेथॉन सकाळी ७.०० वाजता सुरू होणार आहे.

मॅरेथॉनचा मार्ग खारघरमधील प्रमुख ठिकाणांमधून जाणार असून इस्कॉन मंदिर खारघर, ग्रामविकास भवन, मुंब्रा मेट्रो परिसर, सेक्टर १९, उत्सव चौक, बेलापाडा मेट्रो स्टेशन आणि गोल्फ कोर्स या भागांचा समावेश आहे. ५ किमी मार्ग सेंट्रल पार्कपासून सुरू होऊन इस्कॉन मंदिर, ग्रामविकास भवन, मुंब्रा मेट्रो यू-टर्न, सेक्टर १९ मार्गे पुन्हा सेंट्रल पार्क येथे संपेल. तर १० किमी मार्गात याच मार्गासोबत उत्सव चौक, बेलापाडा मेट्रो आणि गोल्फ कोर्सचा विस्तारित समावेश आहे.

७३वी राज्यस्तरीय पुरुष व महिला गट कबड्डी स्पर्धा

## होतकरू, मिडलाईन, नवशक्ती यांची आगेकूच

**| ठाणे | प्रतिनिधी |**

होतकरू, मिडलाईन, जय भवानी, बालगोपाळ यांनी पुरुषांत, तर स्नेहविकास, ओम् वर्तकनगर, नवशक्ती यांनी महिलात आपली आगेकूच सुरु ठेवली.



पुरुष गटात ठाण्याच्या होतकरू मंडळाने उपनगरच्या केदारनाथ मंडळावर मात केली. पूर्वार्धात पिछाडीवर पडलेल्या होतकारूने उत्तरार्धात आपला खेळ गतिमान केला आणि लोण देत सामना आपल्या बाजूने झुकविला. मितेश चव्हाण याच्या चढाया, तर तुषार यादव, देवेन पाटील यांचा भक्कम बचाव याला याचे श्रेय जाते. केदारनाथच्या ओमकार कदम, ओम् कदम यांचा खेळ उत्तरार्धात कमी पडला. मिडलाईन स्पोर्टस्ने अभिषेक भोईर, धीरज बैलमारे, अजित चव्हाण यांच्या चतुरस्त्र खेळाने अष्टविनायक संघाने नमविले. अष्टविनायकचे स्वयंम गोंधळे, सागर भोईर चमकले.

जय भवानी तरुण मंडळाने चिंतामणी स्पोर्टस्ला पराभूत केले ते तुळशीदास शिर्के, कुणाल शिंदे, ऋषिकेश पवार यांच्या चढाई पकडीच्या खेळामुळे. विश्रांतीला विजयी संघाकडे आघाडी होती. चिंतामणीचे हर्षल शहा, विशाल सणस उत्तम खेळले. बालगोपाळ मित्र मंडळाने ओवळी मंडळावर विजय मिळविला. पहिल्या डावात चूरशीची लढत झाल्यामुळे मध्यंतरला गुणफलक बरोबरीत होता. मध्यंतर नंतर बाळ गोपाळच्या फाजल नाडर, राज चौधरी, अतिश जीत यांनी आपला खेळ उंचावत संघाला निसटता विजय मिळवून दिला. ओवळीच्या महेश कदम, प्रिन्स यादव, चिराग सिंग यांचा खेळ मध्यंतर नंतर थोडा कमी पडला. महिलांत उपनगरच्या स्नेहविकास मंडळाने ठाण्याच्या अश्वमेघ स्पोर्टस् ला २६-२५ असे चकविले. विश्रांतीला लोण देत १४-०९ अशी आघाडी घेणाऱ्या स्नेहविकासला नंतर मात्र अस्वमेघ संघाने कडवी लढत दिली. प्राची तावडे, रिया तावडे, प्रांजल जाधव स्नेहविकास कडून, तर वैष्णवी चव्हाण अश्वमेघ संघाडून उत्कृष्ट खेळले. ओम् वर्तकनगर संघाने वैष्णवी साळुंखे, पूजा जाधव, पूर्वा इंगवले यांच्या तुफानी खेळाने उपनगरच्या सत्यम सेवा संघाला ३८-०८ असे नमविले.

## अजिंक्य रहाणेला १२ लाखांचा दंड

**बेंगळुरु :** आयपीएल २०२६ च्या २२ व्या सामन्यात कोलकाता नाइट रायडर्सचा कर्णधार अजिंक्य रहाणे याच्यावर संथ गतीने षटके टाकल्याबद्दल दंड ठोठावण्यात आला आहे. चेन्नई सुपर किंग्स विरुद्ध एम.ए. चिदंबरम स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या सामन्यादरम्यान कोलकाता संघ निर्धारित वेळेत आपली षटके पूर्ण करू शकला नाही. आयपीएलच्या आचारसंहितेचे उल्लंघन केल्यामुळे बीसीसीआयने कर्णधारावर ही कारवाई केली आहे. आयपीएलच्या आचारसंहितेच्या कलम २.२२ नुसार कोलकाता नाइट रायडर्सचा या हंगामातील हा पहिला गुन्हा होता.

## मॅराडोनाच्या मृत्यू प्रकरणात पुन्हा चौकशी सुरू

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

फुटबॉल दिग्गज डिएगो मॅराडोना यांच्या मृत्यू प्रकरणाची चौकशी मंगळवारपासून पुन्हा सुरू होत आहे. त्यांच्या वैद्यकीय पथकावर योग्य उपचार न केल्याचा आणि निष्काळजीपणा केल्याचा आरोप आहे.मे २०२५ मध्ये सुरू झालेला पहिला खटला त्यावेळी रद्द करण्यात आला होता, जेव्हा एका न्यायाधीशावर कोर्टात परवानगीशिवाय माहितीपट शूट केल्याचा आरोप लागला होता. आता नवीन न्यायाधीशांसमोर सुनावणी सुरू होईल.



मॅराडोना यांना फुटबॉल इतिहासातील महान खेळाडूंपैकी एक मानले जाते. त्यांनी १९८६ च्या विश्वचषकात अर्जेंटिनाला विजय मिळवून दिला होता आणि हँड ऑफ गॉड गोलसाठीही ते ओळखले जातात.मॅराडोना यांचा २५ नोव्हेंबर २०२० रोजी वयाच्या ६० व्या वर्षी मृत्यू झाला होता. ते मेंदूतील रक्ताच्या गुठळीच्या शस्त्रक्रियेनंतर घरी बरे होत होते. शवविच्छेदनात हृदयविकाराचा झटका आणि फुफ्फुसात पाणी जमा होणे हे मृत्यूचे कारण सांगितले गेले.

या प्रकरणात मेडिकल टीमचे ७ सदस्य खटल्याचा सामना करत आहेत. त्यांच्यावर कल्पेबल होमिसाईडचा गुन्हा दाखल आहे. दोषी आढळल्यास त्यांना ८ ते २५ वर्षांपर्यंत शिक्षा होऊ शकते. तपासात समोर आले की, टीमला मॅराडोनाच्या गंभीर स्थितीची माहिती होती, परंतु त्यांनी आवश्यक पावले उचलली नाहीत.

मेडिकल तज्ञांनी त्यांच्या उपचारांना मनिष्काळजी आणि अपुरेफ असे म्हटले. खटल्यात सुमारे १०० साक्षीदारांचे जबाब घेतले जातील, ज्यात त्यांच्या मुलींचाही समावेश आहे. ही सुनावणी जुलैपर्यंत चालू शकते.

राज्यस्तरीय व्यावसायिक पुरुष गट कबड्डी स्पर्धा

## युवा पलटन, मुंबई पोस्टल, भारत पेट्रोलियम यांची बाद फेरीत धडक

**| मुंबई | प्रतिनिधी |**

युवा पलटन, मुंबई पोस्टल, भारत पेट्रोलियम, सी. जी. एस. टि. मुंबई बंदर, डी. पी. यु. पुणे, मिड लाईन, मध्य रेल्वे, एच. ए. एल.-नाशिक, मीरा भाईंदर महानगर पालिका, युनियन बँक, ठाणे महानगर पालिका यांनी ओम् ज्ञानदीप मंडळाने आयोजित केलेल्या या हंगामातील पहिल्या पुरुष व्यावसायिक गट कबड्डी स्पर्धेची बाद फेरी गाठली.

फ गटातील साखळी सामन्यात रायगडच्या मिड लाईन अकादमीने बलाढ्य अशा मध्य रेल्वे संघावर ४९-२० अशी सहज मात केली. झंझावाती सुरवात करणाऱ्या मिड लाईन ने पूर्वार्धातच ३ लोण देत मोठी आघाडी घेतली. उत्तरार्धात आणखी एक लोण देत या मोठ्या विजयावर शिक्कामोर्तब केले. धीरज बैलमारेच्या तुफानी चढाया त्याला आदर्श कुमारची मिळालेली पकडीची साथ यामुळे त्यांनी मोठ्या फरकाने विजय मिळविला.

रेल्वेच्या शुभम शिंदे, आशिष कुमारचा खेळ या सामन्यात बहारला नाही. पण गट उपविजेते म्हणून रेल्वेने देखील बाद फेरी गाठली. मीरा भाईंदर महानगर पालिकेने पहिल्या डावातील १५-१९ अशा पिछाडीवरून जे. जे. रुग्णालयाचा प्रतिकार ४१-३० असा मोडून काढत बाद फेरी गाठली. दोन पराभवामुळे जे. जे. ला साखळीत गारद व्हावे लागले. जे. जे. च्या रिहान शेख, ओमकार दारकुडे यांनी संघाला आधाडी दिली होती. नंतर मात्र ते ढेपाळले. त्यांनी प. डावात ३ तर नंतर एक अव्वल पकड करीत संघाच्या आशा पल्लवीत केल्या होत्या. दुसऱ्या डावात मीरा भाईंदरच्या संकेत खाताते, संदीप गुरव टॉप गिअर टाकत संघाला बाद फेरी गाठून दिली.

युनियन बँकेने फ गटात प्रथम हिंदुजा रुग्णालयाला ४५-२६ असे पराभूत करीत बाद फेरीच्या दिशेने पहिले पाऊल टाकले. नंतर ठाणे महानगर पालिके बरोबर १४-१४ असा बरोबरीत सामना सोडवित बाद फेरी गाठली. अतुल जाधव, अक्षय तावडे यांच्या चतुरस्त्र खेळाला याचे श्रेय जाते. क गटात मुंबई बंदरने आणि पुण्याच्या डी. पी. यु. संघात बरोबरी झाली. मध्यंतरला देखील १७-१७ अशी बरोबरी होती. तेजस टक्के, सौरभ राऊत मुंबई बंदर कडून, तर विकास जाधव, सुमित घोलप डी. पी. यु. कडून उत्कृष्ट खेळले.

# आता डोपिंगविरुद्ध चळवळीला वेग

## ■ वाडा अन् सीबीआयच्या बैठकीत चर्चा, गुन्हेगारी जाळ्यांवर अंकुश ठेवणार

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

जागतिक द्रव्यविरोधी संस्थेचे प्रमुख विटोल्ड बांका यांनी बुधवारी केंद्रीय अन्वेषण विभागाचे विशेष संचालक मनोज शशीधर यांची भेट घेतली. या बैठकीत डोपिंगविरोधी कारवाई अधिक मजबूत करण्यासाठी आणि यामागील गुन्हेगारी जाळ्यांवर अंकुश ठेवण्यासाठी परस्पर सहकार्य वाढविण्यावर चर्चा झाली. यामुळे आता डोपिंग अर्थातच उत्तेजकविरोधी चळवळीने वेग पकडला आहे, असेही म्हणता येणार आहे. विटोल्ड बांका यांनी सोशल माध्यमावर माहिती देताना सांगितले की, संघटित डोपिंग आणि त्यामागील गुन्हेगारी नेटवर्क रोखण्यासाठी कायदा अंमलबजावणी यंत्रणांशी जवळून काम करणे आवश्यक आहे.

दरम्यान, याआधी सोमवारी त्यांनी राष्ट्रीय उत्तेजक विरोधी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांसोबत तातडीची बैठक घेऊन गंभीर आणि तातडीच्या मुद्द्यांवर चर्चा केली होती. भारतातील क्रीडा क्षेत्राची प्रामाणिकता टिकवण्यासाठी उपाययोजना करण्यावर भर देण्यात येण्यात येत आहे. विटोल्ड बांका यांनी मंगळवारी क्रीडा सचिव हरी रंजन राव यांचीही भेट घेतली. या चर्चेत प्रभावी धोरणे आणि चांगले प्रशासन यामुळे डोपिंगविरोधी प्रयत्न अधिक मजबूत होऊ शकतात, असे मत व्यक्त करण्यात आले.

डोपिंग प्रणाली मजबूत करणार विटोल्ड बांका यांनी पुढे सांगितले की, दिल्लीत नाडा आणि राष्ट्रीय डोप टेस्टिंग लॅबला भेट दिली. भारतातील अँटी-डोपिंग प्रणाली मजबूत करण्यासाठी आणि आव्हानांचा सामना करण्यासाठी चर्चाही झाली.दरम्यान, भारताकडून डोपिंगविरोधात कडक पाऊल उचलण्यात येत आहे. त्यामुळे सध्या भारत डोपिंग मुक्त होण्याकडे वाटचाल करीत आहे, असे म्हणायला हरकत नाही.

लखनौचा ५ सामन्यांतील हा तिसरा पराभव | विराट कोहली ऑरेंज कॅपचा मानकरी

# आयपीएलमध्ये आरसीबीने लगावला विजयाचा चौकार

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

गतविजेत्या रॉयल चॅलेंजर्स बेंगळूरुने लखनौ सुपर जायंट्सचा ५ गडी राखून पराभव केला. एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर प्रथम खेळताना, लखनौचा डाव शेवटच्या चेंडूवर १४६ धावांवर गुंडाळला गेला. आरसीबीने १५.१ षटकांत ५ गडी गमावून सहजपणे लक्ष्य गाठले. ५ सामन्यांत ४ विजयांसह आरसीबीचे ८ गुण झाले आहेत.

आरसीबीच्या गोलंदाजांनी पॉवरप्लेमध्ये लखनौला केवळ ३५ धावा देत शानदार फलंदाजी केली. पाचव्या षटकात जोश हेझलवुडच्या चेंडूने ऋषभ पंत जखमी झाला आणि दुखापतग्रस्त होऊन निवृत्त झाला. हेझलवूडने आपल्या चार षटकांच्या स्पेलमध्ये २० धावा दिल्या, तर रसिक सलामने २४ आणि भुवनेश्वर कुमारने २७ धावा दिल्या. नाणेफेक हरल्यानंतर प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतलेल्या लखनौ संघाने एडन मार्करम आणि



मिचेल मार्श या जोडीच्या जोरावर चांगली सुरुवात केली. त्यांनी आपल्या चार षटकांत ३२ धावा केल्या. १२ धावा करून मार्करम पॅव्हेलियनमध्ये परतला, त्यानंतर कर्णधार पंत फलंदाजीसाठी आला, पण त्याच्या डावातील तिसऱ्याच चेंडूवर तो जखमी झाला आणि त्याला दुखापतग्रस्त होऊन निवृत्त व्हावे लागले. दरम्यान, मार्श ४० धावा करून बाद झाला.११८ धावांवर संघाने पाच गडी गमावले होते, त्यानंतर कर्णधार पंत पुन्हा फलंदाजीसाठी आला, पण भुवनेश्वर कुमारने त्याला बाद केले. या डावात पंतने एकूण सहा चेंडूंचा सामना करत केवळ एक धाव काढली. जॉर्ज लिंडे आणि मोहम्मद शमी यांना करुन परतले. तर मुकुल चौधरीने ३९ धावा केल्या. रसिक सलाम दारने सर्वाधिक ४ बळी घेतले, तर भुवनेश्वर कुमारने ३ बळी घेतले. कृणाल पांड्याने २ बळी आणि जोश हेझलवूडने १ बळी घेतला. आरसीबीकडून फिल सॉल्ट सात धावा करुन बाद झाला तर, विराटला आपले अर्धशतक पूर्ण करता आले नाही. तो ४९ धावा करुन बाद झाला. पडिकले १० धावा केल्या तर कर्णधार रजत पाटीदराने २७ धावा केल्या. जितेश शर्माने २३ धावा केल्या. टिम डेव्हिड आणि रोमारियो शेफर्ड दोघे पण १४ धावा करुन नाबाद राहिले. या सामन्यात कोहली ऑरेंज कॅपचा मानकरी ठरला.




कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुला९बा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)